

# माणूस

१ मार्च १९६६
चाळीस पैसे



"मित्र हो, दक्ष राहा आणि स्वातंत्र्य सांभाळा !!" [पृ. १४-१५]

सरकारी धान्यधोरणातील ‘ ट्रिक सिन ’....






वर्ष पाचवे : अंक एकोणिसावा : १ मार्च १९६६
किंमत चाळीस पैसे : वार्षिक वर्गणी दहा रुपये
संपादक : श्री. ग. माजगावकर
पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. : दूरध्वनी : ५७३५९.

श्री. संपादक,
पाक्षिक ' माणूस ',
स. न. वि. वि.

१९६४ साली अमेरिकन काँग्रेसनं मुलकी हक्कांबद्दलचा कायदा संमत केल्यामुळे अमेरिकेत वर्णद्वेषाचं एक वादळ उठलं होतं. मिसिसिपी राज्यात यासाठी केल्या गेलेल्या शांततामय सत्याग्रहाचं नेतृत्व एका निग्रो तरुणानं—बॉब मोझेसनं— केलं होतं. त्याच्या नेतृत्वाखाली कार्य करणाऱ्या तीन अमेरिकन विद्यार्थी-तरुणांना (त्यात एक निग्रो होता) एकवीस जून एकोणीसशे चौसष्ट रोजी अमानुषपणे ठार मारण्यात आलं. या तिघांपैकी अॅन्ड्र्यू गुडमन याच्या आईनं सांगितलेली त्याची कथा श्री. बर्नार्ड अॅस्बेल यांनी 'Good House Keeping' या अमेरिकन मासिकाद्वारे मे, १९६५ मध्ये प्रकाशात आणली. या कथेचा अनुवाद "......त्याचा मृत्यू निरर्थक नव्हता......" मी पूर्ण केला असून तो प्रसिद्ध करण्याची रीतसर परवानगी श्रीमती गुडमन यांनी मला दिलेली आहे. आपल्या पाक्षिकात हा अनुवाद आपण प्रसिद्ध करावा अशी माझी इच्छा आहे.

आपला कृपाभिलाषी
श्याम तारे (अमरावती).

श्री. श्याम तारे यांचा अनुवाद ' माणूस 'मधून लवकरच (शक्यतो पुढील अंकात) प्रसिद्ध होत आहे —सं.

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# देश-विदेश

## □ मध्यपूर्वेतील इस्लामी एकजूट

आधीच शस्त्रास्त्रांच्या स्पर्धेत गुंतलेल्या मध्यपूर्वेतील अरब राष्ट्रांत आणखी एक पंथ नव्यानेच मोठ्या जोराने डोके वर काढण्याचा प्रयत्न करीत आहे. अरब-राष्ट्रांचे परप्रांतांतील संबंध आणि त्यांच्या एकत्रित शक्तीचा जगाच्या राजकारणावर होणारा परिणाम या नव्या चळवळीवर बऱ्याच प्रमाणात अवलंबून राहील, असे दिसते.

सौदी-अरेबियाचा अतिशय श्रीमंत राजा फैजल याने सुरू केलेली आणि साऱ्या अरबजगतात चर्चेचा विषय बनलेली ही चळवळ म्हणजे इस्लामी अलायन्सची. केवळ अरबजगतातल्याच नव्हे, तर साऱ्याच मुस्लीम राष्ट्रांना एकत्र आणून त्यांची आर्थिक, सांस्कृतिक अशी घट्ट संघटना तयार करण्याची फैजलची कल्पना आहे. अशा संघटनेच्या स्वरूपाचे नि:संदिग्ध स्पष्टीकरण त्याने अद्याप केले नसले तरी या अलायन्सला मध्यपूर्वेत पाठिंबा मिळविण्यासाठी प्रचाराची एकच धमाल त्याने उडवून दिली आहे. परंतु फैजलचा प्रचारही अतिशय सावध आहे. आपल्या कल्पनेला इस्लामी अलायन्स अथवा पॅक्ट हे नाव त्याने स्वत: कधीच वापरले नाही. पण अरब राष्ट्रीयत्व, आर्थिक सहकार्य या अरब कानांना गोड वाटणाऱ्या शब्दांच्या पांघरुणाखाली इस्लामी अलायन्सचेच उद्दिष्ट दडले आहे, हे आता उघड झाले आहे आणि त्यावर मध्यपूर्वेत कडाक्याचे वाद आणि जोराच्या राजकीय हालचाली सुरू आहेत. या संघटनेची सुरवात करण्यासाठी जी शिखर परिषद भरविण्याचे फैजलने ठरविले आहे, त्या परिषदेला जावयाचे किंवा नाही, याबद्दल अरब नेत्यांत चर्चा चालू आहे.

आतापर्यंत इजिप्त आणि सीरियाने या धार्मिक अलायन्सच्या कल्पनेला उघडपणे विरोध केला आहे. अल्जीरियानेही नुकताच आपला विरोध जाहीर केला आहे. नासरने तर चक्क इशारा दिला आहे की, अशा तऱ्हेचा धर्मावर आधारलेला इस्लामी करार अरब–जगत धुडकावूनच लावील. इराकने जरी आपले मत अद्याप प्रदर्शित केले नसले तरी नुकत्याच झालेल्या इजिप्तचे अध्यक्ष नासर आणि इराकचे अध्यक्ष आरेफ यांच्या बोलण्यावरून इराकही संघटनेत सामील होणार नाही असे दिसते परंतु मोरक्को, लिबिया, जॉर्डन, सुदान आणि मुख्य म्हणजे अरबजगता-

तील सर्वात निधर्मी राष्ट्र म्हणून मानला गेलेला ट्युनिशियाही– या संघटनेला अनुकूल दिसतात. विरोध करणारी राष्ट्रे सोडून दिली तर, इतर राष्ट्रांची या संघटनेकडे थोडीशी सावधगिरीने बघण्याची, बघू या काय होते ते, अशी पाहण्याची वृत्ती दिसते.

या साऱ्या चळवळीचा परिणाम मात्र अगोदरच असा दिसू लागला आहे, किंवा तसा परिणाम होत असल्याचा भास निर्माण करण्यात येत आहे, की आतापर्यंत अरब चळवळीचे व शक्तीचे केंद्र इजिप्तमध्ये एकवटले होते. ते सौदी अरेबियाच्या दिशेने सरकू लागले आहे. फैजल हा नासेरला एक निराळाच प्रतिस्पर्धी निर्माण होऊ लागला आहे. धार्मिक संघटना अरबजगतात टिकणार नाही, नष्ट होईल, असा शाप जरी नासरने दिला असला तरी फैजल म्हणतो, संघटनेच्या शिखरपरिषदेच्या आमंत्रितांच्या यादीत नासरचे नाव अग्रभागी आहे. जॉर्डनलाही असे वाटते की, इस्लामी संघटनेला शिव्याशाप देणे नासरला बंद करावे लागेल आणि कधीतरी स्वत:लाही त्यात सामील व्हावेच लागेल.

ते काहीही असले तरी इस्लामी अलायन्सच्या चळवळीच्या निमित्ताने साऱ्या अरबजगतात आंतरराष्ट्रीय संबंधाविषयी, पूर्व–पश्चिम संबंधाविषयी पुर्नविचार सुरू झाला आहे हे निश्चित. अरब राष्ट्रे ज्यात मोठ्या प्रमाणात आहे, तो बगदादकरार पूर्णपणे अमेरिकनांची निर्मिती आहे. त्याला कम्युनिस्टविरोधी पाया आहे. प्रादेशिक हितांचा त्यात संबंध नाही. आता साम्यवाद आणि भांडवलशाही यांच्यामधला असा साम्राज्यशाहीविरोधी व सामाजिक न्याय मिळवून देणारा तिसराच पंथ म्हणून इस्लामचे नाव पुढे करण्याचा प्रचार अरबजगात चालू झाला आहे. त्यामागचा एक हेतू स्पष्ट दिसतो. अरबातील इजिप्त, सीरिया, अल्जीरियासारखी जी राष्ट्रे आपला अरब-राष्ट्रवाद समाजवादाशी जोडू बघत आहे, त्यांना त्यापासून परावृत्त करणे आणि नेमकी तीच राष्ट्रे या संघटनेला विरोध करत आहेत.

सीरियाला तर या चळवळीमागे अँग्लो–अमेरिकनांचा हात असून, अरबांचा क्रांतिकारक राष्ट्रवाद अधिक प्रबळ होऊ नये म्हणून तो खच्ची करण्यासाठी त्यांनी ही नवी लढत लावून दिली, असे वाटते.

दरम्यान पाकिस्तान, मलेशिया, इंडोनिशियासारखी बहुसंख्य अरबजगताबाहेरील मुस्लीम राष्ट्रे या चळवळीकडे कुतूहलाने बघत आहेत. फैजलने योजलेल्या शिखरपरिषदेला अद्याप यांपैकी कुणाला बोलावणे गेले नाही, कारण अजून तरी इस्लामी अलायन्स म्हणजे अरब-राष्ट्रवाद हाच ठेका बरबर फैजल धरून आहे. परंतु मागील इतिहास व एकूण प्रवृत्ती बघता पाकिस्तानसारखे राष्ट्र संघटनेच्या प्रथमावस्थेत अथवा पुढे केव्हाही बोलावणे आल्यास, तशी संधी केव्हाही गमवणार नाही असे वाटते.

इजिप्त-अल्जीरियाच्या विरोधातहि इस्लामी अलायन्स उभे राहिलेच तर मध्य-पूर्वेतील ती फार मोठी लक्षात येण्याजोगी शक्ती ठरेल यात काही शंका नाही. आतापर्यंत आपापसात सतत क्षुल्लक प्रश्नावर भांडत असलेल्या या अरब-राष्ट्रांचे एकमत फक्त इस्राईलच्या विरोधातच होत होते. आता धर्माच्या बंधनामध्ये या राष्ट्रांच्या आर्थिक, राजकीय व लष्करी शक्ती एकत्र आल्या तर त्यांचे अस्तित्व निश्चितच साऱ्या जगाला ध्यानात घ्यावे लागेल. विशेषत: या चळवळीमागे अँग्लो-अमेरिकनांचा हात नसेल आणि खरोखरच साम्यवाद आणि भांडवलशाही यांमधील सुवर्णमध्य इस्लामच्या रूपाने निर्माण करण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न असेल, तर तो यशस्वी झाल्यास एका नव्या स्वतंत्र शक्तिकेंद्राचा जगाच्या नकाशात उदय होईल, हे निश्चित. आपली स्वतंत्र शक्ती व अस्तित्व चीनने पटवून दिल्यानंतर साऱ्या जगाच्या राजकारणाचे चित्र जसे एकदम बदलले, तसे हे अलायन्स यशस्वीपणे उभे राहिले तर पुन्हा एकदा घडण्याची शक्यता आहे. ही संघटना कितपत भक्कमपणे आणि यशस्वीपणे उभी राहते, यावर ही शक्यता अवलंबून आहे.

## □ नागिस्तान....?

गेली अठरा वर्षे भारताची सतत डोकेदुखी बनलेला आणि पुन: पुन: भडकणारा नागांचा प्रश्न पुन: एकदा विचारासाठी पुढे आलेला आहे. हिंदूंच्या अक्षम्य आत्म-केंद्री वृत्तीमुळे आणि दुर्लक्षामुळे आणि उत्साही ख्रिश्चन पाद्रयांच्या चिथावणीमुळे भारताच्या ईशान्य सीमेवर एक स्वतंत्र ख्रिश्चन देश निर्माण होण्याची भीती निर्माण झाली आहे. मागे एका विरोधी पक्षाच्या नेत्याने म्हटल्याप्रमाणे गोष्ट या थराला येण्यास हिंदू जमातीचे दुर्लक्ष व परदेशांतून येणाऱ्या ख्रिश्चन मिशनऱ्यांची परदेशनिष्ठा वा भारताविषयीचा द्वेष याच गोष्टी कारणीभूत आहेत. स्वत:चे जीव धोक्यात घालून मिशनऱ्यांनी रानटी अवस्थेत राहणाऱ्या नागांना सुशिक्षित केले आणि त्यांच्यामध्ये जाणूनबुजून भारताविषयी परकेपणाची भावना रुजविली. हिंदू समाजाने मात्र गेल्या हजार वर्षांत चालत आलेल्या परंपरेनुसार आपल्या चाकोरी-बाहेर जाऊन परक्या रानटी जमातींना आपलेसे करण्याचा प्रयत्न कधी केला नाही. यात दोष कुणाचा ?

ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रसाराचा धोका लक्षात घेऊन रामकृष्ण मिशनने आपली एक शाखा आसामच्या एका रानटी जमातीच्या वस्तीत सुमारे दोन वर्षांपूर्वी काढली होती. पण हाय ! दुर्दैव हिंदू समाजाचे. ती शाखा कुणी हिंदू कार्यकर्ताच तेथे जावयाला धजत नसल्याने बंद करावी लागली. ख्रिश्चन मिशनऱ्यांची वाण पडल्यामुळे एखादे चर्च बंद करावे लागल्याचे कुठे ऐकिवात नाही. हिंदुसमाजाचा म्हणा अथवा आता भारतीय समाजाचा म्हणा, दृष्टिकोन असाच पुढेही आत्मकेंद्री राहिला

तर नागांप्रमाणेच इतरही ठिकाणी तसेच प्रश्न निर्माण व्हायला भारतात अजूनही भरपूर वाव आहे.

धार्मिक अलिप्ततेतून निर्माण झालेल्या या प्रश्नाचे राजकीय स्वरूप मात्र फार गंभीर झाले आहे. स्वतंत्र राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या इतमामाने नागांच्या भूमिगत 'नॅशनल कौन्सिल'चे प्रतिनिधी नुकतेच इंदिरा गांधींना भेटायला आले होते. "माझ्याशी झालेल्या चर्चेत नागनेत्यांनी 'स्वतंत्र नागस्तान'ची मागणी मांडली नाही आणि एप्रिलमध्ये नागनेत्यांशी पुन्हा होणाऱ्या चर्चेनंतर नागभूमीत शांतता नांदेल," अशी हमी इंदिराबाईंनी लोकसभेत दिली असली तरी त्याच सुमारास नागशिष्टमंडळाच्या एका सदस्याने एका पत्रकाराला जी मुलाखत दिली, ती धक्का देणारी आहे. नाग हे कधीच भारतीय राज्यात नव्हते व राहणार नाहीत. सिक्कीम-सारखी भारतीय छत्राखालील स्वायत्तता नागांना मंजूर नाही, असे सांगून शेवटी त्याने असाही इशारा दिला, की भारताने आमच्या मागण्या मान्य करून आम्हाला स्वातंत्र्य दिले नाही तर आम्ही दुसरे उपाय योजू.

या दुसऱ्या उपायात मदत करण्यासाठी आपल्या भोवतालची राष्ट्रे तर अगदी टपून बसली आहेत. ●

## सैनिकांसाठी हलके बर्फातील जोडे

लडाख व काश्मीरसारख्या बर्फमय जागी लढाईमध्ये सैनिकांजवळ नुसती चांगली शस्त्रे व उपयुक्त सामान असून चालत नाही. तर या सामानाचे वजन कमीत कमी असणे फार आवश्यक असते. बर्फमय पर्वतावर चढणे कठीण तर खरेच, पण सामान घेऊन वर चढणे अधिक बिकट असते. हलक्या जोड्यांनी सैनिकांना सर्वच हालचाली जलद करता येतील. तसेच पळणे, चढणे, या क्रियाही सोप्या होतील. या दृष्टीने इशापूर येथील संरक्षण धातुक्रिया शास्त्र, प्रयोगशाळेने १·२५ पौण्डाचे जोडे सैनिकांसाठी तयार केले आहेत. पूर्वीच्या सैनिकांच्या जोड्यांचे वजन साडेपाच पौण्डांचे होते. या नवीन जोड्यांच्या तळव्यांना अल्युमिनियम मिश्रधातू पत्र्याचा उपयोग केला गेला आहे. शिवाय इतरही सुधारणा असतील.

[ 'विज्ञान समाचार सेवा,' दिल्ली, वरून. ]

# विचार धारे

समीर

## ● संग्रहालयातले ज्ञान

संग्रहालयांचे शैक्षणिक महत्त्व वाढविण्यास बराच वाव आहे. सध्या भारतात संग्रहालय म्हटले की, कसा तरी पेंढा भरलेली जनावरे आणि कुजणारी फुलपाखरे यांचा संग्रह डोळ्यांसमोर उभा राहतो. हे दृश्य बदलले पाहिजे आणि त्याची जागा चित्र-संग्रह, शिल्प-संग्रह व वैज्ञानिक वस्तूंचे प्रदर्शन यांनी घेतली पाहिजे, असे मत काही दिवसांपूर्वी श्री. ह्युगूस् द व्हरीन–बोहन यांनी दिल्लीत बोलताना प्रकट केले. श्री. व्हरीन-बोहन हे युनेस्कोशी संलग्न असलेल्या ' इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ म्यूझियम्स ' या संस्थेचे संचालक आहेत व दिल्लीला युनेस्कोतर्फे संग्रहालयावर योजलेल्या परिसंवादात भाग घेण्यासाठी हिंदुस्थानात आले होते. वस्तूंच्या मांडणी-कडे पुरेसे लक्ष पुरविले तर अशिक्षित जनतेलादेखील औद्योगिक–प्रदर्शन आवडेल, असे त्यांचे मत आहे.

" हिंदुस्थानातल्या संग्रहालयांना कमी लेखण्याची काही आवश्यकता नाही, " असे हा संग्रहालय-तज्ज्ञ स्पष्टपणे म्हणतो. पॅरिसमधले लूव्हर संग्रहालय सर्व जगात अत्युत्कृष्ट समजले जाते, पण दर वर्षी फक्त एक लाख पॅरिस-निवासी ते पाहायला जातात. उलट मुंबईच्या ' प्रिन्स ऑफ् वेल्स म्यूझियम 'ला दर वर्षी दहा लाख लोक भेट येतात. लूव्हर ही काही संग्रहालयांच्या बाबतीतली चरण-सीमा नाही. उलट तज्ज्ञांच्या मते त्याची रचना व वस्तूंची मांडणी या दोन्ही गोष्टी " भयंकर " आहेत. इटली व स्पेनमधल्या काही संग्रहालयांची हीच स्थिती आहे. खरे म्हणजे या क्षेत्रात युरोपनेच अप्रगत देशांकडून काही गोष्टी शिकायला हव्यात. उदाहरणार्थ मेक्सिकोत नव्वद टक्के लोक निरक्षर असूनही, त्या देशात सहा फार चांगली विज्ञानविषयक संग्रहालये आहेत. मेक्सिकोत ७० लोकांना फक्त एकच काम देण्यात आले आहे व ते म्हणजे जनतेला अधिकाधिक लाभ व्हावा, या हेतून संग्रहालयातल्या वस्तूंच्या रचनेत सुधारणा करीत राहणे. फ्रान्समधल्या काही संग्रहा-लयांत असे लक्ष फारसे दिले जात नाही.

## ● सतत नवा इतिहास

'भारताचा इतिहास पुनः लिहिला गेला पाहिजे, कारण सध्या उपलब्ध असलेली साधन-सामुग्री भूतकाळाचे कलंकित चित्र रंगविते, असे एक मत आहे, त्याबद्दल आपल्याला काय वाटते?' ऑक्सफोर्डचे एक इतिहासकार डॉ. जोहान्स व्हाइट सध्या पुणे, मुंबई व दिल्ली येथे इतिहास-संशोधन करीत आहेत. त्यांना दिल्लीत हा प्रश्न विचारण्यात आला, तेव्हा ते म्हणाले, "इतिहासाच्या पुनर्लेखनाची प्रक्रिया चालू असते. खरे म्हणजे भूतकाळाचा पुनः नव्याने विचार करणे यालाच इतिहास म्हणतात. परिस्थिती बदलत जाणे अपरिहार्य असते व अधिक कागदपत्र उपलब्ध होत राहणे साहजिकच असते. त्यामुळे इतिहास नव्याने लिहिणे आवश्यक ठरते."

"१८५७ च्या घटनेचे तुम्ही कसे वर्णन कराल,—बंड म्हणून की स्वातंत्र्याची चळवळ म्हणून?" उत्तर: सामुदायिक विचार केला तर तिला राष्ट्रीय चळवळ किंवा अशा चळवळीशी संबंधित असलेली घटना म्हणता येणार नाही. तरीदेखील ते केवळ बंड नव्हते. त्याला 'उठावणी' समजले पाहिजे. 'बंड' हे विशेषण तत्कालीन शासनकर्त्यांनी लावले होते व ते आता त्याज्य ठरले आहे, यात शंका नाही.

## ● स्वतंत्र भारताचे वाढते इंग्रजी-प्रेम

स्वतंत्र भारतात इंग्रजीचे प्रम वाढत आहे, या वर्मावर परवा एका परदेशी पंडिताने नेमके बोट ठेवले. भारत सरकारच्या शिक्षणखात्याच्या आमंत्रणावरून इकडे आलेले एक झेक बहुभाषाकोविद ओडोलेन स्मेकल हे परवा दिल्लीत बोलताना म्हणाले, "हिंदी माणूस हिंदी बोलतानाही इंग्रजी शब्द फारच वापरतो. त्यांच्या स्वतःच्या भाषांतून योग्य शब्दांची वाण नसतानाही भारतीय लोक अजूनही इंग्रजी का वापरतात, हे मला समजत नाही." स्वतः स्मेकल उत्तम संस्कृतनिष्ठ हिंदी बोलतात. "संस्कृत ही जगातली सर्वात अधिक समृद्ध भाषा आहे." हिंदी शिकायला कठीण आहे का? "नाही, मला तसे वाटत नाही." हिंदीमधले साहित्य इतर सर्व भारतीय भाषांतल्या—बंगाली धरून-साहित्याइतकेच समृद्ध आहे.

## ● उसनी नाटके

मोलेर्टिना बॅब्रूकिना ही एक नटी आहे, तशीच भारतशास्त्रज्ञ (इंडॉलॉजिस्ट) देखील आहे. नाट्य या विषयावर दिल्लीत काही दिवसांपूर्वी आपले विचार प्रकट करताना ती म्हणाली, "मी परदेशी नाटकाचे रूपांतर करण्याच्या विरुद्ध आहे. नाटक म्हणजे काही नुसती कथावस्तू नसते. ते जीवनाचे एक वास्तव चित्रच असते. शकुंतला एक रशियन तरुणी आहे आणि दुष्यंत मॉस्कोत एका फ्लॅटमध्ये राहणारा रशियन तरुण आहे, अशी तुम्हाला कल्पना करायला सांगितली तर, "अरेरे, विचारी शकुंतला!" असेच उद्‌गार तुमच्या तोंडून बाहेर पडतील. शेक्सपियर किंवा मोलियरचे निकृष्ट रूपांतर पाहूनही तुम्हाला असेच वाटेल."  ● ●

# ग्यानबाचं गुऱ्हाळ

## • 'लूप-भूषण' प्राथमिक शिक्षक

संततिनियमन आणि त्यातील 'लूप' प्रकरण या गोष्टी सध्या अतिशय महत्त्वाच्या आहेत हे काय सांगावयास पाहिजे? संततिनियमनाचा धडाका जितका उडवता येईल तेवढा उडवण्याचा उपक्रम सध्या सरकारने हाती घेतली आहे. त्यात 'लूप'चे महत्त्व किती हे सगळ्यांनाच ठाऊक आहे. आता या विषयाचे गांभीर्य ध्यानात घेऊन आमची सातारा जिल्हा परिषद पुढे सरसावली आहे. या परिषदेच्या शिक्षणखात्याने जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांना उद्देशून एक फारच मार्मिक परिपत्रक काढले आहे. प्राथमिक शिक्षकांनी खेडीपाडी हिंडून (कु) लूप बसविण्यासाठी बायका मिळवाव्यात. अशा प्रत्येक बाईमागे एकेक रुपया मिळेल आणि जे जास्त बाया मिळवतील, त्यास अनुक्रमे शंभर, पन्नास आणि पंचवीस रुपयांची बक्षिसे मिळतील. या परिपत्रकाचा हा आशय आहे.

सातारा जिल्हा परिषदेच्या शिक्षण खात्याने दिलेला हा समयोचित आदेश पाहून मला तर फारच आनंद झाला. कोणी काही म्हणो, पण जिल्हा परिषदेचा प्रयोग यशस्वी होत आहे, असेच माझे मत आहे. हे नवीन पत्रक वाचून याला पुष्टी मिळाली. आमच्या लोकांना प्रसंगाचे गांभीर्य कळत नाही, असा बकवा आता कोणी करू नये. हे घ्या झणझणीत उत्तर. देशात सध्या कुटुंबनियोजनाचा प्रश्न गंभीर आहे, ही गोष्ट खरी ना? आणि 'लूप' हेच त्याचे उत्तर आहे, हीही गोष्ट खरी की नाही? मग सातारा जिल्हा परिषदेने हा तातडीचा प्रश्न तावडतोब हाती घेतला, याबद्दल त्या मंडळींचे अभिनंदन करावयाचे सोडून त्याची टिंगल करण्याचा अधमपणा तुमच्याने करवतो तरी कसा?

आता कुणी कुजके लोक विचारतील, "हे काम डॉक्टर-नर्स या लोकांचे आहे.

विचाऱ्या प्राथमिक शिक्षकांना ही वेठबिगारी का ?–" असा प्रश्न जे विचारतील त्यांना प्राथमिक शिक्षक ही काय चीज आहे, हे कळलेले नाही हे उघड आहे. प्राथमिक शिक्षक नावाचा जो माणूस असतो, तो लहान मुलांना भाषा, गणित, शुद्धलेखन, वाचनलेखन इत्यादी निरर्थक गोष्टी शिकवण्यासाठी नसतोच मुळी. या गोष्टी काय घरातल्या घरात आईबापही मुलांना शिकवीतच असतात. प्राथमिक शिक्षक हा त्यात अशी काय मोठी भर घालणार आहे ? त्याचे मुख्य काम निराळेच आहे. सरकार, पुढारी, गावातले प्रतिष्ठित लोक आणि सत्तारूढ पक्ष यांची कामे करणे, हेच यांचे मुख्य काम असते. एखादे गणित सांगून पोरांना कशाततरी गुंतवल्यानंतर सगळा वेळ या महत्त्वाच्या कामासाठी प्राथमिक शिक्षकाने खर्च करावा, अशी अपेक्षा कुणी ठेवली तर गैर ते काय ? प्राथमिक शिक्षकाचा आणि मुलांच्या पालकांचा जवळचा संबंध असतो. म्हणून 'लूप'च्या प्रचारासाठी तो घरोघर हिंडू लागला तर ओळखीमुळे काम किती सोपे होईल बरे ! उद्या एखादी बाई मुलाच्या अभ्यासाची चौकशी करण्यासाठी शाळेत आली, तर मुलाची प्रगती सांगता सांगताच त्याने त्या बाईला लूपचेही महत्त्व पटवून देण्याचा खटाटोप केला तर तेवढेच राष्ट्रकार्य होणार नाही काय ? शिकवणीसाठी उद्या एखादा मास्तर एखाद्या पोराच्या घरी गेला, तर मुलाला शिकवता शिकवता तो घरातल्या बाईला हीही गोष्ट शिकवू शकेल, असे म्हटले तर त्यात वावगे ते काय ? मला तर वाटते की, फार दिवसांनी प्राथमिक शिक्षकांना काही भरीव काम करण्याची संधी सातारा जिल्हा परिषदेने आणून दिली आहे, तिचा त्यांनी भरपूर उपयोग करून घेतला पाहिजे. लूपचा प्रचार त्यांनी अशा निष्ठेने केला पाहिजे की, पाचसहा वर्षांत खेडोपाडी जिकडे–तिकडे 'रूपवती' च्या ऐवजी सर्वत्र 'लूपवती' चे दर्शन होऊ लागून मुले नाहीत, म्हणून प्राथमिक शाळा पूर्णपणे ओस पडल्या पाहिजेत. असे झाले तरच लहान मुलांना मुळाक्षरे शिकवीत बसण्याच्या क्षुद्र कटकटीतून ते पूर्णपणे मोकळे होतील आणि राष्ट्रकार्यासाठी त्यांना अधिक वेळ देता येईल. मग 'लूप'चे गाठोडे खांद्यावर टाकून खेडोपाडी, वाड्यावस्त्यांवर जाऊन 'लूप घ्या लूप' असे ओरडत त्यांना मोकळेपणाने फिरता येईल ! जास्तीतजास्त 'लूपवती' मिळवणाऱ्या पुरुषोत्तमांना जिल्हा परिषदेने बक्षिसे ठेवली आहेत, हे परिषदेला खरोखरच भूषणावह आहे. परंतु या बक्षिसावरच परिषदेने थांबू नये. त्यापुढे थोडी मजल मारावी. शंभरांपेक्षा अधिक बायका लूपसाठी हस्तगत करणाऱ्या वीरास 'लूप–भूषण' अशी पदवी देण्यात यावी आणि लूपची माळ घालून त्याचा विशेष गौरव करण्यात यावा. दोनशेपेक्षा अधिक संख्या झाली तर 'कुलूप–भूषण' ही पदवी बरी दिसेल. जिल्हा परिषदेचे विद्वान शिक्षणाधिकारी माझ्या या सूचनेचा गंभीरपणे विचार करतील, तर येत्या दहा–पाच वर्षांत सातारा जिल्ह्यात 'निर्मूल' अवस्था निर्माण झाल्याखेरीज राहणार नाही, अशी माझी समजूत आहे.

## • मंत्री आणि फुले

स्वर्गीय लालबहादूर शास्त्रींची आठवण चिरंतन ठेवण्यासाठी अनेक कल्पना सुचतील, पण रशियात एका फूलवाल्याने जी गोष्ट केली ती कुणाच्यातरी डोक्यात आली असती काय ? या गृहस्थाने डेलियाच्या नव्या जातीला 'शास्त्री-फूल' असे नाव दिले आहे. आता हे नाव रशियात सर्वत्र होईल, यात काही शंका नाही. रशियात काय, जेथेजेथे हे फूल जाईल तेथे तेथे शास्त्रींचे नाव जाईल. डेलियाचे हे फूल काही वेळाने सुकेलही पण शास्त्रींचे नाव कधी सुकणार नाही, मळणार नाही. विलायती फुलाला गंध नसतो. डेलियालाही सुगंध नाही. पण हे शास्त्री-फूल हातात घेतल्यावर ह्याचा सूक्ष्म नाम-गंध रसिकाच्या मनापर्यंत गेल्याशिवाय राहणार नाही आणि त्याचे मन प्रसन्नतेने आणि आदराने भरून गेल्याशिवायही राहणार नाही. खरोखर रशियातील या कल्पकतेचे जेवढे कौतुक करावे तेवढे थोडेच होईल !

माझ्या मनात आले की, ही कल्पना आणखीही थोडी वाढवून पाहिली तर काय होईल ? आपल्या देशातही निरनिराळचा फुलांच्या नमुन्यांना नवी नावे द्यायला पुष्कळ 'स्कोप' आहे. नावे ठेवण्यास योग्य अशी थोर मंडळी इथं काय कमी आहेत ? थोर पुरुषांचे कळपच्या कळप सार्वजनिक क्षेत्रात आपल्याकडे वावरत आहेत. आपली स्मृती चिरंतन राहावी यासाठी ते बिचारे किती नाना प्रकारच्या खटपटी करीत आहेत. कुणी मोठी इमारत पुरी व्हायच्या आतच तिचा उद्घाटन-समारंभ उरकून घेत आहे. कुणी आपली नावे कोनशिलेच्या आणि पायाभरणीच्या दगडावर कोरून ठेवीत आहे. कुणी पुन्हापुन्हा वर्तमानपत्रांतून आपली नावे आणि फोटो छापवून आणीत आहे, तर अगदी जिवंतपणी राजरोसपणे स्वतःचे पुतळे आपापल्या गावी बसविण्याचे महत्कार्य काही महाभागांना निरुपायाने हाती घ्यावे लागत आहे. देवळातील एखाद्या पायरीपासून तो सबंध नाटचगृह बांधून आपापली नावे कायमची दृढमूल करण्याचे प्रयत्न हे नरपुंगव करीत आहेत. या श्रेष्ठ पुरुषांना जर का हा नवीन मार्ग सापडला तर केवढा चमत्कार घडेल ! भराभर फुलांची पूर्वीची नावे गुप्त होतील आणि या नरवीरांची नामे त्याऐवजी झळकू लागतील. खास राजपत्रके आणि परिपत्रके काढून हे नामांतर जाहीर केले जाईल काय ? कदाचित पदनामकोशाप्रमाणेच एखादा पुष्पनामकोशही काढण्याची पाळी येईल. कारण या देशात फुलांनाही तोटा नाही आणि 'सदा श्रेष्ठ घारिष्ट जीवी' असणाऱ्या महापुरुषांनाही नाही. असा स्व त्र कोश केल्याशिवाय नाहीच भागायचे. मतदारांना कोंडून ठेवून त्यांना चांगले खाऊपिऊ घालायचे आणि मग दहा-दहा रुपयांची नोट सरकावून पहिल्या क्रमांकाने निवडून यायचे, हे दिव्य व्रत आचरणारी मंडळी या देशात शेकड्यांनी मोजावी लागतील. ह्या सर्वांच्या टाळूवरून हात फिरवून 'प्रेशिडेंट्ट' किंवा 'चेरमन' होणारा वीर तर 'महापुरुष' या सदरात ढकलणे इष्ट नव्हे काय ?

अशा एकेकाला एकेक फूल बहाल करायचे ठरले तरी किती फुले खर्ची पडतील बरे! आमच्या सत्तारूढ पक्षातील पुढारी आणि मंत्री तर नित्य कौतुकाचे विषय आहेत. त्यांचा सन्मान अशी नावे देऊनच होईल. उद्या धोत्र्याच्या फुलाला ‘मोरारजी-फूल’ असे नाव ठेवले तर ते किती सार्थ ठरेल हे काय सांगावयास पाहिजे! इंदिरादेवींना ‘गुलबकावलीचे फूल’ चांगले शोभेल, कारण ते फूल अतिशय सुंदर असून, प्रत्यक्षात अस्तित्वात मात्र अजीबात नाही. गुलाबाचे आणि पं. नेहरू यांचे साहचर्य तर इतके अभिन्न होते, की उद्या ‘गुलाब’ हे नाव पुसून टाकून त्यास ‘नेहरू-पुष्प’ हे नाव दिले, तर कोणालाही त्यात आश्चर्य वाटणार नाही. याच न्यायाने इतर मंडळींचीही वर्णी लागण्यासारखी आहे. कामराज आणि ‘कृष्णकमळ’, सदोबा पाटील आणि ‘कोरांटी’, यशवंतराव आणि ‘झेंडू’, जगजीवनराम आणि उग्रगंधी ‘घाणेरी’; या जोड्या सहज सुचवण्यासारख्या आहेत. निशीगंध हे फूल रात्री उमलते आणि त्याचा गंधही ह्याच सुमारास विशेष अनुभवास येतो. ते नाव काढून एखाद्या रंगेल मंत्र्याचे नाव त्याला दिले तर किती मौज येणार आहे बरे! सहज मनामधे आले साजणी ...’ म्हणून आपले सांगितले; पण कल्पना छानच आहे की नाही?

## • उर्दू शिक्षकांवर अन्याय

सातारा जिल्हा परिषदेच्या शिक्षणखात्यावद्दल आमचे चांगले मत आत्ताच कोठे झाले होते; पण परवा वर्तमानपत्रांत बातमी वाचली आणि मला धक्का बसला. तुम्ही वाचलीत का ती बातमी? सातारा जिल्ह्यात ज्या उर्दू शाळा आहेत, त्यांत शाळेच्या वेळात शिक्षकांना नमाज पढायला शिक्षणाधिकाऱ्यांनी मनाई केली आहे. हे उर्दू शाळेतले शिक्षक म्हणे शाळेच्या वेळात दोनदोन तास नमाज पढत बसतात आणि त्यामुळे मुलांच्या शिकविण्याकडे त्यांचे दुर्लक्ष होते. म्हणून शाळेच्या वेळात या भानगडी बंद करा, असे शिक्षणाधिकाऱ्यांनी कळविले आहे.

वाचकहो, ही वार्ता वाचून माझ्या अंतःकरणाला खरोखर इंगळ्या डसाव्यात, तशा वेदना झाल्या बरे. खरे म्हणजे मला रडूच यायचं, पण थोडक्यात राहिले. आमच्या शिक्षणखात्यात इतकी मंदमती माणसे भरलेली असतील, अशी मला कल्पना नव्हती. उर्दू शाळा सरकारने कशासाठी काढल्या आहेत, हे या शहाण्या शिक्षणतज्ज्ञांनाही समजत नाही म्हणजे काय म्हणावे! उर्दू शाळा या आपल्या प्रिय मुसलमान–बांधवांचे दुर्लभ प्रेम संपादन करण्यासाठीच आहेत, एवढेदेखील यांना कळू नये अं? या देशात मुसलमान म्हटले म्हणजे केवळ ‘पितृकरतळस्थ हा फोड.’ त्यांचे जेवढे कोडकौतुक करता येईल, तेवढे आपण केलेच पाहिजे. ते म्हणाले की, आम्हाला वेगळे घर पाहिजे; की आपण वेगळं घर त्यांना करून दिले. मागे ते म्हणाले की, आम्हाला उर्दू हवी, हिंदी नको. त्यावेळी पूज्य बापूजींनी ‘हिंदी याने

हिंदुस्तानी याने उर्दू ' नावाची एक खिचडी-भाषा तयार केली. देवनागरी आणि उर्दू या दोन्ही लिप्या राष्ट्रीय लिप्या म्हणून ठरवून टाकल्या. आमचे हे लाडके भाऊ म्हणाले की, तुमच्या त्या ' वंदे मातरम् 'मधील ' त्वं हि दुर्गा दशप्रहरधारिणीम् ' आणि ' तोमार हि प्रतिमा मंदिरे मंदिरे ' या ओळी आम्हाला खटकतात; तेव्हा बापूजींनी ती सगळी कडवीच गाळून टाकली. गांधी-नेहरू यांच्यापासून जे काही शिकावयाचे ते हेच. आपल्या काँग्रेस सरकारने या गरीब आणि पददलित बांधवांची सेवा किती नाना प्रकारांनी चालविली आहे, ते तरी जरा डोळे उघडे ठेवून पाहायचे होते. शेख अब्दुल्लाचा रुबाब तुरुंगातसुद्धा किती ठेवला जातो, हे या शहाण्यांना माहीत नसेल काय ? मग हे असले पत्रक काढण्याचे धाडस झालेच कसे ? कोठेही नमाज पढण्याचा मुसलमानांचा हक्कच आहे मुळी. त्यांच्या धर्मात तर असे सांगितले आहे, की दिवसातून पाचपाचवेळा नमाज पढत जावा म्हणून. मग गरीब बिचाऱ्या उर्दू शिक्षकांनी, शिकवणे थोडे बाजूला ठेवून, दोन तास परमेश्वराची करुणा भाकण्यात खर्च केले तर बिघडते कोठे ! त्यांच्या प्रार्थनेने झाला तर परमेश्वर प्रसन्न होईल ना ? आणि झाले तर या ' जहान्नम 'चे ' परिस्तान 'च होईल ना ? का काही वाईट होईल ?

आमचे तर असे म्हणणे आहे की, शिक्षणाधिकाऱ्यांनी ही अन्याय्य आज्ञा ताबडतोब मागे घ्यावी. जितका वेळ शिक्षकांना नमाज पढायचा असेल, तितका वेळ पढण्याची मुभा द्यावी. फार काय, अशा वेळी त्यांना शाळेच्या—म्हणजे सरकारच्याच—वतीने खास चटया, सतरंज्या आणि पाय धुण्यासाठी पाणी इ. साहित्य पुरविण्यात यावे. मुलांना तोपर्यंत दूर कोठेतरी गोटया वगैरे खेळून वेळ काढण्यास सांगावे, म्हणजे आसपास शांतता राहील. या भगवतभक्तांचे चित्त अल्लाच्या चरणी पूर्णपणे तल्लीन होऊन जाईल. मुलांचे अभ्यासाचे नुकसान होईल अशीच भीती वाटत असेल तर एक मार्ग आहे. अशा सर्व शाळांतून काही स्पेशल हिंदू शिक्षक नेमण्यात यावेत. त्यांनी नमाजाच्या वेळात मुले वळण्याचे काम करून यांच्या चित्ताला संतोष देण्याचे कार्य करीत राहावे. असे झाले तरच त्यांना सर्व जगाबद्दल सद्भाव वाटेल आणि हिंदू लोकांबद्दल किंचित प्रेमही निर्माण होईल. राष्ट्रीय ऐक्य हवे असेल, तर या गोष्टी केल्याच पाहिजेत. नाहीतर थोडयाच अवधीत उर्दू शाळांत केवळ मुलांना शिकवण्याचेच काम करावे लागून मुसलमान—समाजात हाहाकार माजण्याचा संभव आहे. मग आपल्या देशाचे कसे होईल ?

— ग्यानबा

Statement about ownership and other particulars
( 'MANOOS' Fortnightly )

FORM IV
( See Rule 8 )

| | |
|---|---|
| 1. Place of Publication | POONA |
| 2. Periodicity of its publication | Fortnightly |
| 3. Printer's Name<br>Nationality<br>Address | S. G. Mazgaokar<br>INDIAN<br>419 Narayan Peth, Poona 2 |
| 4. Publisher's Name<br>Nationality<br>Address | As above |
| 5. Editor's Name<br>Nationality<br>Address | As above |
| 6. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital. | Rajhansa Prakashan<br>419 Narayan Peth,<br>Poona 2<br>(1) S. G. Mazgaokar<br>(2) B. M. Purandare |

I, S. G. Mazgaokar, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 1–3–1966

Signature of Publisher
S. G. Mazgaokar



: लेखक :

# ज्युलासची आत्मकथा

झेकोस्लोव्हाकिया नाझीच्या टाचेखाली तुडवला जात होता; त्या काळात घडलेली ही एक सत्यकथा.

शेकडो, हजारो, लाखो झेक–नागरिक नाझी राजवटीशी तडजोड करीत होते, शरण जात होते, गुलामीचे जीवन पत्करीत होते. पण काही असेही होते, की जे भूमिगत होऊन प्रतिकाराचा लढा लढवीत होते, स्वातंत्र्याची स्वप्ने पाहत होते.

अशांपैकीच प्रस्तुत आत्मकथेचा नायक व लेखक ज्युलास फुचिक हा एक. 'रूह प्राव्हो' या कम्युनिस्ट पत्राचा तो संपादक होता.

जर्मन गेस्टॅपोने ज्युलासला २४ एप्रिल, १९४२ ला पकडले आणि ८ सप्टेंबर, १९४३ ला त्याला फासावर लटकवण्यात आले.

मृत्यूकडे चाललेल्या त्याच्या तुरुंगातील प्रवासाची ही त्यानेच सांगितलेली कथा.

"*Notes from the gallows*" : Julius Fuchik.

अनुवादक : वि. शं. पारगावकर

# ज्युलासची आत्मकथा

## १

पाचच मिनिटांत घड्याळात दहाचे ठोके पडतील. एप्रिलच्या २४ तारखेची हिवाळ्यातील सुंदर संध्याकाळ. वर्ष १९४२.

मला जाण्याची घाई आहे. मोठ्या माणसाच्या जबाबदारीचे ढोंग मनाला फुलवीत आहे. कर्फ्यू १० ला सुरू होते. त्या अगोदर जेलेनेक्स येथील आमच्या इमारतीत पोहोचलेच पाहिजे. तिथे माझा मित्र मायरेक माझी वाट पाहत असेल. मला माहीत आहे की, त्याच्याजवळ मला सांगण्यासारखे काही महत्त्वाचे सध्या नाही आहे. माझ्याजवळही तूर्त तसे काही नाही. परंतु भेट चुकवणे योग्य नाही, त्यामुळे घबराट पसरेल आणि त्यात दोन जिवलग मित्रांत आणखी संकटे उभी राहणे योग्य नाही.

चहाच्या टेबलावर आमची भेट होते. मायरेक तेथेच असतो आणि फ्राइड जोडपेही. हे अनावश्यक धाडस. "तुमच्या भेटीने आनंद झाला. परंतु अशा रीतीने एकत्र भेट मी अपेक्षिली नव्हती. एकाच वेळी एका खोलीत इतकी माणसे असणे — जणू तुरुंगाच्या रस्त्यावरील एक पाऊलच. तुम्हाला आपल्या नियमांचे काटेकोरपणे पालन तरी करावे लागेल अथवा आम्हाला सोडून तरी जावे लागेल. अशा वागण्यामुळे तुम्ही स्वत:बरोबर आमचेही जीवन धोक्यात आणीत आहात. माझं बोलणं समजावून घेऊ शकाल ना ?"

"होय."

"ठीक, माझ्यासाठी काय बातमी आहे ?"

"रेड राइट' चा मेचा अंक."

"उत्तम. आणि तू, मिरको ?"

"नवीन काहीच नाही. काम ठीक चालले आहे......"

"हे ठीक झाले. मेनंतर आपण भेटू. मी निरोप पाठवीन."

"आणखी एक कप चहा."

"नको, नको, मिसेस जेलिनेस. इथे आणखी बरेच आहेत."

"एक कप तरी घ्या."

चहाच्या कपातून गरम वाफा निघतात.

दारावर कुणीतरी घंटा वाजवते.

इतक्या रात्री ? कोण असेल बरे ?

काही भेट घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्ती अधीर आहेत, त्यांनीच दार वाजवले असेल.

" दार उघडा ! पोलीस ! "

लवकर खिडकीतून उडी टाका. निसटून जा. माझ्याजवळ पिस्तूल आहे, मी त्यांना रोखून धरतो. पण आता फार उशीर झाला. गेस्टॅपोची माणसे खिडकीखालीही उभी आहेत. त्यांनी आपल्या खोलीवर पिस्तूल रोखलेले आहे. बाहेरच्या लोकांनी जोर करून दार उघडले आणि स्वयंपाकघरातून ते आत घुसले. एक, दोन, तीन......नऊ एकंदर. ते मला पाहू शकत नव्हते, कारण मी दाराच्या पाठीमागे होतो. त्यांच्या हातातील नऊ पिस्तुले दोन स्त्रिया आणि तीन अविवाहित माणसे यांच्यावर रोखलेली होती. मी जर गोळी सोडली असती तर त्या आधीच माझे पाच मित्र त्यांच्या गोळयांना बळी पडले असते. मी स्वत:वरही गोळी झाडून उपयोग नव्हता, कारण त्यामुळे मी अधिक ते पाच, अशांना बळी जावे लागलेच असते. मी गोळी न झाडल्यानेच फार तर त्यांना सहा महिने तुरुंगात जावे लागेल आणि आमच्या क्रांतीमुळे ते पुन्हा मुक्त होतील. फक्त मायरेक आणि मी जिवंत बाहेर पडू शकणार नव्हतो. त्यांनी आमचा बळी घेतलाच असता. त्यांना माझ्यापासून काहीही मिळणार नाही, पण मायरेकचे काय ? हा माणूस, स्पेनमध्ये लढलेला, दोन वर्षे फ्रान्सच्या कोंडवाड्यात राहिलेला आणि आता फ्रान्समधून येथे प्रागमध्ये बेकायदेशीरपणे लपूनछपून शिरलेला–युद्ध मध्यावर असताना–नाही, नाही. तोही त्यांच्या हाती काहीही लागू देणार नाही. माझ्याजवळ दोनच क्षण आहेत निर्णय घेण्यासाठी. का तीन क्षण चालतील ?

समजा, मी गोळी झाडली तर, फार तर मी स्वत:ला वाचवू शकेन. पण बाकीच्या पाच लोकांचे काय ? त्यांचेही जगणे मोलाचे आहे. होय, होय ! तर मग निर्णय झाला. मी कोपऱ्यातून बाहेर आलो.

" हा, हा एक बाहेर आला ! "

माझ्या डोक्यात एक दणका बसला.

" हात वर कर. "

आणखी एक धपका, आणखी एक.

हे मी अपेक्षिले होतेच.

बाजूच्या खोलीत खूप फर्निचर पडलेले होते.

सारख्या गचांड्या आणि असह्य मार.

" बरोबर चल. "

त्यांनी मला धक्के देऊन गाडीत कोंबले. पिस्तूल नेहमी माझ्यावर रोखलेलेच होते. गाडी सुरू झाली.

" तू कोण आहेस ? "

" प्रोफेसर होरॅक."

" तू खोटे बोलतोस."

मी फक्त खांदे हलविले.

" नीट बैस, नाहीतर गोळी झाडू."

" ठीक आहे ! झाडा गोळी ! "

गोळीऐवजी त्यांनी मला एक गचांडी दिली. आम्ही दुसऱ्या एका गाडीत बसलो. लग्नाच्या गाडीत रात्रीच्या वेळी ? मला ताप आल्यासारखे भासत होते.

पेट् चेकची इमारत, गेस्टॅपोचे प्रमुख ठाणे. मी इथे जिवंत येऊ शकेन, असे मला वाटले नव्हते. त्यांनी मला पळवीत चौथ्या मजल्यापर्यंत नेले. हेच ते कम्युनिस्ट-विरोधी संशोधन केंद्र. माझी उत्सुकता जागृत झाली. या केंद्राचा प्रमुख माझ्या-जवळ आला. त्याने आपले पिस्तूल खिशात घातले आणि मला बाजूच्या खोलीत घेऊन गेला. त्याने माझी सिगरेट पेटवली.

" तू कोण आहेस ? "

" प्रोफेसर होरॅक."

" तू खोटं बोलतोस."

त्याच्या मनगटावरील घड्याळात अकरा वाजले होते.

" ह्याची झडती घ्या."

त्यांनी मला नागवे केले आणि माझी झडती घेऊ लागले.

" त्याच्याजवळ एक ओळखपत्र आहे."

" काय नाव आहे ? "

" प्रोफेसर होरॅक."

" या नावाचा शोध घ्या."

त्यांनी फोन केला.

" हे नाव रजिस्टर्ड झालेले नाही. ओळखपत्र चोरीचे वाटते."

" हे तुला कोणी दिले ? "

" पोलिसांच्या प्रमुख कचेरीतून."

त्याचबरोबर माझ्या अंगावर काठीचा एक फटका बसला. मग दुसरा, तिसरा ......किती मोजू ? या संख्या-शास्त्राची कोण नोंद घेणार !

" तुझे नाव सांग. बोल. त्यांचे पत्ते सांग. बोल, बोल, बोल. नाहीतर खूप मार खावा लागेल."

माणूस किती फटके खाऊ शकेल !

मध्यरात्रीचे रेडिओ चालू आहेत. हॉटेल्स बंद झाली असतील. शेवटचे पाहुणे घराकडे परतत असतील. प्रेमी जोडपे दाराशी उभे राहून एकमेकांना निरोप देण्याची भाषा बोलत असतील. तो उंचेला सडपातळ प्रमुख खोलीत आला. त्याच्या

चेहऱ्यावर हसू दिसत होते.

" सर्व काही कळले, संपादकमहाशय ? "

ते त्यांना कुणी सांगितले ? जेली नेक्सने ? का फ्राइटस्ने ? हे कसे घडले ? त्यांना तर माझे नावदेखील माहीत नव्हते.

" हे बघ, आम्हाला आता सर्व काही कळले आहे. बोल ! "

मी काहीच बोललो नाही.

" त्याला चहूकडून बांधून टाका आणि आणखी प्रसाद द्या. "

रात्रीचा एक. शेवटच्या गाड्या रस्त्याने जात आहेत. हळूहळू रस्ते रिकामे होत आहेत. रेडिओमधून शेवटपर्यंत कार्यक्रम ऐकणाऱ्या प्रामाणिक श्रोत्यांना शुभ-संदेश मिळत आहेत.

" केंद्र समितीचे आणखी कोण कोण सभासद आहेत ? तुमचे ट्रान्समिटर कुठे कुठे आहेत ? तुमचे छपाईचे केंद्र कुठे आहे ? घडाघडा बोल ? "

आता माझ्यावर बसत असलेल्या फटक्यांचे आवाज मी ऐकू लागलो. वेदना फक्त ओठांशी येऊन थांबत होत्या.

" त्याचे बूट काढा. "

बरोबर आहे. माझे पाय अजून सुरक्षित होते ना ? एक, दोन, तीन, चार...... तळव्यावर फटके बसत होते आणि त्यांच्या वेदना मेंदूत धडका घेत होत्या.

आता दोन वाजले होते. प्राग शहर झोपले होते. झोपेतच एखादे मूल रडल्याचा आवाज येत होता एवढेच.

" बोल, बोल ! "

माझी जीभ दातावरून फिरत होती आणि माराने किती दात पडले आहेत, याची मोजदाद करीत होती. आता मी फटके मोजू शकत नव्हतो. मारणारे थकले होते, परंतु मृत्यू येत नव्हता.

तीन वाजून गेले होते. सकाळच्या हालचाली चालू होत्या. मोठमोठाले ट्रक्स मार्केटकडे धाव घेत होते. रस्ता झाडणारे कामाला लागले होते. कदाचित आणखी एक दिवस या शहराची धावपळ मी पाहू शकेन.

त्यांनी माझ्या बायकोला आणून माझ्या समोर उभी केली.

" तू याला ओळखतेस का ? "

मी माझ्या तोंडातील रक्त आतल्या आत गिळून घेतले—माझे हाल तिला दिसू नयेत म्हणून. परंतु ही धडपड निरर्थक होती. कारण माझ्या चेहऱ्यावरील प्रत्येक इंच रक्ताळलेला होता. माझी बोटे फुटून त्यांतूनही रक्त वाहत होते.

" तू याला ओळखतेस काय ? " पुन्हा करडा प्रश्न.

" नाही, मी ओळखत नाही. "

तिने हे उत्तर इतक्या सहजतेने आणि निर्विकार भावनेने दिले ! त्यामुळे मी

चकितच झालो. माझी बायको म्हणजे शंभर नंबरी सोने. तिने आतापर्यंत प्रत्येक वेळी माझे नाव उघडे होऊ नये, याची खबरदारी घेतलेली होती. मग माझे नाव यांना कळले तरी कसे ?

चार वाजून गेले होते. आता पहाट तरी केव्हा फुटेल ? अंधारलेल्या खिडक्या माझ्या मनातील प्रश्नाचे उत्तर देऊ शकत नव्हत्या आणि मृत्यू हळूहळू जवळ सरकत होता, का मीच त्याला भेटायला त्याच्या जवळजवळ जात होतो ? काही समजत नव्हते.


मी कोणाच्यातरी धक्क्याने पाठीमागे कोलमडलो आणि जमिनीवर पडलो. त्याने मला लाथ घातली आणि आपल्या बुटाचे शिक्के माझ्या पाठीवर मारण्यास सुरवात केली. आता ठीक आहे ! यामुळे तरी शेवट लवकर येईल. एक काळीकभिन्न व्यक्ती माझ्या हनुवटीवर ठोसे देऊन विदारक हसत होती. हा सारा विनोदच होता. थोड्याच वेळात मी पूर्णपणे वेदनाविरहीत झालो.

पाच वाजले आहेत—सहा—सात—दहा. नंतर दुपार. कामगार आपल्या निवासस्थानी बसलेले, मुले शाळेत गेलेली आहेत. लोक खरेदी-विक्रीचा व्यवहार संपवून बाराला जेवणासाठी घरी गेलेले आहेत. कदाचित आईच्या मनात या वेळी माझ्याविषयी विचार चाललेले असतील. माझे सहकारी मला अटक झाल्यामुळे बेचैन असतील आणि स्वत: न पकडले जाण्याविषयी सावधगिरीचे प्रयत्न करत असतील. मी जर त्यांच्याविषयी बोललो तर...नाही, मी तसे कधीही करणार नाही. त्यांनी माझ्यावर पूर्ण विश्वास टाकला पाहिजे. माझ्या सच्चेपणावर. कसेही असो, आता शेवट फार दूर नाही. माराचे घाव माझ्या सर्वांगावर आहेत. मला बेशुद्धीतून ओढून आणण्यासाठी ते माझ्यावर पाणी मारीत आहेत. पुन्हा आणखी मार, आणखी आरडाओरडा. "बोल ! बोल ! बोल !" परंतु अजून मरण येत नाही. आई, बाबा, तुम्ही मला एवढे दणकट का बनवलेत ?

दुपारची वेळ. जवळजवळ पाच वाजले असावेत. या वेळी ते सर्व थकलेले दिसतात. मध्ये बराच वेळ अंतर ठेवून त्यांचे मारण्याचे काम चालूच आहे. एकाएकी दूर अंतरावरून, मोजता येणार नाही इतक्या अंतरावरून एक शांत मृदू आवाज येतो—

" आता बस करा. "

त्यानंतर बऱ्याच वेळाने मी एका टेबलावर बसलो. कुणीतरी जवळ आलं आणि त्याने मला पाणी दिलं. अशाच एकाने माझ्यापुढे सिगरेट केली, परंतु ती मला हातात धरता आली नाही. नंतर अर्धवट आधार देत त्याने मला खालती आणले आणि एका गाडीत घातले. आम्ही जसजसे पुढे चाललो, तसे अनेकांनी जणू माझ्यावर रोखलेल्या पिस्तुलांचे पांघरूण घातले. माझ्या स्थितीकडे पाहता हे दृश्य किती हास्यापद होते नाही ? पुन्हा मला एक गाडी दिसली. सजविलेली, शुभ्र फुलांनी नटवलेली, लग्नाच्या वरातीसाठी सजवलेल्याप्रमाणे ती दिसत होती...कदाचित हे



आई, बाबा, तुम्ही मला एवढे दणकट का बनवलेत ?

माझे स्वप्नही असेल. स्वप्न असेल, ताप असेल, मृत्यूची अवस्था असेल, अथवा प्रत्यक्ष मृत्यूदेखील असेल. परंतु मरणे हे फार क्लेशदायक असते. त्या मानाने हे सोपेच वाटत होते.

सर्व नाहीसे झाले...नाही, नाही, अजून नाही. आता मी उभा आहे, खरोखर एकटा उभा आहे, मी कशाचाही आधार घेतलेला नाही. जवळच माझ्यासमोर एक पिवळी भिंत दिसत आहे–कशाने तरी बरबटलेली...कशाने बरे ? रक्ताने ! तशीच दिसत होती–अगदी ओल्या रक्ताने बरबटलेली. मी माझे बोट लांबवून भिंतीला चिकटविले आणि ते नाकाजवळ नेले. शंकाच नव्हती. ते ताजे रक्त... माझेच रक्त...

इतक्यात माझ्यामागून करडा आवाज आला. माझे बाहू कुणीतरी वर उचलले आणि तिसऱ्या खेपेस मला पुन्हा त्यांनी खाली पाडले. ती उंचेली व्यक्ती माझ्या जवळ उभी होती आणि लाथेने ठोकरून मला म्हणत होती, उठून उभा राहा. पुन्हा काही वेळाने कुणीतरी माझे तोंड धूत होते. मी टेबलाशी बसलो होतो. एक स्त्री मला कसलेतरी औषध देत होती आणि आणखी कुठे जबरदस्त मार लागला आहे काय, याची चौकशी करत होती. मी म्हणालो, "सर्व दुःख माझ्या हृदयात फक्त भरून राहिलेले आहे."

" तुला हृदय नाही." तो उंचेला गृहस्थ करड्या आवाजात म्हणाला.

" नक्कीच आहे." मी म्हणालो आणि तेवढ्यातही माझी छाती अभिमानाने फुलल्यासारखी वाटली. माझ्या हृदयाच्या बाजूने मी धाडसाने उभा राहू शकलो, याचा मला अभिमान वाटला.

नंतर सर्व काही नाहीसे झाले–ती भिंत, ती औषध देणारी स्त्री आणि तो उंच करडा माणूस.

पुन्हा मी पूर्वपदावर आलो तेव्हा माझ्या समोरचे दार उघडे होते. एक जाडेला माणूस मला ढकलीत होता, माझ्या सदऱ्याला धरून ओढीत होता आणि चटईवर मला उताणे पाडत होता.

" हे पाहा," तो दुसऱ्या माणसाकडे पाहून म्हणाला, " हे बघ, त्या माणसाने आपले काम किती लख्ख केले आहे."

आणखी काही अंतरावरून शांत आवाज आला–

" सकाळपर्यंत तो जगत नाही."

पाचच मिनिटांत दहाचे ठोके पडतील. एका अत्यंत सुंदर हिवाळ्यातील संध्याकाळ, २५ एप्रिल १९४२.

## २

जेव्हा सूर्याची उष्णता आणि तारकांची प्रभा......

निस्तेज होते...... नाहीशी होते......

दोन माणसं, हात खाली सोडून एकमेकांत गुंतविलेले, जणू प्रार्थनेसाठी, खोलीत एका पाठोपाठ एक येतात. त्यांच्या गलबललेल्या स्वरातून दु:खपूर्ण शोकगीत बाहेर पडते.

किती सुखाने आत्मा आपल्या निर्याणाचा मार्ग धरीत आहे......

वर स्वर्गाकडे... स्वर्गाकडे......

कोणी तरी वारलेलं आहे ! कोण ? मी प्रयत्न करतो. डोकावून पाहण्याचा. शवपेटीतल्या प्रेताकडे पाहण्याचा. दोन मेणबत्त्या त्याच्या मस्तकावर प्रकाशझोत टाकीत आहेत.

रात्रीचा काळोख संपलेला आहे.

दिवसाचा अविनाशी प्रकाश उजळून निघाला आहे......

मी पापण्या उचलण्याचा आणि जड झालेली बुबळे हलविण्याचा निकराचा प्रयत्न करीत आहे. जवळपास कोणीच दिसत नाही. त्या दोन व्यक्तींशिवाय दुसरं कोणीच दिसत नाही...आणि मी स्वत: – मग ते कोणासाठी शोकगीत गात आहेत ?

एक तारा दिमाखाने चमकत आहे.

अविनाशी आत्मा......

हे स्मशान आहे. निश्चितपणे हे सारं स्मशानासारखं दिसत आहे. परंतु ते कोणाला पुरीत आहेत ? पाहू तरी तिथे कोण आहे ते. फक्त त्या दोन व्यक्ती आणि मी ! आणि मीच ! मग ही माझीच दफनभूमी असली पाहिजे. परंतु थांबा. ऐका. थोडं माझं ऐका. इथं काहीतरी चूक घडत आहे. कारण मी जिवंत आहे. मी अजून तरी मेलो नाही. मी तुमच्याकडे बुबळे हलवून पाहत आहे ना ! मी तुमच्याशी बोलतही आहे. थांबा. आताच मला पुरू नका !

जेव्हा कोणी आम्हाला शेवटचा निरोप देतो.

शेवटचा निरोप! ......

ते ऐकू शकत नाहीत. का तेच मेलेले आहेत ? मी तर खूप मोठ्याने बोलत आहे. का मीच खरोखर मेलो आहे ? आणि शरीरविरहित आवाज ते ऐकू शकत नाहीत ! माझ्या शरीराचं दफन मीच माझ्या डोळ्यांनी पाहणार आहे काय ? वारे विनोद !

......तो आपली निश्चल दृष्टी वळवितो.

स्वर्गाकडे ......वर स्वर्गाकडे......

आता माझ्या लक्षात आलं. कुणी तरी मला वर उचलण्यासाठी घडपडत होतं. नंतर त्यांनी मला महावस्त्रावर ठेवलं आणि मला ते घेऊन चालले. त्यांच्या बुटांचे आवाज मला ऐकू येत होते– आणि एवढंच. हेच शेवटचं. मला त्यानंतरचं काहीच स्मरत नाही.

...जिथे तो एकमेव प्रकाशकण थांबतो.

पण हे सारंच असंबद्ध आहे. कारण मी अजूनही जिवंत आहे. मला फक्त कुठं तरी वेदना जाणवत आहेत आणि तहानेने माझा जीव व्याकूळ झालेला आहे. मेलेला जीव तहानेने व्याकूळ होऊ शकतो काय ? मग सारी शक्ती एकवटून मी माझं डोकं हलविण्याचा प्रयत्न केला आणि एक चमत्कारिक, माझा मलाच ओळखू न येणारा आवाज माझ्या तोंडून बाहेर पडला –

"पाणी ऽऽ!"

आणि शेवटी ती दोन माणसं चालायची थांबली. नंतर त्यांनी माझ्याकडे वाकून पाहिलं आणि माझ्या ओठांवर पाणी सोडलं.

"बेटा, तुला आता काही तरी खायला हवं आहे. गेले दोन दिवस तू फक्त पाणीच पीत आहेस !"

हा काय सांगत आहे ? सबंध दोन दिवस ? मग आजचा वार कोणता ?

"सोमवार."

सोमवार ! शुक्रवारी मला अटक झाली. बापरे, माझं डोकं किती जड झालं

आहे. शिशाचा रस भरून ठेवल्यासारखं ! आणि हे पाणी किती थंड आहे. झोप. मला झोप घेऊ द्या. सारं सारं थंडगार वाटत आहे. थंड, थंड !

...आणि पुन्हा जेव्हा मला जाग आली ती मंगळवारची रात्र होती. माझ्या चेहऱ्याकडे एक कुत्रा वाकून बघत होता. लांडग्याच्या जातीचा. तो माझ्याकडे आपल्या तरतरीत डोळ्यांवाटे पाहत होता आणि विचारीत होता –

" तू कुठे राहत होतास ? ",

नाही, नाही ! हा कुत्रा कसा असेल ? हा कुठल्यातरी व्यक्तीचा आवाज होता. नक्कीच. कुणी तरी तिथं उभं होतं. मला चक्क त्याचे जाडे बूट दिसत आहेत. आणखी एका बुटांची जोडी. आणखी एका. आणि सोजिराची एक जोडी. मी मान वर करून पाहू शकत नव्हतो. माझं डोकं विलक्षण जड झालेलं होतं. जाऊ द्या. कोण पर्वा करतो ! मला झोप घेऊ द्या ......

बुधवार !

ती दोन माणसं परमेश्वराचं गीत गात होती. ती आता एका टेबलाशी बसून मातीच्या भांड्यातून काहीतरी खात होती. आता मी त्यांना काही तरी सांगू शकलो असतो. एक दुसऱ्यापेक्षा खूपच तरुण होता. ते धर्मगुरू दिसत नव्हते. हे कुठलं मंदिर नसून एका तुरुंगाची ती ओवरी होती. जमिनीवरून अंथरलेल्या वस्तानावरून माझी नजर शेवटपर्यंत फिरली आणि दारापाशी थांबली.

कुलपात किल्ली फिरविल्याचा आवाज होतो. दोन व्यक्ती एकदम उड्या घेतात आणि पवित्र्यात उभ्या राहतात. आणखी दोन व्यक्ती एस्. एस्. च्या गणवेशात येतात आणि अगोदरच्या दोघांना माझ्या अंगावर कपडे चढविण्याचा आदेश देतात. कपडे करताना शरीरातून अगणित कळा बाहेर पडतात. मग ते मला स्ट्रेच-रवर घालतात आणि खाली नेतात. पुन्हा जडशीळ बुटांचे आवाज व्हरांड्यातून घुमतात. माझी शुद्ध हरवली असताना ज्या व्हरांड्यातून मला वर आणलेले असते, तोच हा असावा. आता हा रस्ता कुठे जातो ? कुठल्या नरकात हा संपेल.

एका काळवंडलेल्या, मित्ररहित स्वागतकचेरीत, पोलिसांच्या तुरुंगवासातील पांक्रॅटस्‌मध्ये ! मला तेथेच जमिनीवर ठेवण्यात आलं. क्रुद्ध आवाजातून आलेल्या जर्मन भाषेतील प्रश्नांचे भाषांतर झेक भाषेतून माझ्यापुढे टाकले गेले.

" तू तिला ओळखतोस काय ? "

मी माझ्याच हाताने माझी हनुवटी वर उचलली. स्ट्रेचरकडे तोंड करून एक तरुण मुलगी उभी होती. ती अतिशय ताठ्यात उभी होती. डोकं वर उचललेलं, पण त्यातूनही शालीनता प्रकट व्हावी. फक्त तिची दृष्टी किंचित खाली झुकलेली होती. मला फक्त पाहता यावं, दृष्टिभेट घडावी, अशा बेतानं.

" मी हिला ओळखत नाही. "

त्या एका भयाण रात्री पेझेकच्या इमारतीत मी तिला फक्त एक सेकंद पाहि-

त्याचं मला आठवलं आणि ही दुसरी वेळ. तिला तिसऱ्या वेळी पाहण्याचं दुर्दैवाने माझ्या नशिबात नव्हतं. अ्नॉड लॉरेन्झची ती पत्नी होती. १९४२ च्या मार्शल-लॉच्या पहिल्याच दिवशी तिला फाशी दिलं होतं.

"पण ही व्यक्ती तुला माहीत असेलच."

अचिनका, जिरस्कोवा! तू इथे कशाकरता आलीस?

मी तर तुझं नाव सांगितलं नाही. तुझा माझ्याशी काहीच संबंध नाही. मी तुला ओळखत नाही, ओळखत नाही. समजलं!

"मी हिला ओळखत नाही."

"माणसा, शुद्धीवर ये!"

"मी हिला ओळखत नाही."

"वरं काही हरकत नाही."

अचिनका म्हणते आणि थोड्याशा हालचाली, तिच्या बोटातील रुमालाची चाळवाचाळव होते. जणू मनातील घडपड लपविण्याचा ती प्रयत्न करते. असो. कुणीतरी मला ओळखले असेल.

"कुणी?"

"गप्प बैस!"

त्यांनी तिला उत्तर देण्यापासून परावृत्त केले आणि खोलीबाहेर नेले.

अचिनका!


| | |
|---|---|
| परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस |
| सहा साहसे | दा. सी. देसाई |

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

त्यांच्यातली प्रश्नोत्तरे विरून गेली. नंतर मला अशी जाणीव झाली की, दोन S. S. व्यक्ती मला आपल्या कोठडीत घेऊन जात आहेत. किती निष्काळजीपणाने ते माझा स्ट्रेचर हाताळीत होते आणि भयानक हसून मला विचारीत होते की, फासावर लटकणे तू कितपत पसंत करशील ?

गुरुवार !

आता माझी जाणीव पूर्वपदावर आली होती. माझे दोन शेजारी, त्यांतील एकाचे नाव कारेक असे असून, तो बराच तरुण दिसत होता आणि दुसऱ्याला तो 'बाबा' या नावाने हाक मारीत होता. त्याने स्वत:विषयी मला बरंच काही सांगितलं, पण माझ्या डोक्यात ते उतरलं नाही. त्यांच्या बोलण्यात खाणीविषयी आणि मुलांविषयी काहीतरी आलेलं असावं. लगेच मला घंटा वाजल्याचा आवाज आला. कुठेतरी आग लागली असावी. प्रत्येक दिवशी मला तपासण्यास डॉक्टर येत होता आणि तेथील ऑर्डरलीही काही वाईट नाहीत. आणि काही दिवसांनी सर्व काही ठीक होईल, असे त्यांना वाटत होते. त्या दोघांचा तो आशावाद आतापर्यंतच्या माझ्या अनुभवांशी जुळत नव्हता. ते धडधडीत खोटं बोलत आहेत, असं मला वाटत होतं. सारेच विचित्र !

दुपार !

माझ्या खोलीचे दार उघडले आणि एका कुत्र्याने आत प्रवेश केला. ते माझ्या डोक्याशी थांबले आणि कसलातरी शोध घेत असल्यासारखे ते वातावरण हुंगू लागले. नंतर पुन्हा जडशीळ बूटांचे आवाज. ती व्यक्ती कुत्र्याची मालक होती– पँकरॅट तुरुंगाची अधिकारी आणि दुसरी व्यक्ती कम्युनिस्टविरोधी विभागाची प्रमुख होती– जिने पहिल्या रात्री माझा चांगलाच समाचार घेतलेला होता. तेथे आणखीही काही नागरिक पॅन्टस दिसत होत्या. माझ्या डोळ्यांची हालचाल झाली आणि ओळख पटली. हा तर छापाप्रमुख होता. आता तो खुर्चीवर बसला आणि माझ्यावर प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली.

" तू तुझा डाव हरलास ! आता तुझा जीव तरी वाचव ! बोल ! "

त्याने मला सिगारेट देऊ केली. मला ती नको होती. मी ती हातातदेखील धरू शकत नव्हतो.

" तू किती दिवस बॅकसारबरोबर होतास ? "

बॅकसारबरोबर ! हे तर खूपच झालं. त्यांना हे कसं कळलं ?

" आता तुझ्या लक्षात आलं असेल, आम्हाला सर्व काही कळलं आहे ! बोल !"

तुम्हाला सर्वच काही माहीत आहे, तर मग मी आणखी काय सांगणार ! मी आयुष्याचं अपहरण केलेलं नाही आणि त्याच आयुष्याचा शेवटही मी बिघडू देणार नाही.

ही विचारपूस तासभर चालली होती. तो ओरडत नव्हता, शांतपणे प्रश्न विचा-

रत होता आणि माझ्याकडून उत्तर मिळाले नाही तरी पुढच्या प्रश्नाकडे सरकत होता. प्रश्नावर प्रश्न. त्यांत अंतर नव्हते.

"तुला माहीत आहे? हा शेवट आहे. तू तुझी बाजू हरला आहेस."

"तू एकटाच आहेस! हरला आहेस."

"अजूनही तुझा कम्यूनच्या विजयावर विश्वास आहे?"

"साहजिकच."

"अजूनही त्याचा विश्वास आहे." जर्मन प्रमुखाने छापाप्रमुखास भाषांतर करून सांगितले– "अजूनही त्याचा रशियाच्या विजयावर विश्वास आहे."

"होय होय! त्याशिवाय निराळं काही असूच शकत नाही."

आता मी थकलो. मी सर्व शक्ती जागरूक राहण्यासाठी पणाला लावलेली होती. आता ती जागृतता मंद होत चालली होती. जखमेतून वाहणाऱ्या रक्ताप्रमाणे. त्यातही मला ते माझ्याकडे एकाग्रतेन पाहत असल्याचे भासत होते. जणू माझ्या ललाटावरील मृत्यूचा आलेख ते वाचीत असावेत. काही देशांत अजूनही अशी चाल आहे–ती म्हणजे फाशी जाणाऱ्याच्या कपाळाचे फाशी जाण्यापूर्वी फाशी देणारा चुंबन घेतो.

संध्याकाळ!

दोन व्यक्ती आपल्या छातीवर हातांच्या घडचा करून गोल फिरत कसलं तरी दुःखपूर्ण गीत गात होत्या.

जेव्हा सूर्याची उष्णता आणि तारकांची प्रभा...निस्तेज होते...नाहीशी होते....

अहो, भल्या गृहस्थांनो, थांबवा ते गीत. चांगलेही असेल. परंतु आजची ही संध्याकाळ मे महिन्यातील शुक्रवारची संध्याकाळ आहे. अतिशय सुंदर. खूप खेळकर. सुटीचा दिवस. मी एखादं चांगलं गीत गाण्याचा प्रयत्न करत होतो, तेवढचात कारेक व त्याचा म्हातारबाबा आले. परंतु इथं कुणाला त्याची पर्वा होती! मी माझं


स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

गाणं चालूच ठेवलं. थोड्या वेळाने हळूहळू ते दोघेही माझ्यात सामील झाले. एका चांगल्या मानसिक अवस्थेत मला झोप लागली. मेच्या पहिल्या तारखेची ती सकाळ.


तुरुंगातील घड्याळात तीनचे ठोके पडले आणि आज पहिल्याच प्रथम मला ते स्पष्टपणे ऐकू आले. आता मला पूर्ण शुद्ध आलेली होती. ताजी हवा खिडकीतून आत येत होती. तेवढ्यात मला पुन्हा अनोळखी पावलांचे आवाज जाणवले आणि माझ्या शरीरातून असंख्य कळा निघाल्या आणि माझा शेवट मला दिसू लागला. साधारणतः माणसाला मृत्यूच्या जवळ जाण्यास खूप काळ लागतो. मला माझं आयुष्य उत्तमपणे, आनंदात, निर्भयतेने, लोकांवर प्रेम करीत आणि प्रेम संपादीत व्यतीत करायचे होते. आताच तर मी कुठे तारुण्यात प्रवेश केला आहे, अजून खूप उमेद आहे – पण आता काय उपयोग ! आता हे फार थोड्या दिवसांचे आहे. सारे सारे नाहीसे होत आहे.

मी आयुष्यावर प्रेम करतो आणि त्याचे सौंदर्य टिकवण्यासाठीच मी झगडत आहे. मी मनुष्यमात्रावर प्रेम केले आणि त्यांच्या परत प्रेमाने मी पुलकित झालो. त्यांना मी जिथे समजू शकलो नाही. तिथे, त्या वेळी मला फार दुःख झालं. तुम्ही, मी जिथे कुठे चुकलो असेन, त्या बाबत मला क्षमा केली पाहिजे. माझे हे दुःख माझ्या नावाशी चिकटता उपयोगी नाही, ही माझी शेवटली इच्छा आहे. आई, वडील, भाऊ, बहीण आणि गुस्ता – तुम्हा सर्वांपासून आणि कॉम्रेड्स – ज्यांनी सर्वांनी माझ्यावर प्रेम केलं त्या सर्वांपासून माझी हीच अपेक्षा आहे. तुमची अशी कल्पना असेल की, डोळ्यांतील अश्रूंनी दुःख विरून जातात, तर थोडा वेळ रडण्यास माझी हरकत नाही. परंतु वाईट वाटून घेऊ नका. मी आनंदासाठी जगलो आणि आनंदासाठी जगत आहे, म्हणून माझ्या आनंदावर दुःखाचे थडगे बांधणे योग्य होणार नाही.

मेचा पहिला दिवस. या दिवशी आम्ही खूप सकाळीच उठत असू आणि मेचा झेंडा उभारण्याच्या गडबडीत सकाळ साजरी करत असू. याच वेळी मॉस्कोतील कर्तबगार लोक मेच्या परेडीसाठी रस्त्यात जमत असत. आताच्या काळात लाखो लोक स्वातंत्र्यासाठी शेवटचा लढा देत आहेत आणि हजारो वीर स्वातंत्र्यासाठी धारातीर्थी पडत आहेत. मी त्यांच्यापैकीच एक आहे. त्यांच्यापैकीच एक असणं हे केवढं भाग्य ! शेवटच्या युद्धासाठी देह ठेवण्यास सज्ज झालेला एक शिपाईगडी.

परंतु मृत्यू हा काही तितकासा सुंदर नाही. माझा श्वास कोंडत आहे, घशात काहीतरी दाटलेलं आहे; काहीतरी अडकलेलं आहे. माझ्या कैदीमित्रांना उठवायला हवं. थोडंसं पाणी मिळाल्यास कदाचित बरं वाटेल. परंतु पाणीही संपलेलं आहे. कदाचित न्हाणीघरात थोडंसं असेल. तिथपर्यंत जाण्यास मात्र मला शक्ती हवी आहे. एवढी शक्ती माझ्याजवळ आहे काय ?

परंतु माझ्या मृत्यूचं सौंदर्य कुणालाही जागं न करण्यातच आहे. धडपडत मी बाथरूमकडे गेलो आणि अधाशासारखे पाण्याचे घोट घशाखाली ढकलले.



**अजून खूप उमेद आहे – पण आता काय उपयोग !**

हे असे किती वेळ चालणार ! पुन्हा माझी शुद्ध हरपत आहे. मी माझ्या मनगटावर बोटे ठेवून नाडी शोधीत आहे, परंतु नाडी सापडत नाही आणि माझी शुद्ध हरपते. काही काळानंतर कॅरेकचा आवाज येतो–

" बाबा, बाबा, तुम्हाला काही ऐकू येत आहे काय ? या गरीब माणसाला शेवटची घरघर लागलेली आहे. "

सकाळी डॉक्टर येतात.

परंतु ते सारं मला नंतर कळतं.

ते आले, माझी परीक्षा झाली आणि त्यांनी नकारार्थी मान हलविली. बाजूच्या खोलीत जाऊन त्यांनी कागद फाडला आणि माझ्या मृत्यूचा त्यांनी रिपोर्ट तयार केला.

" त्याची प्रकृती घोड्यासारखी आहे. "

## ३

दारापासून खिडकीपर्यंत सात पावले अन् खिडकीपासून दारापर्यंत सात पावले.

हे आता मला पूर्णपणे पाठ झालेले आहे. हे अंतर मी पँकरॅटच्या तुरुंगाच्या

कोठडीतून कितीतरी वेळा कापलेले आहे. झेक राष्ट्राच्या दुर्दैवी राजकीय इतिहासाची कथा आणि आमच्या कमनशिबी नागरिकांचे दु:ख या खिडकीतून मला स्पष्ट दिसते आहे. हा असा अंधार किती दिवस चालणार ? लोकांचे डोळे उघडण्यास अजून किती शतके हवी आहेत ! किती काळ या दुर्दैवी लोकांच्या जथ्यांनी तुरुंगाची भरती होणार आहे ! मनुष्याच्या मुक्तीसाठी रस्ता कधी सापडणार ? परंतु मनुष्य जागा होत आहे. हळूहळू का होईना, जाग त्याच्या डोळयांत चमकत आहे.

नंबर २६७ ही आमची कोठडी. मी एक-दोन आठवडे, एक महिना, सहा आठवडे चटईवर पडून आहे. जणू मी नुकताच पुनर्जन्म घेतलेला आहे. मी माझे डोळे वळविले आणि हात उंच केले. एका कोपरावर तोलून मी अंग जरासे उंच केले आणि पाठीवर वळण्याचा प्रयत्न केला. परंतु ते साधले नाही.

आता आमच्या खोलीत थोडा बदल झालेला आहे. खोलीवरील नवीन नावाऐवजी आता तिथे दोनच नावे आहेत. होरॅक हा नाहीसा झालेला आहे. तो तरुण जीव माझ्या दफनभूमीजवळ शोकगीत गाणाऱ्या दोन व्यक्तींपैकी एक. त्यांनी आता काही मागे ठेवले असेल, तर त्या फक्त आठवणी. सालस स्वभावाच्या हृदयाशी भिडणाऱ्या आठवणी–मी अर्धवट स्वप्नात असता त्या जाग्या होतात आणि त्याच्या शेवटच्या दोन दिवसांपूर्वीच्या मुक्कामाभोवती रुंजी घालतात. तो पुन्हा पुन्हा स्वतःच्या प्रकरणाविषयी सविस्तर माहिती देत असतो आणि त्याच्या आठवणींच्या मध्यावर मला गाढ झोप लागलेली असते.

त्याचे नाव कॅरेक माल्टेझ. तो एक मेकॅनिक होता. लोखंडाच्या खाणीत काम करणारा. त्याने तिथूनच भूमिगत राहून लढा देण्यासाठी स्फोटकद्रव्ये आणली होती. दोन वर्षांपूर्वी त्याला अटक झाली होती. कदाचित बर्लिन शहरात त्याच्यावर खटला सुरू होणार असेल. ती एक टोळीच होती. कुणास ठाऊक, त्यांना काय शिक्षा होईल राम जाणे. त्याला बायको आणि दोन मुले आहेत. त्याचं त्यांच्यावर अतोनात प्रेम आहे. तो म्हणायचा–प्रेमाशिवाय मी त्यांना दुसरं काय देऊ शकलो असतो !

तो माझ्या टेबलाशेजारी बसून मला काहीतरी खाण्याचा आग्रह करीत असे. परंतु मला अन्न जात नव्हतं. शनिवारी मला इथे येऊन आठ दिवस झाले होते. त्याने आपल्या चातुर्याने, मी आतापर्यंत अन्नाचा कणदेखील घेतला नाही, हे पोलीस–अधिकाऱ्यांना पटवले होते. मोठ्या पराकाष्ठेने रविवारी त्याने सूप माझ्या गळी उतरवले आणि त्याने आणखी आग्रह केला.

पण मी अधिक घेऊ शकत नव्हतो. आतून सोललेला माझा घसा काहीही आत सोडण्यास तयार नव्हता–गूलॅश नावाचे खाद्यदेखील. मग मोठ्या अनिच्छेने त्याने ते बावात आणि स्वतःत वाटून घेतले.

त्या दिवसानंतर एका रात्री दोन वाजता होरॅकला झोपेतून उठवण्यात आले. काही मिनिटांतच ही खोली सोडण्यासाठी तत्पर राहण्यास त्याला आज्ञा दिली होती. जणू काही आयुष्याच्या शेवटच्या यात्रेला निघण्यापूर्वी हुलकावणी देऊन तो आपला मार्ग बदलणार होता ! त्याला कुठे घेऊन जाणार होते ? दुसऱ्या तुरुंगात, कोंडवाड्यात, का फाशी देण्यापूर्वीच्या एकमेव कोठडीत ! हे कुणालाच सांगता येत नव्हते. तो माझ्यापुढे किंचित वाकला. आपले हात त्याने माझ्या खांद्यावर ठेवले आणि त्याने माझ्या कपाळाचे चुंबन घेतले. त्याबरोबर लगेच बाहेरच्या सोप्यातून करडा आवाज गरजला, "पॅंकरॅटस्च्या तुरुंगातील लोकांना भावनाप्रधान होण्याची बंदी आहे."–होरॅक झटपट दाराकडे पळाला. दार बंद केले गेले...आणि नंतर आम्ही दोघेच या खोलीत उरलो.

हे फक्त त्यावेळचे शब्दांत पकडता आलेले अनुभव आहेत. त्यानंतर एक वर्षाचा काळ गेला. खोलीत दोन, तीन...तीन–दोन...दोन, तीन, दोन असे बदल होत राहिले. नवा माणूस येई–पुन्हा त्याला घेऊन जात. पुन्हा नवा येई–पुन्हा त्याला घेऊन जात. आम्ही दोघे मात्र आतापर्यंत खोली नंबर २६७ मध्ये इमानेइतबारे आपले अस्तित्व प्रकट करीत आलो आहोत.

बाबा आणि मी !

बाबा हे साठ वर्षे वयाचे एक शिक्षक आहेत. अटक झालेल्या शिक्षकांत ते सर्वांत वयस्कर आहेत. माझ्या येण्यापूर्वी पंच्याऐंशी दिवस अगोदर त्यांना अटक झालेली आहे. कारण जर्मन राज्यसत्ता उलथून पाडण्याचा कट त्याने केला होता. झेक–शाळांच्या सुधारणांसाठी त्यांनी एक योजना आखलेली होती.

बाबा, पण......

हे तुला कसं सांगणार ? हे एक मोठेच काम आहे. दोन माणसांचे एक वर्षाचे काम.

तो रात्रन्‌रात्र माझ्यापाशी बसू लागला. आपल्या पांढऱ्या कपड्यांच्या आच्छादनाने माझ्याभोवती घिरट्या घालणाऱ्या मृत्यूला आळवू लागला. माझ्या जखमांतील पू तो हळूवारपणे पुसू लागला. ज्या ज्या वेळी मला कोठडीच्या बाहेर घेऊन जात, त्या त्या वेळी त्याची करुण वत्सल दृष्टी माझ्यावर खिळून राहिलेली असे आणि मला परत आणून टाकल्यावर माझ्या ताज्या जखमांवर मलमपट्टी त्यालाच करावी लागे. एखाद्या रात्री जर मला बाहेर नेले गले तर ती संबंध रात्र तो जागून काढत असे.

अशा रीतीने आमच्यामध्ये एकप्रकारच्या नात्याला सुरवात झालेली होती.

परंतु या साऱ्याच घटना मला कशा लिहिता येणार ? २६७ नंबरच्या कोठडीचे या वर्षातील जीवन फार समृद्ध आहे. ते जीवन बाबाने पाहिलेले आहे.

कधीकधी निरीक्षक बाहेरच्या व्हरांड्यात खाडखाड बूट वाजवत येत. मनात

आले तर ब्लँकेट बाजूला सारून माझ्या जखमा ते धुऊन काढीत. खुषीत असले तर रानटी विनोद करीत, नसतील तर मुकाटचाने निघून जात. त्यांपैकी एकाचे नाव स्मारटी असे होते. तो आला म्हणजे नेहमी माझा उल्लेख 'लाल राक्षस' असा करीत असे. आणि या लाल राक्षसाला काय हवे, वगैरेची चौकशी करत असे. एके दिवशी त्याच्या लक्षात आले की, मला न्हाव्याची गरज आहे. तेव्हा त्याने दुसऱ्या दिवशी एका न्हाव्याला माझ्याकडे पाठवून दिले.

हा न्हावी येथील पहिला कैदी होता. त्याच्याकडूनच आम्ही कॉमरेड बोचेकशी संबंध साधला. या न्हाव्याने जेव्हा माझे डोके केस कापण्यासाठी हाती घेतले, तेव्हा त्याच्या लक्षात आले की, माझे शरीर म्हणजे फक्त एका प्रेताचे शरीर आहे.

"धीराने वाग, मुला!"

दोन दिवसांनंतर आणखी दोन कैद्यांशी माझा संबंध आला. तुरुंगाचे अधिकारी माझ्याकडे पाहून अस्वस्थ होत होते.

या वेळी त्यांनी मला बाहेर नेहमीच्या खोलीत नेले नाही. एका मोठ्या माणसाने गजबजलेल्या हॉलमध्ये त्यांनी मला आणले होते. तिथे कैद्यांना भेटायला येणाऱ्या लोकांची गर्दी असे.

नंतर त्यांनी मला तुरुंगाच्या कोर्टयार्डात नेले. ड्रायव्हरसह दोन अधिकारी माझ्या उशाशी पिस्तूल रोखून उभे होते. रस्ता खराब होता. इतका खराब होता की त्यामुळे बसणाऱ्या दणक्यांनी माझी शुद्ध हरवलेली होती. माझ्याविषयीची सुनावणी चालू असतानाच मी बेशुद्ध होतो. त्यामुळे त्यांनी मला पूर्वस्थळी आणले आणि दुसऱ्या दिवशी ते मला पुन्हा घेऊन गेले. या वेळी मात्र मी शुद्धीवर होतो. माझ्याविषयीचे निवेदन फार दीर्घ नव्हते. तिथल्या एक कॉमीसारने माझ्या शरीरावरील जखमांना धक्का लावल्यामुळे मी पुन्हा बेशुद्ध झालो. नंतरच्या दोन दिवसांत मी जिवंत असल्याचे एकही लक्षण माझ्या शरीरावर दिसत नव्हते. पँकरॅट येथील प्रत्येकाला मी केवळ अपघातानेच जिवंत आहे, हे कळले होते आणि त्यांनी मला निरनिराळ्या प्रकारच्या भेटी पाठवण्यास सुरवात केली होती. तुरुंगाच्या भितीला खुणेचे धक्के देऊन अथवा तुरुंगातील वॉर्डनला विश्वासात घेऊन या भेटी येत.

फक्त माझ्या बायकोला मात्र माझ्याविषयीची काहीही कल्पना नव्हती. वरच्याच एका मजल्यावर आणि माझ्यापासून थोडचाच अंतरावर ती होती. एके दिवशी तिच्या एका सहकारिणीने मी हे जग सोडल्याची बातमी दिली होती. ही बातमी ऐकल्यावर तिला काय वाटले असेल ते असो. दुसरे दिवशी तिने माझ्याविषयी आणखीच निराळी बातमी ऐकली. ती बातमी अशी होती, मला फाशी दिले गेले नाही, तर मीच स्वतः शारीरिक क्लेश असह्य होऊन माझ्या कोठडीत गळफास लावून आत्महत्या करून घेतली.

मी माझ्या कोठडीशेजारील भिंतीशी टाकलेल्या अंथरुणावर पडून, अंगात शक्ती नसली तरी मोठमोठ्याने गाणे गाण्याचा प्रयत्न करीत असे. हेतू हा की, हे ओळखीचे गाणे वर माझ्या बायकोच्या कानी जावे. परंतु तो हेतू सफल झाला नाही.

गाण्याशिवाय जीवनच नाही; ज्याप्रमाणे सूर्यकिरणाशिवाय जीवन नाही. त्यामुळेच गाण्याची इथे दुप्पट गरज होती. कारण या कोठडीत सूर्यकिरणही येत नव्हते. या कोठडीचे तोंड उत्तरेकडे होते. फक्त उन्हाळ्यात मावळत्या सूर्याची किरणे कधीकधी खिडक्यांच्या गजांवर पडत.

हे किती चमत्कारिक होते! वर्षाचे ३६५ दिवस प्राणिमात्रासाठी उगवणाऱ्या आणि मावळणाऱ्या सूर्याची किरणेदेखील आमच्यापासून हिरावून घेतलेली होती. केवढे दुर्दैव आमचे? या वेळी मात्र माझ्या मनात दुसराच विचार येत होता. हाच सूर्य उगवलेला आम्हास उद्या दिसेल काय!

बाबा, पुन्हा हा सूर्य उगवलेला पाहणे केवढे भाग्याचे आहे, नाही?

## ४

एक वर्षापूर्वीचा प्रसंग.

प्रश्नोत्तराच्या नेहमीच्या कार्यक्रमासाठी ते मला घेऊन गेले. हा जवळजवळ नेहमीच्याच कार्यक्रमातील एक होऊन गेलेला होता. परंतु त्या दिवशी दुपार टळून जाईपर्यंत त्यांनी मला परत आणलं नव्हतं. तसंच जेवण घेण्याच्या खोलीत त्यांनी मला नेलं होतं.

ती लांबलचक खोली. तीत मांडलेले आडवे लांबोळे बाक. माझ्यासारख्याच कैद्यांनी गच्च भरलेली ती खोली. तिथं बसायचं आणि आपलं जेवण घ्यायचं, हेही एक जीवन होतं. निराळ्या साच्यात ओतलेल्या मानवी जीवनाचा रस. या इथे आता हजर असलेल्या माणसांमध्ये उद्या कोण कोण नाहीसे होणार आहेत, याची कुणालाच कल्पना नव्हती. जर्मन नाझींच्या अख्त्यारातली आणि लहरीतली ती गोष्ट होती. हे जगच निराळं होतं. न्याय, अन्याय ठरविण्याचे याचे नियमच निराळे होते. यांचा मार्शल-लॉ तरी किती निराळा होता. अगोदरच मार्शल–लॉ क्रूर! परंतु ते क्रौर्य इथे यांच्यापुढे कितीतरी फिक्कं, केविलवाणं दिसत होतं. जगातील सर्वसाधारण माणसाप्रमाणे इथल्याही जीवनात मृत्यू अटळ होता, परंतु तो इथे नुसताच अटळ नव्हता, तर आकस्मिक होता, लहरी होता! तरीही पण आमची जगण्याची धडपड अखंडपणे चालूच होती. याला म्हणतात जीवन!

आज हवा काय छान पडलीय असं वाटावं आणि तेथल्या करड्या निरीक्षकाच्या चेहऱ्याकडे त्याच वेळी लक्ष जावं आणि लगेच सुंदर हवेविषयीचा मानसिक उल्हास

करपून राख व्हावा. याचं प्रत्यंतर एक तासातच येई. आम्हाला दक्ष राहण्याबद्दल आदेश सुटे. ओळीने उभं केलं जाई आणि पँक्रॅटकडे खेचून नेलं जाई. नाना प्रकारचे प्रश्न विचारून आम्हाला हैराण केलं जाई. पुन्हा क्रूर मारहाण केली जात असे. पण आमच्या तोंडून ज्यातून अर्थ निघेल, असा एकही शब्द बाहेर पडत नसे, ही परमेश्वरी कृपाच नव्हती काय ?

आमचं इतक्या तडकाफडकी पँक्रॅटहून पेट्चेकला आगमन झाल्याचं पाहून तेथील निरीक्षकांना फार आश्चर्य वाटत असे. मला जो माणूस माझ्या खोलीत घेऊन जात असे, तो मला पँक्रॅट इथं काय घडलं, हे मोकळेपणाने सांगण्याविषयी अभय देत असे. मी काय सांगितलं याकडे मात्र त्याचं लक्ष नसे. त्याचा चेहरा मख्ख दिसत असे. पण त्या दिवशी संध्याकाळी तो माझ्या कोठडीत आला आणि म्हणाला, ' तू म्हणतोस ते बरोबर आहे. हेड्रिकला मारण्याचा प्रागमध्ये प्रयत्न झाला. तो जबर जखमी झालेला आहे. प्रागमध्ये मार्शल-लॉ पुकारलेला आहे ! '

दुसऱ्या दिवशी त्यांनी आम्हाला रांगेत उभं केलं. आमच्यामध्ये कॉम्रेड व्हिक्टर सायनेकही होता. आमच्या केंद्र–समितीचा जिवंत असलेला शेवटचा माणूस. त्याला फेब्रुवारी, १९४१ मध्ये अटक झालेली होती. एक एस. एस. अधिकारी त्याच्यासमोर पांढऱ्या कागदाचा कपटा नाचवीत होता. त्यावर लिहिलं होतं म्हणण्यापेक्षा, नेहमीप्रमाणे तो मुक्ततेचा हुकूम होता !

पाशवी हास्य त्याच्या चेहऱ्यावर नाचत होतं. तो व्हिक्टरकडे पाहून म्हणत होता, " तर तूच तो ज्यू आहेस तर ! हाः हाः हाः ! तुझ्याच मुक्ततेची ही चिठ्ठी ! " आणि असं बोलताना त्याने व्हिक्टरच्या मानेभोवती अशा तऱ्हेनं बोट फिरवलं की, जणू प्रत्यक्ष फाशी देण्यापूर्वीच त्याचं डोकं धडापासून अलग झाल्यासारखं आम्हाला वाटलं. ओटो सायनेक हा मार्शल-लॉच्या नियमानुसार फाशी गेलेला १९४१ मधील पहिला क्रांतिवीर ! आणि १९४२ मध्ये त्याच वाटेने चालू लागलेला व्हिक्टर हा त्याचा भाऊ.

पँक्रॅटपासून पेट्चेकपर्यंतचा रस्ता हा हजारो कैद्यांना मारहाण करीत नेण्या–आणण्याचा जणू जर्मन अधिकाऱ्यांचा राजमार्गच झालेला होता. अर्ध्या रस्त्यावर पोचण्यापूर्वीच त्यांना मारहाण सुरू होत असे. त्यांचे चेहरे बंदुकीच्या दस्त्याने, हाताच्या बुक्कीने –कांदा फोडावा तसे– फोडले जात असत. चेहऱ्यावरील चारी दिशांकडून रक्ताचा प्रवाह सुरू होत असे. मारहाण केल्यावर त्यांचं आम्ही बेशुद्ध पडण्यापूर्वी आमच्यासाठी शेवटचं वाक्य असे– ' जर उद्यापर्यंत तुम्ही शुद्धीवर आला नाही, तर तुम्हाला गोळी घालून ठार करण्यात येईल ! '

परंतु आता या गोष्टीत किंवा अशा धमकावण्यात भीतीचा लवलेशही राहिलेला नव्हता. ' रोज मरे त्याला कोण रडे ' या म्हणीप्रमाणे तेथील वातावरण झालेलं होतं. दररोज रात्री प्रत्येकाला नावाने बोलावून घेतलं जात होतं, त्यांचे हातपाय

बांधले जात आणि एका गाडीत, बकऱ्यांना कोंबावं तसं कत्तलखान्याकडे नेलं जात असे. त्या बिचाऱ्यांवर कसला आरोप होता? कसलाच आरोप त्यांच्यावर सिद्ध झालेला नव्हता! त्यांना फक्त अटक झालेली होती आणि कुठल्याही तपासणीतून त्यांच्यावर कोणताही आरोप सिद्ध झालेला नव्हता! मग काय करावं यांचं? काही आरोपच करायचा असेल तर त्यांचं बिचाऱ्यांचं आपल्या मायदेशावर प्रेम होतं! बस्स! एवढंच. त्याचं प्रायश्चित्त म्हणून त्यांना फाशीची शिक्षा!

अशीच एका स्त्रीला अटक झालेली होती. तिच्यावर ती चोरून आमच्या पक्षाचे बुलेटिन्स वाटते असा आरोप होता. अर्थात तिने तो नाकारला होता आणि शेवटपर्यंत जर्मन—न्यायालयाला तो सिद्धही करता आला नाही. तिला फाशी दिलं आणि मग शेवटी त्यांच्या लक्षात आलं की, बुलेटिन्स वाटणारी ही स्त्री नव्हती! परंतु त्याचा काय उपयोग होता. त्यामुळे त्यांना काही वाईट वाटण्याचंही कारण नव्हतं. कारण साऱ्या झेकराष्ट्राचीच कत्तल करण्याचा विडा त्यांनी उचलेला होता!

त्या रात्री मला तपासणीच्या कोठडीतून उशिरा परत आणलं गेलं. माझ्या कोठडीत भिंतीशी तोंड करून, हातात कसलं तरी ओझं घेतलेली एक व्यक्ती उभी होती. तिची माझी दृष्टादृष्ट झाली. व्हलॅडिमार वानचूरा, झेक कादंबरीकार होता तो. आम्ही हस्तांदोलन केलं. जणू आम्ही शेवटच्या प्रवासाला निघालो होतो. अर्ध्याच तासाने त्याचं नाव पुकारलं गेलं आणि मृत्यूच्या काळ्या अफाट विश्वात त्याचं शरीर विलीन झालं!

त्यानंतर आणखी काही दिवसांनी त्याच भिंतीशेजारी मॉलिश क्रॅसनी उभा होता. क्रांतीचा निर्भय पथिक. त्याला ऑक्टोबरमध्ये अटक झाली होती. मी आलो तेव्हा एका जर्मन शिपायाशी तो बोलत होता. माझ्याकडे त्याचं लक्ष गेलं तेव्हा त्याने माझ्याकडे धाव घेतली आणि शेवटचं हस्तांदोलन केलं.

असं सारखं चालू होतं. लोक कोठडीत गुन्हेगार म्हणून येत होते आणि मृत्यूच्या जगात नाहीसे होत होते. जणू आमची कोठडी ही जीवनाकडून मृत्यूकडे जाण्याचा एक निमूळता मार्ग होता. मृत्यूचं दर्शन तिथं होत होतं, पण तरीही तिथलं जीवन संथ होतं; यावर विश्वास बसत नव्हता, पण ते खरं होतं. लोक जेवत होते, बोलत होते, झोपत होते, एकमेकांवर प्रेम करीत होते आणि अशा इतर हजारो विषयांवर विचार करीत होते की, ज्यांच्या मृत्यूवरील या प्रवासाशी काही संबंध नव्हता; तरीही असं घडत होतं. परंतु या साऱ्या प्रवासातून जेव्हा त्यांचं मन परत येत होतं, तेव्हा मात्र सत्य परिस्थितीच्या दर्शनानं त्यांचं मन गलबलून जात होतं. एखाद्याच्या चेहऱ्यावरील हा आलेख वाचणं फार कठीण होतं.

खिडकीतून मी बाहेर पाहिलं, तेव्हा माणसांचा थवा रस्त्याने जात असलेले दृश्य मला दिसलं. प्रफुल्ल जीवन, निष्पाप जीवन. आमचंही जीवन होतं आणि तेही जीवन आहे. माझं जीवन संपविलं जाणार आहे. जीवन क्षणभंगुर आहे. किती

फसवं !–पण क्षणातच हा विचार माझ्या मनातून नाहीसा झाला. कारण त्या निराशेच्या परिस्थितीत मी जीवनाचं केलेलं वर्णन बरोबर नव्हतं. जीवन क्षणभंगुर, मर्त्य मुळीच नाही. एकाचं जीवन संपलं तर त्यातली चैतन्यशक्ती हजारो–लाखो जीवनांत समाविष्ट होते. फक्त त्याचं रूप बदलतं, जीवन नष्ट होत नाही !

दररोज मला माझ्या कोठडीतून प्रश्नोत्तरासाठी आणि मारहाण करण्यासाठी नेलं जातचं होतं. कधी कधी मला रात्री फारच उशिरा परत आणून सोडलं जाई. तेव्हा बाबाला फारच काळजी लागून राहिलेली असे. त्यांना असंही वाटत असे की, आता माझी भेट होणं शक्य नाही ! मग मी तिथे कोणती प्रश्नोत्तरे झाली आणि आज किती लोक फाशी गेले, याची माहिती बाबांना देत असे. नंतर पोटातील भूक शमविण्यासाठी वाळलेल्या भाजीच्या पानांवर आम्ही तुटून पडत असू.

अशा रीतीने आमचा दिनक्रम चाललेला असे. असे बोलत असतानाच एखादे वेळी आमच्या कोठडीचे दार उघडले जाणे शक्य होते आणि आमच्या दोघांपैकी एकाला मृत्यूची हाक येणं शक्य होते. ' तू किंवा तू, खाली चल ! तुझं जे काही इथं असेल ते बरोबर घे आणि तयार हो ! ' अशी आज्ञा होणे शक्य होते !

परंतु या काळात आम्हा दोघांवर तशी पाळी आली नाही; याचं आम्हाला खरोखरच आश्चर्य वाटत होतं.

अशाच एक संध्याकाळी एक अधिकारी आमच्या कोठडीत आला आणि माझ्यासमोर उभा राहत अगदी हळू आवाजात त्याने मला विचारले, ' तुझं कसं काय चाललं आहे ? '

' काही कल्पना नाही, ' मी म्हणालो, ' ते मला उद्या संपवणार आहेत असं ऐकतो ! '

' मग या बातमीनं तुझं काळीज हादरलं असेल ! '

' नाही, कारण त्याला माझं मन आता तयार झालेलं आहे ! '

थोडा वेळ त्या अधिकाऱ्याने आपल्या हाताची चाळवाचाळव केली. मग माझ्या खांद्यावर हात ठेवीत तो म्हणाला,

' ते खरंही असेल. उद्या तुझा शेवटचा दिवस असेल ! किंवा उद्याचा नसेलही ! काही दिवस मध्ये जातील, कदाचित जाणारही नाहीत, किंवा तुझा शेवट होणारही नाही...... काहीच सांगता येत नाही...... परंतु मनाची तयारी असलेली बरी ! ...'

नंतर तो शांतपणे उभा राहिला. थोड्या वेळाने पहिल्याइतकाच हळूवार, आपुलकीच्या, मला आश्चर्य वाटणाऱ्या स्वरात म्हणाला, ' परंतु जर काही वाईट घडणार असेल......तर तुला बाहेर कुणाला काही निरोप द्यायचा आहे काय ?...... तुला काही लिहायची इच्छा आहे ?...... आताच्या तुझ्या मुखपत्रासाठी नाही. भविष्यकाळासाठी ! तुझ्याबरोबर जाऊ नये...... मागे राहावं असं तुला वाटतं, असं काही लिहिण्याची तुझी इच्छा आहे ? '

मला काही लिहून ठेवण्याची इच्छा होती काय ?

काही क्षणांतच त्याने मला कागद आणि पेन्सिल आणून दिली आणि मी ती कोणाच्या दृष्टीस पडू नये म्हणून लपवून ठेविली.

हे काय होतं ? या हत्याकांडात मित्रत्व कोठून जन्मले ! ही काय जादू होती ! मृत्यूच्या समीप आलेल्या जीवनाला हा एक नवीन साक्षात्कार घडला होता !

## ९ जून १९४३ !

माझ्या कोठडीसमोर एक पट्टा लोंबतो आहे. तो माझा आहे. खुणेचा–फाशीच्या शिक्षेची खूण. एखाद्या रात्री मला येथून नेलं जाईल. माझ्यावर कसला तरी आरोप ठेवला जाईल आणि माझ्या जीवनाचा शेवटचा घास घेतला जाईल, याची मला कल्पना आहे. मनाची आता तशी तयारीही झालेली आहे. हे ४११ दिवस किती घाईगर्दीचे गेले ! किती धावपळीचे. आता किती दिवस उरले असतील कोण जाणे ? आणि ते दिवसदेखील कसे उगवतील ? कसे मावळतील ? येथून पुढे मला हे चोरून लिहिणं आणि सुरक्षित जागी पाठविणं जमेल का नाही, सांगता येत नाही. हे जवळजवळ आता शेवटचंच लिहिणं आहे !

१९४१ च्या फेब्रुवारीमध्ये त्यांनी झेकोस्लोव्हाकियामधील केंद्रीय कम्युनिस्ट पार्टीच्या सर्व सदस्यांना अटक केली. आमच्यातील दुय्यम दर्जाच्या कार्यकर्त्यांना-देखील अटक झालेली होती. आम्ही गेल्यावर पार्टीचं काम या लोकांनी पाहावं अशी आमची योजना होती. हे कसं काय झालं ? सारेच्या सारे लोक या जाळ्यात कसे काय अडकून पडले, हे कळण्यास काही मार्ग नाही. गुप्तहेरांचं जबरदस्त जाळं पसरलेलं असणार, अशी कल्पना केल्याशिवाय दुसरा मार्ग नाही ! दोन वर्षे अत्यंत यशस्वी काम केल्यावर पार्टीतील लोकांमध्ये किंचित मरगळ आलेली असणार !

आमच्यापैकी कितीजणांना अटक झालेली आहे, याची प्रथम मला कल्पना नव्हती. जे बाहेर राहिले असतील, ते माझ्याशी संपर्क साधतील, अशी आशा काही दिवस माझ्या मनात होती. परंतु महिना झाला तरी कोणाकडून निरोप आला नाही; तेव्हा मग मी आतील लोकांच्यामध्येच काही संपर्क साधता येतो का, हे पाहण्याच्या मार्गाला लागलो. परंतु हे देखील एखाद्या निबिड अरण्यात कोणाचा शोध घेण्या-सारखं कठीण कर्म होतं.

हिटलरने सोव्हिएट युनियनवर जूनच्या २२ तारखेस (१९४१) हल्ला चढविला होता. त्याच दिवशी होंझा आणि मी मिळून एक पत्रक काढलं आणि त्या हल्ल्याचे झेकोस्लोव्हाकियावर काय परिणाम होतील, ते समजावून सांगण्याचा आम्ही त्यात प्रयत्न केला होता. होंझा याला २७ मे, १९४२ साली पकडले गेले. त्याच्यावर फार जुलूम झाला. शिक्षा भोगत भोगत त्याला योगायोगाने माझ्या कोठडीत आण-ण्यात आले. आमच्या डोळ्यांत एकमेकांची ओळख चमकली. अर्थात तिसऱ्यापासून

ती आम्ही लपवून ठेवली. नंतर आम्ही दोघेच राहिल्यावर होंझा म्हणाला,

'तुझी काळजी घे जूलो!'

आता आमच्या हे पूर्ण परिचयाचं झालं होतं की, जर्मन गेस्टॅपोच्या हातीं सापडणे म्हणजे मृत्यूच्या सापळ्यात सापडल्यासारखे होते आणि तिथे जो खेळ होतो, तो खेळत राहिल्याशिवाय गत्यंतर नसते, हेही पाठ झालेले होते. मीही तो खेळ खेळत होतो. आता या खेळाची अखेर जवळजवळ येत चालली होती. आता लवकरच शेवटच्या अंकासाठी पडदा वर जाईल. आणि पुढे...... ?

मित्र हो, दक्ष राहा आणि स्वातंत्र्य सांभाळा ? ● ● ●

## मृत्यूच्या दाढेतून

'दि इडियट' आणि 'क्राइम अँड पनिशमेंट' यासारख्या जगद्विख्यात कादंबऱ्या लिहिणारा फियोडोर डोस्तोव्हस्की हा सुरवातीला समाजवादी राष्ट्राच्या कल्पनने भारलेल्या तरुणांच्या एका गटाचा सभासद होता. या झारद्रोही कृत्याबद्दल त्या गटाच्या सर्व सदस्यांना अटक करण्यात येऊन देहान्ताचे शासन फर्माविण्यात आले. हिवाळ्यातील एका सकाळी त्याना शिक्षास्थळी नेण्यात आले पण तितक्यात झारचा खास निरोप येऊन पोचला व त्या सर्वांचे देहान्तशासन रद्द होऊन त्यांना सैबेरियात ओमस्क येथे पाठविण्यात आले. त्या प्रसंगाचे वर्णन डोस्टोव्हस्कीने त्याच्या भावाला-मायकेलला-धाडलेल्या एका पत्रात केले आहे. तो लिहितो...

"आज डिसेंबरची २२ तारीख. आज आम्हा सर्वांना सेमेनो व्हस्की चौकात नेण्यात आले. तिथे देहान्त शासनाची आज्ञा आम्हाला वाचून दाखविण्यांत आली. चुम्बन घ्यायला क्रूस देण्यात आला.

मृत्युयात्रेपूर्वीचे प्रसाधन (पांढरे शर्टस्) करण्यात आले. मग आमच्यापैकी तिघांना कठड्याजवळ उभे करण्यात आले. तिथेच मृत्यूच्या शिक्षेची अमलबजावणी होणार होती. माझा क्रमांक ६ वा होता. आम्हाला तीनतीनच्या गटागटाने बोलावण्यात यायचे होते. मी दुसऱ्या गटात होतो. कांही क्षणांपेक्षा जास्त वेळ मी जिवंत राहणार नव्हतो. आणि मायकेल! त्याक्षणी मला तुझी...फक्त तुझीच आठवण आली. त्या अखेरच्या क्षणी फक्त तूच माझ्या मनात होतास, आणि तेव्हाच मला पहिल्यांदा कळले मी तुझ्यावर किती प्रेम करतो. ते! माझ्या प्रिय बंधो! माझ्या शजारीच उभ्या असलेल्या प्लेस्तिचिएव्ह व डूरोव्ह यांना आलिगन देण्याइतका अवधी होता. त्यांचा निरोप घ्यायला अजून सवड होती. तितक्यात आम्ही थांबण्याच्या आज्ञा ऐकल्या. कठड्याला बांधलेल्यांना सोडून परत आणण्यांत आले. आणि आम्हाला आमचे जीवनदान दिल्याची राजाज्ञा वाचून दाखविण्यात आली. ●

कथा

प. त्रिं. सहस्रबुद्धे

# तीच का तू ?

सारं तेच
फक्त गळा पूर्वीप्रमाणे रिकामा नव्हता

सायंकाळच्या संधिप्रकाशात विस्तीर्ण राजमार्गाच्या दुसऱ्या टोकाकडून संथपणानं पावलं टाकीत येत असलेल्या व्यक्तीकडे मी पाहतच राहिलो. ती कोण आहे, हे चटकन् ओळखण्याइतकी ती स्पष्ट दिसत नव्हती. अस्पष्ट आकार मात्र मनावर ठसत होता. अधिक रोखून पाहत राहिलो. आकार अधिक स्पष्ट व्हायला लागला नि मन एकाच कल्पनेनं भारून गेलं. खरंच, ती तू असशील, तीच तू असशील ?...

त्या व्यतीच्या चालण्यात नि तुझ्या चालण्यात खूप साम्य होतं. ते चालणं विशिष्ट प्रकारचं होतं. स्त्रियांच्या चालण्याचे थोडे का प्रकार आहेत ? कुणाचं सरपटत गेल्यासारखं तर कुणाचं धक्के देत गेल्यासारखं. उड्या मारीत गेल्यासारखं, तर कुणाचं बाजूला सारीत घुसल्यासारखं. वेलीवरून फूल खाली पडताना किती अलगद पडतं. भूमातेला त्याचा स्पर्श तरी जाणवत असतो का ? दवाचा थेंब खाली पडतो तोदेखील किती हळुवारपणानं. येणाऱ्या व्यक्तीची पावलं अशीच अलगद पडत होती, तेव्हाच मनात शंका उत्पन्न झाली की, तूच तर नसशील ना ? तुझं चालणं–छे, ते चालणं नसायचं. तरंगत तरंगत जायचीस तू. पाऊल इतक्या नाजुकतेनं पडायचं की, धरणीमातेला ते समजायचंही नाही. त्या चालण्याचा मला कोण मोह. तू चालत असताना तासन् तास पाहत बसावं असे वाटे. त्यात नाजुकता, गोडवा व हळुवारपणा यांचा सुरेख संगम झाल्याचा भास व्हायचा. तुझ्या सौंदर्यानं मी जितका आकृष्ट झालो, तितकाच तुझ्या चालण्यानं मोहित झालो. पाऊल उचलताना, पाय पुढे टाकताना, पुन्हा पाऊल उचलताना तुझ्या सुंदर देहाला जे सुखद आकार लाभत, ते नेत्रात साठवले जात. पुन्हा पुन्हा ते पाहत राहावे, असं वाटे.. तीच मोहक

चाल दूरवरून येणाऱ्या व्यक्तीकडून अनुसरली जात असल्याचं पाहताच मन पुन्हा पुन्हा म्हणू लागलं, तूच तर ती नसशील ना ?

मात्र अजून ती तुझी तरंगत चालण्याची विशिष्ट पद्धत मोह घालते. तिची नुसती आठवण झाली तरी मन मोहरतं. पहिल्याच दिवशी तुझी चाल पाहताच मनावर जी मोहाची पखरण पसरली ती अजून आठवते. अजून ताजेपणानं फुलविते. अजून त्या स्मृतीच्या नुसत्या गंधानं धुंद करते.

पहिल्याच दिवशी तुला पाहिलं, तेव्हा मी होतो तसाच आज आहे का ? शरीर तेच आहे. तेच डोळे तुला पाहतील. तेच कान तुझं भुलविणारं बोलणं ऐकतील. सारं तेच आहे. तरी मी तोच राहिलेलो नाही. तुझ्याशी ओळख झाल्यानंतर बिंदूबिंदूत बदल झाला. छे:, क्रांती झाली. कणन् कण बदलला. तोच देह पण किती निराळा झाला. वेगळा वागू लागला.

त्या दिवशी नेहमीप्रमाणे मी कामात व्यग्र होतो. कामाचा वेळ होऊन तास झाला असेल नसेल. आसपासचे सगळे कारकून पुढे पसरलेल्या निर्जीव कागदांच्या ढीगात लक्ष घालून काम करू लागले. मीही कामात व्यग्र झालो. यंत्रात सापडलेला हात तुटतो, पण बाहेर काढता येत नाही. कामाला लागल्यावर कचेरीची वेळ संपेपर्यंत सारखं काम करीत राहायचं. कामाबद्दल चर्चा. कामाबद्दल विचारपूस. याव्यतिरिक्त काही बोलणं शिस्तीला धरून नव्हतं. सुखदुःखं प्रत्येकाला होती. कुणी दुःखानं पोळलेला, कुणी सुखानं गुदमरलेला. कुणी नवजीवनाच्या उंबरठ्यावर, कुणी जीवनाच्या वेशीवर, कुणी समाधानानं फुललेला तर कुणी अतृप्ततेने वखवखलेला. कुणी भवितव्याकडे आशेनं पाहणारा तर कुणी समोर काळजीनं जड झालेली दृष्टी लावून बसलेला. कुणी गुलाबी फुलाच्या वृत्तीनं सुखावणारा तर कुणी त्याच्या काट्याप्रमाणं टोचणारा...विविध व्यक्तींनी भरलेला तो कारखाना म्हणजे आमची कचेरी. यांत्रिकतेचं राज्य तेथे चौफेर चालू. मानवता, प्रेम, जिव्हाळा साऱ्या भावना रस्त्यावर सोडून कचेरीत प्रवेश करायचा नि कामाशी सलगी करायची. मत्सररसानं भारावलेलं कोडं सोडायचं नि त्याचा चोथा चघळीत दिवसभर रवंथ करायचं. त्या ठिकाणात जिवंतपणा नव्हता. उल्हास नव्हता. साधा मोकळेपणाही नव्हता. चाकोरी ठरलेली. रुळावरून चालणाऱ्या आगगाडीला कितीही धावता येत असलं तरी मनाला येईल त्या दिशेनं जाता येत नाही. ठरवून दिलेल्या मार्गावरून जावं लागतं. 'थांबा' असा हुकूम येताच थांबावं लागतं, तसंच जीवन. मी रुक्ष वातावरणात जगत होतो. पण तू आलीस नि सारं पालटलं !

बाराच्या सुमारास तू दाराशी आलीस. कंटाळून गेलेला मी दाराकडे उगीचच पाहत बसलो होतो. इतक्यात विशिष्ट ढंगानं चालत आलेली तुला पाहिली. क्षणभरच तू थबकलीस. मर्यादित घरकुलातून प्रथमच बाहेर पडलेली तू– कचेरीतील विस्तीर्ण हॉल पाहताच गांगरलीस. गोंधळलीस, पण क्षणातच स्वतःला सावरलंस नि

हॉलमध्ये आलीस. दाराजवळच्या टेबलावर मी बसलो होतो. आलीस ती थेट माझ्यासमोर येऊन उभी राहलीसं नि मला गोंधळात टाकलंस.

आज कुणीतरी कारकून येणार, हे मला माहीत होतं. कालच एक खंगलेला कारकून पेन्शनवर गेला होता. वाळलेलं पान आवाज न करता खाली पडतं तसा तो कचेरीवर कसलाही तरंग न उठवता गेला. त्याला निरोप देण्याच्या नावाखाली कपवशांचा काय किणकिणाट झाला तेवढाच. बाकी कचेरीवर कसलाही परिणाम झाला नाही. कुणाला ओकं ओकं वाटलं नाही. जिव्हाळ्यानं कुणी सहानुभूती दर्शविली नाही. जो तो आपल्या कामात दंग. कोण आला, कोण गेला, कोण आजारी पडला, कोण मेला, कशाचीच कुणाला खंत नव्हती. त्याच चाकोरीत रुळलेला मी देखील परदु:खाबद्दल तसाच अलिप्तपणा दाखवित होतो. एक कारकून गेला नि दुसरा आला म्हणून तरी काय उलथापालथ व्हायचं कारण? मोठ्या कचेरीत नेहमीच घडणाऱ्या या घटना. कुणी रजेवर जातात, आजारी पडतात, बदलतात, राजीनामा देतात, किंवा पेन्शनीत जातात. ते गेल्यावर कुणीतरी त्यांची जागा घेतं नि पुन्हा कसलीही खळबळ न होता कामं चालू होतात. म्हणूनच नवीन कारकून येणार हे कळूनही मला उत्सुकता वाटत नव्हती. येईल कुणीतरी, बसेल माझ्यासमोर, रंगून जाईल कामामध्ये. मी त्याची कशाला खंत बाळगायची? का उत्सुकता दाखवायची? का आशेनं बघत राहायचं?

अशाच अलिप्ततेनं मी कामात दंग होतो; पण तुला पाहताच का कोण जाणे, साऱ्या शरीरातून उत्सुकतेची लहर सळसळली. कचेरीत मुली येणं, हे काही विशेष नव्हतं. येत–जात. इतर कारकून तशाच त्याही राहिल्या तर कारकून बनत. त्यांच्या येण्या–जाण्यानं मला कधीच चटका लागला नाही. पण तुला पाहतांच मात्र शरीरातून नवीनच जाणीव चमकून गेली नि अपूर्व उत्सुकतेनं तुझ्याकडे पाहत राहिलो.

मंद पावलं टाकीत तू माझ्यासमोर आलीस. ते तुझं चालणं नव्हतं. पाऊल उचलायचं. टेकायचं. पुन्हा उचलायचं. अशीच तू आलीस. पण ज्या येण्यात जो अनन्य हळुवारपणा होता, मन मोहित करणारी लकब होती, पाहणाऱ्याचं लक्ष खिळवून ठेवणारी आकर्षता होती, त्यामुळे मी मुग्ध झालो. रुक्ष वाळवंटातून चालणाऱ्याला निर्मल जलाशयाचा साठा दिसला. एकाकी जीवन जगणाऱ्या मायेच्या फुलांचा गंध भासला....

काय झालं ते सांगणंच कठीण! इतकं खरं की, तुला पाहताच जिच्याशी मी खूप सलगीने वावरलो आहे, अशा मैत्रिणीची अचानक भेट झाल्याचं समाधान मला एकाएकी वाटलं. मुग्ध होऊन मी तुझ्या नेत्रांकडे पाहत राहिलो. तुझे विशाल डोळे गोंधळलेली वृत्ती व्यक्त करीत होते. काळ्याभोर पापण्यांची नाजुक हालचाल मात्र सहानुभूतीची याचना करीत होती. कपाळावर सरकलेल्या गुलजार बटा बेछूट जीवनाची ओढ दाखवीत होत्या; तर पदर सारखा करण्याची तुझी चाललेली घाई

संयमाची बंधनं सांभाळीत होती........तू बिचकतच एक कागद माझ्या हातात दिलास. माझ्याच खात्यात तुला पाठविली होती. इथेच तुला काम करायचं होतं. इथं......अगदी माझ्यासमोर !

तुझा नवखेपणा किती झपाट्यानं ओसरू लागला, याची आठवण झाली की, नवल वाटतं. नव्याने आलेली मुलगी काही दिवस संशयानेच वावरते. ज्यांच्यामधे सबंध दिवस घालवायचा ते कसे आहेत, त्याचा अंदाज बांधते. विवाहित कोण, अविवाहित कोण, याची माहिती काढते. विवाहित असल्याचं कळलं की, मग त्या व्यक्तीजवळ ती अधिक मोकळेपणानं बोलू लागते. पाहते मात्र अविवाहित पुरुषाकडे ! परंपरेनं, संस्कारांनी तिच्या मनावर जे दडपण टाकलेलं असतं, ते सांभाळीत सांभाळीत ती वावरते. दुसरी एखादी कारकून मुलगी असली ,की, पहिल्याच दिवसात तिच्याशी गट्टी जमवते. त्यांच्यातील परकेपणा नाहीसा होऊन सलगीने वागायला लागते. पण पुरुषांशी वागताना ती मोकळेपणाला लगाम घालते. जसा विश्वास वाढेल, तसाच तो सैल सोडते......तेही काही मर्यादेपर्यंत.

पण तुझं सारंच निराळं !...

पहिल्याच दिवसापासून तू माझ्याशी अशा काही सलगीनं वागलीस की, मीही स्तिमित झालो ! –

माझी वागणूक अशी होती की, कोणतीच तरुण मुलगी माझ्या आसपास यायला बिचकावी. माझं स्वतःचं एक विश्व मनानं तयार केलं होतं. त्यात माझं सारं हिंडणंफिरणं. एकट्यानं जायचं. एकट्यानं यायचं. दुसऱ्याला त्या विश्वात स्थानच नव्हतं. फारच कुणी धाडस केलं तर तो जवळपास यायचा. माझ्या मनाची एकाकीप्रियता ध्यानात येताच मागे वळायचा. पुन्हा माझं एकाकी जीवन चालू व्हायचं. कुणी जवळ आला म्हणून आनंदानं मी मोहरलो नाही. तो मागे वळला म्हणून निराशेचे निःश्वास टाकले नाहीत. बाहेरच्या सुखदुःखांची झळ जणू माझ्या विश्वाला चटका लावूच शकत नव्हती. या पूर्वी मुली खात्यात आल्या. शेजारी बसल्या. समोर बसल्या. पण जशा आल्या तशाच गेल्या. त्यांच्याबद्दल मनात किंचित सूक्ष्मसा तरंगदेखील उमटला नाही. जसा मी होतो तसाच राहिलो. पण मात्र तू आल्याबरोबर माझ्या स्वभावाची पारख केलीस की काय, कोण जाणे. जाड कवच धारण करून बसलेला मी मनाचा फार मृदू आहे, हे क्षणात तू जाणलंस की काय, माहीत नाही. कासवाची पाठ कठीण, पण त्याखाली लपलेलं हृदय मृदू असतं. माझा वरवरचा कठोरपणा आतल्या मृदुतेला सांभाळीत आहे. सुरक्षित ठेवण्यासाठी धडपडत आहे. वरचं कठोरतेचं, अलिप्ततेचं, एकाकीपणाचं जाड कवच भेदलं तर मृदुतेचा अमाप साठा आपल्या हाती लागणार याची क्षणात खात्री परखून घेतलीस की काय, कोण जाणे. पहिल्याच क्षणापासून तू बोलायला लागलीस ते जिव्हाळ्यानं. तुझ्या शब्दांत जसा आर्जवीपणा होता, तशीच सलगीची याचना होती. प्रथम प्रथम मी काय थोडा

प्रतिकार केला ! तुझ्या प्रश्नांना उडवाउडवीची उत्तरं दिली. तू समोर आहेस याचं जणू मला भानच नाही, अशा विचित्रपणानं वागलो. जिव्हाळ्यानं विचारलेल्या साध्या प्रश्नांनादेखील तुटकपणानं उत्तरं दिली. डोळ्यांत सारी कोमलता, ऋजुता, सात्त्विकता एकत्र करून तू पाहावेस नि मी चटकन् दुसऱ्या दिशेकडे दृष्टी वळवावी. जणू जंगलात मी एकाकी बसलो आहे नि सभोवार पसरलेल्या निर्जीव वृक्षांची अर्थहीन हालचाल पाहण्यात गढून गेलो आहे, अशा रुक्ष भावनेनं पाहत राहिलो......

पण तू चिकाटी सोडली नाहीस ! ......टाकीचे घाव घालीत राहिलं की, ओबडधोबड दगडातून मनोहर मूर्ती तयार करता येते कलावंताला. खरी कलावंतच तू. नाही तर पाहता पाहता माझ्या ओबडधोबड वृत्तींना आकार आणणं तुला कसं जमलं असतं ! खात्यात प्रवेश करून आठवडाही लोटला नसेल, तोच तू किती जवळ आलीस. तुझी चाल जशी हळुवार, तशीच तुझ्या प्रीतीची चालही नकळत होणारी. माझ्या वृत्तीभोवतालचं कठोरतेचं कठीण कवच तू केव्हा भेदून टाकलंस, मला समजलं नाही. एकट्याच्या विश्वात रममाण झालो होतो मी. त्यात कुणी कधी प्रवेश करील, असं वाटलंच नव्हतं मला. छे:, कुणी प्रवेश करू नये, अशीच होती माझी वागणूक. बोलता बोलता तू ते कवच फोडलंस. पाहता पाहता माझ्या अंत:करणापर्यंत पोचलीस. हसता हसता ते तू आपलंसं केलंस......

खरंच हसता हसता......हसता हसता......

तुझ्या चालण्याचा मोह मनावर मोहिनी घालीत असतानाच तुझ्या गोड हसण्यानं मनाभोवतालच्या कठोरतेला घायाळ केलं. माझ्याकडे पाहताना तुझं ते मधुर हास्य निरागस व्हायचं. कोणतीही तरुण मुलगी हसताना मोहक दिसते. तुझ्या मोहकतेला हसताना अशी काही छटा लाभायची की, माझा एकाकीपणा बाजूला व्हायचा. फारसं न बोलण्याची खोड मोडली जायची. प्रत्येकाला काही अंतरावर ठेवण्याची सवय माघार घ्यायची.

एकदा तू म्हणालीस –

" तुमच्याकडे पाहिलं की वाटतं –"

बोलता बोलता थांबलीस. मनात आलेलं बोललं तर काय परिणाम होईल, याचा अंदाज बांधण्यासाठी जणू तू थांबलीस. बोलताना हसत होतीस, तशीच थांबल्यावरही हसत होतीस. हास्याच्या वर्षावानं मी गोंधळून गेलो. ' काय वाटतं सांग की...... ' मोठ्या प्रयत्नानं मी म्हटलं.

" सांगितलं असतं...... पण इथं नको......"

" मग......"

" संध्याकाळी ऑफिस सुटल्यावर सांगेन.. ..."

" अत्ता सांग की– "

" नको......सांगू...... पाहा हो......नको...नकोच पण इथं."

" संध्याकाळी सांगशील ?– "

" खरंच सांगेन. "

मी संध्याकाळची वाट पाहत थांबलो. आपल्याबद्दल तू काय म्हणणार याचे तर्क बांधीत, कल्पना चितारीत, वेळ काढीत बसलो.

कचेरीची वेळ संपायला येताच मनीबॅग हातात घेऊन माझ्याजवळ येऊन तू म्हणालीस, ' चला. '

खरंच तू संध्याकाळी सांगणार ? त्यासाठी मला चला म्हणण्याचं धाडस करणार नि तेही अत्यंत आर्जवी वाणीनं. जरा उबारा लागताच थंड बर्फही वितळायला लागतो. मधुर आवाचात तू ' चला ' म्हणताच माझा कठोरपणा हादरला. विरघळू लागला. कुणाहीबरोबर कचेरीबाहेर न पडणारा मी काही न बोलता उठलो नि तुझ्या मागोमाग चालू लागलो.

तू पुढे जात होतीस, मी मागे चालत होतो. तू कुठे जात आहेस, मला कुठे नेण्याचा विचार आहे, काय सांगायचं ठरवलं आहेस, कसलाच प्रश्न मनात उभा राहिला नाही. लोहचुंबकाच्या आकर्षणानं खेचल्या गेलेल्या वस्तूला स्वतंत्र विचार करायचं सामर्थ्य राहतंच कुठं ?

एका मोठ्या हॉटेलाशी गेल्यावर थांबलीस. मी जवळ येताच म्हणाली, ' चला... चहा घेऊ आपण. ' पुन्हा त्याच आर्जवी स्वरांचं मोहक दर्शन. पुन्हा तेच मन प्रसन्न करणारं मधुर स्मित. तेच मन खुलवणारं गोड चालणं. तू हॉटेलात चढलीस. मी आत शिरलो. फॅमिली रूमच्या रोखानं कसलाही संकोच न दर्शविता तू जात होतीस. स्तिमित झालेला मी संथपणानं पावलं टाकीत होतो.

रूममध्ये शिरताच माझ्यासाठी तू दार उघडून धरलंस. मी आत शिरताच हसत हसतच खाली बसलीस. ' बसा असे माझ्यासमोर......अं ? '

थंड पेयांच्या दोन बाटल्या समोर ठेवल्या गेल्या. रूमची झडप लोटली गेली. वरच्या निळसर शांत प्रकाशात मी अन् तू बसून राहिलो. मंद प्रकाशात तुझं रूप आगळ्याचं मोहकतेनं धुंद करीत होतं. पंख्याच्या वाऱ्यानं पदराची हालचाल संयमाला बाजूला सारून होत होती. कपाळावर सरकलेले कुंतल वेगानं भुरभुरत होते. बोलण्यातलं माधुर्य अधिक मोह घालीत होतं. डाव्या हाताला लावलेल्या छोट्या घडाळाचा पट्टा उगीचच चाळवलास नि हसत हसत म्हटलंस,

" तुम्हाला का इथं आणलं माहीत आहे ? "

" माझ्याकडे पाहिल्यावर काय वाटतं ते सांगायला. "

" ते सांगणारच आहे, शिवाय– आणखीही काही सांगायचं आहे. "

" मग सांग की –"

" आधी हे पेय घ्या. थंडपणा येऊ द्या तुमच्या मस्तकाला नि मनाला. "

" तू पण घे की "–

" आपण दोघं बरोबरच घेऊ की...... "

दोन घोट घेतल्यावर पेयाची बाटली खाली ठेवली. थंडगार पेय घशाखाली उतरताच चित्तवृत्ती आगळ्याच माधुर्यानं चाळल्या गेल्या. पेयाचा थंडपणा, त्याचे माधुर्य नि तुझा मधुरतर सहवास या सर्वांचा माझ्या मनावर असा काही परिणाम झाला की......मी एका विचित्र मादकतेच्या आधीन होऊ लागलो. पेय साधं होतं. त्यात मादकता किंचितही नव्हती. पण मूर्तिमंत मादकतेचा सहवास मला धुंदी आणीत होता. पाण्यात राहून कोरडा राहण्याची माझी सदैव चाललेली धडपड अचानक थंडावली गेली. धरणाचा बांध फुटल्यावर साचलेलं पाणी बेधडक चौफेर धाव घेतं. खळबळाट करीत धावत सुटतं. संयमाच्या, संस्काराच्या, सुसंकृतपणाच्या मानवी बंधनांनी दाखवलं गेले मन अनुभूत चैतन्यानं झपाटलं गेलं. आपल्या हातून या क्षणी काही होऊ शकेल याची खात्री वाटली नि स्वतःचा तोल सावरण्याची अखेरची धडपड मी करू लागलो.

तू स्थिरतेने पाहत होतीस. पेयाच्या बाटलीत ठेवलेली नलिका चाळवीत माझ्या भावनेच्या खोलीचा वेध घेत होतीस. खचत चाललेला माझा धीर, फेसाळत चाललेली कठोरता, उलथून पडू लागलेली अलिप्तता, स्थिरतेनं माझ्या मनात चाललेली खळबळ तू पाहत होतीस. समजावून घेत होतीस नि मधूनमधून हसत होतीस. ते हास्य सहानुभूतीचं होतं की विजयाच्या उन्मादाचं होतं, हे मला समजेना.

इतक्यात माझी पेयाची बाटली तू चटकन आपल्या हातात घेतलीस नि तोंडाला लावलीस. दुसऱ्या हातानं आपली बाटली माझ्या पुढे करीत म्हटलंस, " आता प्या पाहू...... "

एक घोट घेताच तू थांबलीस. " किती किती मधुर लागतंय पण ? कारण काय माहीत आहे ?– "

" काय बरं ?– " काहीशा स्तिमित वृत्तीनं मी विचारलं.

" कारण तुमचा स्पर्श ! " तू म्हटलंस नि खळखळून हसायला सुरवात केलीस. हसता हसता पेय पीत होतीस. रोखून माझ्याकडे पाहत होतीस. पेयाच्या माधुरीने, तुझ्या सहवासानं जितकं मला मोहीत केलं नाही, तितकं त्या आव्हान देणाऱ्या हास्यानं मला मुग्ध केलं. मादकतेच्या स्वाधीन केलं...... माझा संयम मला दूर ढकलू लागला.

" तुमच्या स्पर्शात इतकी माधुरी सामावली असेल असं खरंच वाटलं नव्हतं मला. केवढं गुपित गवसलं मला सहज– "

" पण तू सांगणार होतीस त्याचं काय झालं– "

" खरंच......ते अगदीच विसरले...... "

पेय चटकन् पिऊन टाकलंस नि महत्त्वाचं काही सांगण्याच्या तयारीत बसलीस.

" सांगू......तुम्ही फार फार लबाड आहा ! "

" लबाड ?– "

" तर काय म्हणायचं. वरवर पाहणाऱ्याला वाटतं की, तुमचं मन कठोरतेनं झाकळलेलं आहे. तुमच्या चेहऱ्याकडे पाहताच पाहणारा थबकतो. विचकतो. धावरून मागं सरतो. पण खरं अगदी निराळं आहे. तुम्हाला पहिल्यांदा बघितलं तेव्हाच मी जाणलं की, दगडासारखं कठीण वाटणारं तुमचं मन खरं तसं नाही थंडीत माणूस पांघरूण घेतो. थंडीपासून स्वतःला सावरण्यासाठी ते अधिकाधिक विलगून घेतो. वरवर पाहणाऱ्याला वाटेल की यांच्या सर्वांगावर निराळंच कवच आहे. खरं काय असतं. पांघरूण असतं ते. दूर करताच खरी व्यक्ती उघड होते. तुमच्या मनाभोवताली असंच कठोरतेचं आवरण सतत असतं. ते दूर केलं की बस्. त्या मागचं मृदू, हळुवार, संवेदनक्षम मन उघड होतं. मी ते पहिल्याच दिवशी ओळखलं. तुमच्या खऱ्या स्वभावाची ओळख पहिल्याच दिवशी मी केली. खरं स्वरूप लपवून कठोरतेचा मुखवटा वापरणारे तुम्ही लबाडच नाही का ?......का करता असं ? कशासाठी चालवली आहे ही फसवणूक ? सांगाल का मला ?– सांगाल ?–"

तू म्हणालीस त्यातलं अक्षरही खोटं नव्हतं. माझं खरं स्वरूप पहिल्यांदा तूच ओळखलंस. तूच माझ्यासमोर स्पष्टपणानं मांडलंस. पण मी असं का वागतो, याचं कारण मात्र मला देता येत नव्हतं. तुझ्या सरळ प्रश्नानं मला गोंधळात टाकलं. काय उत्तर द्यावं हेच मला समजेना. दोन्ही तळव्यांत मस्तक धरून मी स्वस्थ बसलो.

" बरं, ते जाऊ दे. कळेल केव्हा तरी. आता नीट ध्यानात ठेवा. मी तुम्हाला नीट ओळखलं आहे. तुमच्या स्पर्शाचं मूल्य मला माहीत झालं आहे. माझ्याशी वागताना तरी मोकळेपणानं वागा. बाजूला ठेवा तो कठोरतेचा मुखवटा नि मोकळ्या-अगदी मोकळ्या मनानं हसा पाहू......खरंच मनापासून तुम्ही हसाल तर किती छान दिसाल. हं. आता हसायचं हं. मी हसते. तुम्ही हसायचं हं... आता एकदम हं...... '

नि हसू लागलीस. क्षणभर मी स्तब्ध राहिलो. तुझ्या बेछूट, निरागस नि आव्हान देणाऱ्या हसण्यानं संयम सुटला नि मीही आत्यंतिक मोकळेपणानं हसू लागलो. क्षणभर फॅमिलीरूम हास्याच्या निनादानं भरून गेली.

एका शनिवारी संध्याकाळी कचेरी सुटायच्या वेळेस तू माझ्याजवळ एकदम आलीस नि म्हणालीस, " उद्या सकाळी साडेसात वाजता दादर स्टेशनवर या बरं का. "

" का –" विस्मयानं मी विचारलं.

" का ते सकाळी सांगेन. उद्या तुम्हाला माझ्याबरोबर यायचंय. मी नेईन तिकडे जायचं तुम्ही..."

मी थंड झालो. कचेरीत पाच वर्षं मी काढली. पण सहकाऱ्यानं इतक्या अधि-

कारीवाणीनं मला कुणी हुकूम केला नव्हता. केला असता तर मी लक्षही दिलं नसतं. तुझ्या बाबतीत माझ्या मनात प्रतिकाराची कल्पनाच उत्पन्न झाली नाही. मी सावधतेनं ऐकून घेतलं नि सकाळी साडेसातला स्टेशनवर हजर झालो.

गाडीची वाट पाहत तू ठरल्या ठिकाणी उभी होतीस. मी जवळ येताच तुझ्या चेहऱ्यावर विजयाच्या हास्याची छटा पसरली. खरंच तू मला जिंकलं होतंस. माझा मी शिल्लकच राहिलो नव्हतो.

तू हातात दिलेलं तिकीट पाहताच मला समजलं की, लोणावळ्याला जायचा विचार होता तुझा.

गाडीत बसल्यावर तू म्हणालीस की, "लोणावळ्याला जात आहो आपण. माहीत आहे ?"

"का बरं ?–"

"तिथल्या गिरिशिखरावर बसून सूर्यास्ताची शोभा पाहत बसणं फार आवडेल तुम्हाला."

"मला ?–"

"मला आवडतं. कधीपासूनची इच्छा राहिली होती; पण एकटीनं कुठे जाऊ ? तुमच्याबरोबर जाण्यात जी मजा आहे, ती एकटीनं जाऊन का अनुभवायला मिळणार आहे ?–"

संध्याकाळी गप्पा मारीत मारीत आपण डोंगराच्या माथ्याकडे चढू लागलो. चढताना क्षणाक्षणाला तू माझा आधार घेत होतीस. एकदा पायात काटा रुतल्यानं की काय, एकदम कोसळलीस. मीच तुला सावरून धरलं. खाली गवतावर अलगत ठेवलं नि पायाचा काटा काढू लागलो. इतक्यात तू हसू लागलीस. चमकून मी पाहतच राहिलो. "अहो, काय काढता आहा माझ्या पायातून ?"

"काय म्हणजे– काटा ?–"

"अगदीच बावळट आहात झालं. अहो, काटा वगैरे काही नव्हता. इतका वेळ तुमच्याजवळून चालते आहे; पण एकदाही माझा हातदेखील हातात घेतला नाहीत. इतकं जपून वागायला हे काय हपीस आहे ? इथं आणलं कशाला. अगदी मोकळेपणानं वागायचं म्हणून. पण तुमची अलिप्तता आहेच बरोबर. म्हणून राग आला मला. म्हटलं धडाच शिकवला पाहिजे तुम्हाला – नि काटा बोचल्याचं सोंग केलं. फसवलं की नाही एका माणसाला?–छान बनवलं, की नाही?...अं?...अं ?"

नि तू मला बिलगलीस...

समोर निसर्गाचं विशाल दृश्य पसरलं होतं. सायंकाळी तुझ्या शेजारीच बसून मीदेखील सायंकाळचं ते विलोमनीय दृश्य पाहत होतो. विशाल डोंगरांच्या रांगाच रांगा अफाट दूरवर पसरल्या होत्या. अखेरच्या रांगेची वरची कडा लालसर झाली होती. क्षितिजाच्या बाजूला लाल रंगाची जणू उधळण झाली होती. ते सौंदर्याचं

अविट दर्शन घेताच मी मुग्ध झालो. त्या सौंदर्याशी समरस झालो. क्षणभर तू जवळ आहेस याचाही विसर पडला. इतक्यात तू माझ्याजवळ सरकलीस. माझ्या खांद्यावर हात टाकून मला जवळ ओढलंस. मस्तक माझ्या बाहूला टेकून समोरच्या दृश्याकडे पाहत राहिलीस. माझ्याकडे दृष्टी लावून म्हणालीस, "समोर कसलं दृश्य आता दिसणार आहे माहीत आहे?–"

"संध्याकाळचं? सूर्यास्ताचं?"

"छे:, तो केवळ सूर्यास्त नाही. प्रीतीची सफलता आहे. दिवसभर वणवण करणारा सूर्य थकून पृथ्वीकडे येऊन तिच्या गालावर आपलं तोंड टेकतो आहे. तिचं चुंबन घेतो आहे. नीट पाहून ठेवा ते. नीट घ्यानात ठेवा. तुम्हालाही या पाहण्याचा उपयोग होईल."

नि तू मिस्किलपणानं हसू लागलीस. वाढत्या सायंप्रकाशात अधिक जवळ सरकलीस!–

तुझ्या उन्मादक हालचालींनी माझं भान हरपलं. संयमाचे इतका वेळ ताणून धरलेले बंध तडातड तुटले. मी तुला चटकन बाहुपाशात धरलं. जवळ घेतलं नि तुझ्या कपाळावर माझं तोंड टेकलं. पुन्हा तोंड टेकलं...

मला वाटलं, तृप्तीनं तू सुखावशील; पण निराळंच घडून आलं. तू रुष्ट झालीस. भुकेल्या दृष्टीनं माझ्याकडे पाहत म्हणालीस, "मी तुम्हाला का इथं आणलं?..."

"ते तू अजून सांगितलंस नाहीस."

"सांगायचं राहचलं खरं. पेयाला तुमचा स्पर्श झाल्याबरोबर त्याची माधुरी वाढली. ज्या स्पर्शाचं सामर्थ्य इतकं मोठं आहे, त्याचा अनुभव घ्यावा, त्यापासून मिळणाऱ्या सुखाची गोडी चाखावी म्हणून आणलं. पण तुम्ही कसले विचित्र. मी जवळ सरकले तरी उत्कटतेने मला जवळ करायला किती वेळ लावता. ज्या उचंबळीनं तुम्ही प्रतिक्रिया करायला हवी तशी तुम्ही करीत नाही. नेहमीची कठोरता, शांतता, अलिप्तता पुन्हा पुन्हा डोके वर काढतेच. आत्ताच पाहाना. किती आवेगानं मी बिलगले. ओठ टेकलेत, पण कुठे? माझ्या कपाळावर. सूर्य पृथ्वीचं चुंबन घेतो ते कपाळाचं नाही– समजलं..."

नि तू अनन्य अपेक्षेनं माझ्याकडे डोळे किलकिले करीत पाहू लागलीस. तोंड निमुळतं केलंस. ओठ चटकन पुढे केलेस. त्यांना पडलेली गोड दुमड...वलयाकार दुमड पाहताच मी कसल्या तरी धुंदीत स्वत:ला हरपलो नि आवेगानं त्या नाजुक ओठांवर माझे ओठ टेकले...एकदा...दोनदा...तीनदा...

दुसऱ्या दिवशी स्वप्नाच्या धुंदीतच मी कचेरीत गेलो. काल घडलं ते सत्य की स्वप्न, याच्या विचारातच मी कामाला लागलो. तुझी खूप वाट पाहिली. आज मी सर्वस्वी निरळा झालो होतो. माझी अलिप्तता, कठोरपणाचा मुखवटा, एकाकीपण, सारी जणू दूर गेली. एका निराळयाच भावनासागरात मी यथेच्छ डुंबलो होतो

नि त्या सुखाच्या स्मृतीनं क्षणाक्षणाला ताजेपणानं पुलकित होत होतो. कणन् कण बदलला होता माझा, पण तुझं काय झालं असेल. वेड लावणारी तुझी वागणूक आता कशी होईल? तू कशी दिसशील? कशी बोलशील? कशी हसशील?

उत्सुकतेनं तुझी वाट पाहिली, पण तू आली नाहीस. शेवटी कंटाळून कामाला हात घातला. ज्या हातानं काल मी तुला जवळ ओढली होती, त्याच हातानं निरस कागदांचे गठ्ठे मी हाताळू लागलो. मूर्तिमंत आकर्षकता जवळ करणारा आता निर्जीव कुरूपतेला हात लावू लागला. पण तू आली नाहीस. उशिराही आली नाहीस...

दुसऱ्या दिवशीही तुझी खुर्ची रिकामीच राहिली. ती पाहताच मला तुझं मोहित करणारं हास्य आठवे. तुझं तरंगत चालणं स्मरू लागे. जणू तू माझ्यासमोर पुन्हा बसली आहेस. प्रीतीच्या उत्कटतेनं माझ्याकडे पाहत आहेस. मला बोलावीत आहेस. मला जवळ करीत आहेस...

पण तू खुर्चीत पुन्हा दिसली नाहीस. पुन्हा केव्हाच दिसली नाहीस.

आठच दिवसांनी तू राजीनामा दिल्याची बातमी कानावर आली.

रिकाम्या खुर्चीत कुणी दुसराच कारकून नेमला गेला. ज्या स्वप्नात मी वावरत होतो, त्याला सत्यानं भग्न करून टाकलं.

दिवस जात होते. केव्हातरी-तू येऊन भेटशील– कुठे तरी माझी वाट पाहत थांबशील...निदान पत्र तरी पाठवशील...

पण काहीच घडून आलं नाही. माझ्या जीवनात असा अचानक तू प्रवेश केलास, तितक्याच अकल्पितपणे तू दूर गेलीस. मला पुन्हा एकट्याला सोडून. निर्जीव कामांत मन गुंतवण्याखेरीज कसलाही व्यवसाय न हाती देता टाकून गेलीस.

दिवसानंतर महिने मागे पडले...

नि आज एकाएकी सायंकाळच्या संधिप्रकाशात विस्तीर्ण राजमार्गाच्या दुसऱ्या टोकाकडून संथपणानं पावलं टाकीत येत असलेल्या तुझ्या आकृतीकडे विस्मयाने पाहत राहिलो. आकार अधिक स्पष्ट होताच साऱ्या भावना चाळवल्या गेल्या. विश्रांती घेत पडलेली स्वप्नं खडी झाली. घडलेल्या घटना क्षणात ताजेपणानं डोळ्यापुढून सरकल्या. इतक्या अवधीनंतर भेटल्यावर तरी तू मला पाहताच देहभान विसरशील. धावतच माझ्याकडे येशील. उत्कटतेनं माझ्या गळ्याभोवती हात टाकशील नि म्हणशील "सूर्यास्ताला साक्षी ठेवून जे तुम्ही केलंत, त्याचा मला पुन्हा अनुभव मिळू द्या..."

तुझ्याकडे मी उत्सुकतेनं पाहत राहिलो. काय काय करावं लागणार याचे अंदाज बांधले नि मनाची तयारी करून खिळून राहिलो.

एक एक पावलानं पुढे येताच उत्सुकतेला उधाण येऊ लागलं.

अगदी चार पावलांवर तू येताच उत्सुकता शिगेला पोचली.

आता तू नक्की माझ्याकडे पाहशील नि घाव घेशील.

तसं तू माझ्याकडे पाहिलंसदेखील. नेत्र विस्कारित करून बघितलंस. क्षणभर जागच्या जागी थांबलीसही. पण —

नंतर जणू काही झालंच नाही अशा सहजतेनं चालू लागलीस! जणू मी अपरिचित होतो. जणू मी कोण, कोठला, हे तुला माहीतच नव्हतं. जणू तू मला बघितलंसच नव्हतं?...

मी अधिक रोखून पाहिलं. तुझ्यात झालेला हा विलक्षण बदल कशामुळे झाला असावा, याचं कारण शोधण्यासाठी अधिक तीव्र दृष्टीनं तुझ्याकडे बघितलं...

तू तीच होतीस. तशीच तरंगत तरंगत चालण्याची लबक. तेच काळेभोर डोळे, तेच कपाळावर भुरभुरणारे नाजुक कुंतल... सारं तेच. फक्त गळा पूर्वीप्रमाणे रिकामा नव्हता. त्यांत काळचा पोतीत ओवलेलं मंगळसूत्र होतं!...

माझ्याकडे अर्धवट तू बघितलंस. तोंडावर कसलाच भाव उमटला नाही. अगदी निर्विकार होतं तुझं मुख. नि तू तशीच चालू लागलीस.

पाठमोऱ्या वळलेल्या तुझ्या देहाकडे पाहता पाहता उराशी जोपासलेल्या मधुर स्मृतीचे तुकडे झाले. इतस्ततः फेकले गेले. मन बधिर झालं अन् अत्यंत त्वेषानं तोंडातून उद्गार बाहेर पडले, 'तीच का तू?...तीच तू असशील का?–' ● ● ●


श्री. ब. मो. पुरंदरे


*यांची नवी ऐतिहासिक कादंबरी प्रसिद्ध झाली*

# शिलंगणाचं सोनं

मूल्य तीन रुपये

*राजहंस प्रकाशन*

*४१९ नारायण, पुणे २*



# नाझी भस्मासुराचा उदयास्त

निवेदन :

रा. म. शास्त्री

" नाझी भस्मासुराचा उदयास्त " ही लेखमाला आता संपली. या लेखमालेचे वाचन अगणित वाचकांनी केले. माझ्यावर पत्रांचा पाऊस पाडला. लेखनाचे– यात वृत्तपत्रीय लिखाणही येते– यश म्हणजे काय असते, याचा थोडा अनुभव वाचकांनी मला दिला. त्यांचे ऋण मी कसे विसरेन ?

यातील यशाचा मोठा वाटा अॅडॉल्फ हिटलरच्या व्यक्तिमत्त्वाचा आहे. उरलेला शिरर, अॅलन बुलॉक, विन्स्टन चर्चिल, आर्थर ब्रियांट, ख्रिस्तोफर ह्यूबर्ट आदि पाश्चात्त्य लेखकांचा आहे. केवढा जबरदस्त या लेखमालेचा विषय होता, याची आता कल्पना येते. मी फक्त निवेदक होतो. त्यासाठी जेवढे कौशल्य लागते तेवढेच माझे.

मी हा ' नाझी भस्मासुर ' काहीसा सहानुभूतीने उभा केला, असा आरोप माझ्यावर कुणी केला तर मी तो नाकारणार नाही. मी जास्तीतजास्त सहानुभूतीने या भस्मासुराकडे पाहिले. ते आवश्यक होते. कारण गेल्या वीस–पंचवीस वर्षांत जास्तीत जास्त काळ्या रंगात हिटलरला रंगवण्याची अहमहमिकाच लागलेली आहे. याचे लोण येथपर्यंत गेले आहे, की स्वत:वर गोळी झाडून घेण्याचे

धैर्यही त्याचेपाशी नव्हते व तो विष खाऊन मेला, हे सिद्ध करण्यासाठी त्याच्या दातांच्या कवळीचे बाष्कळ पुरावे काही प्रचारकी लेखकांनी मांडण्यास सुरवात केली आहे. यासाठी ही सहानुभूती अवश्य होती. हिटलरचा वंशवाद, त्याच्या अनुयायांनी केलेले भीषण अत्याचार, ज्यूंची त्यांनी केलेली लांडगेतोड यांविषयी ज्याला सहानुभूती वाटेल, असा माणूस केवळ पशुकोटीत जाण्यासच लायक आहे. या गोष्टीविषयी मी सहानुभूती दाखवलेली नाही.'

पण हा आततायी काळ केवळ चार वर्षांचा होता. त्याचे आयुष्य ५६ वर्षांचे होते. त्याचे ५२ वर्षांचे आयुष्य सहानुभूतीनेच तपासले पाहिजे. शिवाय नाझी भस्मासुराला गाडण्यात ज्यांनी मोठा वाटा उचलला, त्या लाल रशियात काय कमी अत्याचार घडले आहेत ? अगदी काल–परवा तेथील "यातना तुरुंगाच्या" भीतीने मृत्यूला मिठी मारणाऱ्यांची उदाहरणे प्रसिद्ध होत आहेत. स्टॅलिनशाहीतील अत्याचार आणि नाझी–अत्याचार यांत फरक इतकाच करता येईल, की साम्यवादी तत्त्वांच्या प्रसारवेदींवर स्टॅलिनचे अत्याचार होते. नाझींजवळ जगाला वर नेणारे तसे काहीही नव्हते. परंतु साम्यवादाचा जो अर्थ स्टॅलिनने लावला तोच खरा कशावरून ?

तरीही अशा भस्मासुरांची चरित्रे सहानुभूतीने तपासणे आवश्यक ठरते. आपण प्रतापगडावर जातो व अफजलखानाची राजेशाही थाटात सांभाळलेली कबर पाहतो. हा अफजलखान शिवाजीराजांचा मारेकरी. माथेफिरू, मूर्ख अशा शब्दांत शिवाजीराजांनी त्याची हेटाळणी केली नाही. तो माथेफिरू नव्हता. ठरवून, विचार करून पैजेचा विडा उचलून आलेला प्रचंड मोगली सत्तेचा तो प्रतिनिधी होता. परंतु अफझलखान नेमका काय होता, कोण होता, हे समजून घेतल्याखेरीज शिवरायाचे मोठेपण तरी कसे समजणार ? राम समजायला रावण समजून घ्यावा लागतो. मग कळते, की रावणाला संगीताचे वेड होते. चांगले संगीत त्याला कळत होते. तो फार मोठा शिवभक्त होता. हा त्याचा गुण समजला तर तो मान्य करावयाचा की नाही ? की खोटेच सांगत सुटायचे– 'त्या क्रूर रावणाला संगीत कशाशी खातात हे देखील कळत नव्हते.' रावणाने केवढी उपासना केली होती, याचे चित्रण करावयाचे की नाही ? का खोटाच इतिहास लिहावयाचा ? ज्याचे देणे त्याला दिले पाहिजे; मग तो रावण असो, अफझलखान असो, गोडसे असो वा ॲडॉल्फ हिटलर असो. दुसरे महायुद्ध ही आमच्या पिढीतील सर्वांत प्रक्षोभक घटना होती. महात्माजींच्या अहिंसेची त्यावेळी कोंडी झालेली होती. 'हरिजन'-मधून महात्माजी त्यावेळी आपले विचार मांडत होते. येथे अराजक झाले तरी चालेल, पण ब्रिटिशांनी येथून चालते झाले पाहिजे. एकीकडे भारतीय स्वातंत्र्याचा हा नवा मंत्र महात्माजी उच्चारू लागले होते आणि याच सुमारास दुसरे महायुद्ध भडकले.

## २५ वर्षांपूर्वी

आकाश निमिषार्धात झाकळून यावे त्याप्रमाणे सहा-सात महिन्यांत ॲडॉल्फ हिटलरच्या सामर्थ्याने जग स्तिमित झाले. ब्रिटिशांचा होणारा चौफेर पराभव पाहत असताना भारतात असंख्यांना समाधान वाटत होते. यात अनैसर्गिक काहीही नव्हते. ब्रिटिश ठेचले जात आहेत, याचाच तो आनंद होता.

मला आठवते, १९४० च्या मे महिन्यात सुटीत त्यावेळी मी मामांकडे गेलो होतो. घरापासून स्टेशन दोन मैल लांब होते. धुळीचा रस्ता. दुपारी सर्वत्र रखरखीत ऊन असताना रस्ता तुडवीत आम्ही स्टेशनवर जात असू. मुंबईची गाडी आली की टाइम्स येई. जाताना काय उन्हाचा त्रास होई तेवढाच. येताना जर्मन सैन्याच्या विजयाची वर्णने वाचताना रस्ता कधी संपे ते कळत नसे. अशा वेळीही "हिटलर कितीही पुढे गेला तरी अखेर विजय आपल्याच साहेबाचा होणार," असे आमचे वडील व मामा सांगत. सर्वत्र अंधार असताना उजाडणार कुठल्या बाजूने हे नक्की सांगणे त्यांना का शक्य होत असे? १९१४ चे युद्ध त्यांनी पाहिले होते, याचा तो परिणाम असावा. कदाचित अनुभवी व सत्प्रवृत्त माणसाची त्यावेळीही हिटलरचा अंती विजय होऊ शकणार नाही, अशीच मनाची धारणा असावी.

हिटलरच्या प्रेमाला आपल्या गुलाम देशात कसे उधाण आले होते व त्यातून, काही माणसे काय काय विनोद निर्माण करीत, याची एक आठवण सांगतो.

आमच्या गावात त्यावेळी एक मोफत वाचनालय होते. गाव लहान. आठ-दहा हजारांचे. मोफत असूनही वाचनालयात युद्धकालापूर्वी कोणीही वाचायला येत नसे. मी या वाचनालयाचा स्वयंसेवक असल्यामुळे वाटोळ्या दगडी टेबलावर चार-पाच मासिके व मल्या मोठ्या पलंगाच्या आकाराच्या विटक्या टेबलावर लोकमान्य, नवाकाळ, टाइम्स अशी वर्तमानपत्रे मी नीट लावून ठेवून वाचकांची वाट पाहत बसत असे. दोन तासांत एखादुसरा वाचक आत येई व मग वाचनालय बंद करून मी जात असे. त्या सेवेचे आता हसू येते. पुढे युद्ध सुरू झाल्यावर मात्र तीन-चार वाचक सकाळी हटकून येऊ लागले.

फारशी गर्दी नसे, पण तेच तेच चारपाच वाचक वाचनालयात येत. लहान गावात सर्वच सर्वांच्या ओळखीचे असतात. आम्हाला हायस्कूलमध्ये मराठी शिकवणारे मास्तर हिटलरच्या प्रेमाने अगदी वेडे झाले होते. वाचनालयातल्या बाकड्यावर मांडी ठोकून, गीता पुढे ठेवून ज्ञानेश्वर महाराजांनी टीका करावी, त्याप्रमाणे समोरची बातमी वाचून ते त्यावर सोइस्कर मल्लिनाथी करीत. कधी कधी याकरता आदल्या दिवशीचे किंवा आठवड्यातले वृत्तपत्रांचे अंक संदर्भासाठी लागत. मी त्यांचा एकेकाळी विद्यार्थी असल्यामुळे "परवाचा 'लोकमान्य' आण रे," किंवा "गेल्या आठवड्यातला 'टाइम्स' आण रे," अशी फर्माने ते अधूनमधून

सोडीत. ती मला मानावी लागत.

एकदा त्यांनी विलक्षण रंगात येऊन सांगितले—

' बर्लिनच्याखाली प्रचंड तळघर आहे. तिथे पाच हजार–फाईव्ह थाउजंड–विमाने जय्यत तयार असतात. ही गोष्ट हिटलर, गोअरिंग, गोबेल्स यांशिवाय कुणालाही ठाऊक नाही ! "

पहिल्या धडाक्याला यातला विनोद कुणाच्याच लक्षात आला नाही, इतक्या युद्धाच्या गप्पा त्यांनी आधी रंगवल्या होत्या. अवतीभवती जमणाऱ्या तीनचार श्रोत्यांना मात्र मास्तर हे हिटलरच्या खास अंतर्वर्तुळातले आहेत, असा साक्षात्कार त्याचक्षणी झाला असावा.

नाझी भस्मासुराचा उदयास्त ही लेखमाला लिहिण्यापूर्वी ' माणूस ' मासिकातून मी " रणावीण स्वातंत्र्य जेव्हा मिळाले " ही लेखमाला लिहिली. स्वातंत्र्ययुद्धातील फाळणीपर्वाचा हा इतिहास आहे. त्यावेळी मासिक लहान होते. रूपाने लहान होते. फक्त किमतीने मोठे होते. या लेखमालेवर वाचकांनी पत्रांचा सतत अभिषेक धरला.

यानंतर मिलोवन जिलासच्या Conversation With Stalin या पुस्तकावर मी लेखमाला लिहिली. यामुळे काही तरुणमित्रांचा रोष झाला. त्यांनी जिद्दीने या लेखमालेवरील आक्षेप स्वखर्चाने छापून ही पत्रिका महाराष्ट्रात पुष्कळ दैनिके, साप्ताहिके व मासिके यांच्याकडे पाठवून आपला रोष व्यक्त केला. मला वाटते, या पत्रिकेवर " लोकसत्ता ", " तरुण भारत " या पत्रांतून जी दखल घेतली गेली, त्यात मला किंवा संपादकांना दोष देणारे एक वाक्यही नव्हते. माझे भाषांतर चुकीचे आहे, असा त्यांचा आक्षेप होता. मी चांगला भाषांतरकार आहे, असा माझा दावा नाही. मूळ अर्थाला धक्का लागणार नाही, याची मी सतत काळजी घेतो. काहीही असो, माझे वेडेवाकडे भाषांतर हजारो वाचक आवडीने वाचतील, असा विश्वास माझे मित्र व ' माणूस 'चे संपादक श्री. माजगावकर यांना वाटला, ही गोष्ट मात्र खरी.

मध्यंतरीच्या काळात ' ने मजसि ने परत मातृभूमीला ' ही दलाई लामांची (My land and my people) आक्रोशकथा व ख्रिस्ताईन किलरची सभ्यांचे बुरखे ओढणारी गोष्ट मी वाचकांना सांगितली होती. वाचकांची पत्रे ही आता नित्याची बाब झाली होती. ' माणूस 'च्या कचेरीत गेलो, की सौ. पुरंदरे म्हणत, " अहो, या पत्रांचा फारच त्रास व्हायला लागलाय. आता तुमचा पत्ता देते म्हणजे तुम्हीच माना आभार वगैरे."

## आधारभूत ग्रंथ

याच सुमारास केव्हातरी विल्यम शिररचा 'Rise and Fall of the third Reich " या पुस्तकाचा ठोकळा श्री. माजगावकर यांनी माझे हाती ठेवला. मला म्हणाले, " आत्तापर्यंतच्या लेखमाला काहीच नाहीत, अशी ही लेखमाला वाचक

डोक्यावर घेतील." माझ्या पोटात गोळाच आला. आधी त्या पुस्तकाचे दर्शनच लोमस नाही. बारीक टाइप व १७०० पृष्ठे. मी टाळाटाळ करीत होतो. शेवटी मी पुस्तक वाचून पाहण्याचे मान्य केले.

श्री. माजगावकरांचे हिशेब सहसा चुकत नाहीत. त्यांना हिशेब कळत नाही, असे सांगणारे लोक माझ्या परिचयात आहेत. परंतु आजच्या वाचकांची नाडी बरोबर हेरणारा त्यांच्याइतका जाणता संपादक नाही, याबद्दल मला शंका नाही. मी ज्या लेखमाला लिहिल्या, ही सर्व पुस्तके व विषय त्यांनीच निवडले होते. मी फक्त लिहावे, तेही भिकार अक्षरांत. त्याची प्रेससाठी प्रत करताना सौ. पुरंदरे यांनी अक्षरशः रडकुंडीस यावे व माझ्या अक्षराला पुष्कळ शिव्याशाप मिळाल्यावर हाती आलेले कागद संपादित करून, सजवून मांडावेत माजगावकरांनी – अशी या लेखमालांपुरती श्रमविभागणी होती.

श्री. माजगावकरांचा नाझीवरील लेखमालेचा हिशेबही अचूक ठरला. मी पुस्तकाचे पहिले वाचन केले. त्यात रंगून गेलो. तोपर्यंत या विषयावरील बरीच पुस्तके श्री. माजगावकरांनी गोळा करीत आणली होती. ॲलन बुलॉकचे "Hitler study in Tyreny," विन्स्टन चर्चिल यांच्या सहकार्याने 'लाईफ' मासिकाने प्रसिद्ध केलेला प्रचंड सचित्र इतिहासग्रंथ, "The Scorage of Swastika" हा नाझींच्या अत्याचारांचे इतिहास सांगणारा ग्रंथ, माँटगोमेरीच्या आठवणी, अशी बरीच पुस्तके जमा झाली होती. विषय जसजसा पुढे सरकू लागला, तसतशी निरनिराळ्या ठिकाणांहून अनेक पुस्तके उपलब्ध झाली. "The turn of the Tide" व "Triumph in the west" हे फिल्ड मार्शल ॲलन ब्रूक यांच्या दैनंदिनीवर आधारित ग्रंथ, ख्रिस्तोफर ह्यूबर्ट याने लिहिलेले मुसोलिनीचे चरित्र, 'म्युनिच' या विषयावरील अनेक पुस्तके, दुसऱ्या महायुद्धाच्या काळात निरनिराळ्या पाश्चात्त्य नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले युद्धविषयक लेख, 'न्यूरेन्बर्ग' खटल्यावर आधारित पुस्तके, पेपेनची डायरी, मार्टीन बोरमन याने संपादिलेली हिटलरची मनोगते, अशी असंख्य पुस्तके यांत समाविष्ट आहेत. यामुळे लेखमालेचे स्वरूप फक्त शिररच्या पुस्तकावर आधारित लेखमाला असे न राहता पुढे बदलले व पुष्कळसे स्वतंत्रच झाले.

लेखमालेसाठी शिररचे पुस्तक प्रथम निवडले व पहिला प्रदीर्घ लेखांक मी हातावेगळा केला. लेख कंपोज झाला. लेखमालेला नाव काय द्यावे ते ठरेना. मी व संपादक विचार करीत होतो. मथळ्यांत राईश हा शब्द नकोच होता, कारण तिसरे राईश म्हटल्यावर पहिल्या व दुसऱ्या राईशचे काय, असा प्रश्न सामान्य वाचकाला पडेल. 'माणूस' चे प्रत्येक पान – मथळे – चित्राखालील मजकूर वाचकाला आकर्षक वाटला पाहिजे, अशी काळजी प्रत्येकवेळी घेतली जातेच. ही प्रथा सुरवातीपासून होती. शेवटी प्रेसने लेखमालेचे नाव उद्या कळवलेच पाहिजे,

असा तगादा लावला.

१९६४ च्या मे महिन्यातल्या एका रात्री मी व संपादक रस्त्यावरील एका दुकानाच्या कट्ट्यावर बसलो होतो. लेखमालेला हे नाव सुचव, ते सुचव असे चालले होते. मथळ्यात नाझी शब्द हवाच, असे त्यांचे म्हणणे होते. एकाएकी माझ्या मनात या नाझीचा भस्मासुराशी संबंध जोडून टाकावा, असे आले. नाझी भस्मासुर हा अर्धा मथळा तयार झाला. त्याला उदयास्त जोडून "नाझी भस्मासुराचा उदयास्त" हा मथळा तयार झाला. हे नाव निश्चित झाले, तेव्हा रात्रीचा एक वाजला होता.

आता आश्चर्य वाटते, की एवढे सोपे नाव सुचायला एवढा त्रास का पडावा? विषय परका असला तरी येथल्या भूमीशी त्याचे नाते जोडायला हवे होते. या मथळ्यात ते तसे जोडले गेले व आम्हा दोघांना कोलंबसासारखा आनंद झाला खरा!

जून १९६४ च्या अंकात हा पहिला लेखांक प्रसिद्ध करताना संपादकांनी म्हटले,

"नाझी जर्मनीचा व हिटलरच्या उदयास्ताचा सत्य इतिहास कथन करणारे हे प्रचंड पुस्तक शास्त्रींनी परिचयासाठी निवडले आहे. ते यावेळीच का निवडले? महत्त्वाचे कारण म्हणजे हिटलरपूर्व जर्मनी व आजचा भारत यांच्या परिस्थितीत शास्त्रींना आढळणारे विलक्षण साम्य—

"—तीच भीषण महागाई, तीच बेकारी, तीच विषमता, तोच भ्रष्टाचार, तीच परकीय भांडवलावर पोसली गेलेली फसवी शहरी सुबत्ता, शत्रुराष्ट्रांकडून सतत भारताची चाललेली मानखंडना, पुरोगामी लोकशाही नेतृत्वाचा तोच पडखाऊ नेभळटपणा—"

## वाचकांच्या प्रतिक्रिया

आता खरे सांगायला हरकत नाही. पुस्तकाच्या निवडीची माझी म्हणून जी कारणे वर दिली आहेत, ती निवड श्री. माजगावकर यांनी केलेली होती. श्री. माजगावकरांनी मला टिळा लावून या वारीत दाखल केले. वाचक म्हणू लागले, "ग्यानबा–तुकाराम" आणि ही दिंडी सुरू झाली.

जूनचा अंक बाजारात आला आणि पत्रांची अशी मांदियाळी उसळली की, या वारीत सगळा शीण संपून गेला. जुलै १९६४ च्या अंकात स्थलाभावी एकच पत्र प्रसिद्ध केले आहे. नागपूरहून श्री. अनंतराव पाटील नावाच्या वाचकाने लिहिले–

"...... हिटलरच्या जीवनावरील लेख तर सुरवात केल्यापासून संपेपर्यंत खाली ठेवावासा वाटत नाही."

मुंबईहून मेदिनी यांनी लिहिले,

"गेले दोन महिने आपल्याला धन्यवाद द्यायचे ठरवीत होते. "नाझी भस्मासुराचा उदयास्त" हा श्री. रा. म. शास्त्री यांचा लेख म्हणजे माझ्यासारख्या इतिहासप्रेमी लोकांना आनंदाची पर्वणीच आहे. अर्थात याचे सर्व श्रेय Willam shi-

rar याला द्यायचे काहीच कारण नाही. केव्हा केव्हा प्रतिबिंब हे मूळ बिंबापेक्षा अधिक लोभस दिसते......

नांदेड, नागपूर, औरंगाबाद, सांगली, सातारा वगैरे ठिकाणांहून येणाऱ्या पत्रांची संख्याही पुष्कळ होती. पुण्या–मुंबईने तर पत्रांचा वर्षाव केला.

लेखमाला पुढे जाऊ लागली. जुन्या अंकांच्या सतत मागण्या येऊ लागल्या. खरं म्हणजे सौ. पुरंदरे पत्रव्यवहाराला अतिशय गोड. त्या कळवीत, "जुने अंक खरोखर नाहीत." मराठी मासिकाचे जुने अंक नाहीत म्हणजे काय? एका वाचकाने लिहिले, "जुने अंक फुटपाथवर मिळतील म्हणून पुष्कळ हिंडलो. फुटपाथवरही जुने अंक मिळत नाहीत; तरी ऑफिसमध्ये असलेली एखादी प्रत पाठवा." पत्रे लिहिणाऱ्यांत प्राध्यापक, शेतकरी, कॉलेज–विद्यार्थी, वृत्तपत्रविक्रेते आणि स्त्रियाही आहेत. स्त्री–वाचकांची पत्रे या संख्येत अल्प आहेत. त्यांपैकी एक मार्मिक पत्र कऱ्हाडहून सौ. कुंदा गानू यांचे आहे. "...आपल्या पाक्षिकात श्री. रा. म. शास्त्री यांचे लेख येतात. प्रत्येक लेखावर स्वस्तिकाचे चिन्ह असते. भारतातल्या या सुचिन्हाचा वापर हिटलरकडे त्याच्या उलट असतो. तेव्हा कृपा करून हे चिन्ह बदलावे."

प्रत्यक्ष व्याख्यानाला बोलावून, पत्र पाठवून वाचकांनी या लेखमालेसाठी सतत जागरूक अवधानाचा चारा पुरवला. अद्ययावत पत्रांची दखल घ्यायची म्हटले तर या समारोपात आत्मस्तुतीचा दोष येईल. तेव्हा या असंख्य पत्रलेखक–वाचकांनी मला क्षमा करावी.

हिटलरच्या उदयास्तावर पुनः दृष्टिक्षेप टाकला तर काय विशेष गोष्टी लक्षात येतात? पहिली गोष्ट म्हणजे ज्या काळात हिटलरने आपल्या नाझी संघटनेचा संकल्प सोडला, तो काळ त्याला मुळीच अनुकूल नव्हता. १९२५ ते १९२९ या कालात जर्मनी हा स्वतःच्या बळावर अवलंबून न राहता अमेरिकेच्या भांडवलावर जगू पाहत होता. अमेरिकेच्या फुगलेल्या तिजोऱ्यांतून कर्जाच्या रूपाने पैसा जर्मनीत ओतला जात होता. जर्मन कारखानदारी अमेरिकेच्या कबजात गेली होती. गरीब, मध्यमवर्ग, लाखो लहानसहान दुकानदार, कमी पगारावर जगणारी कारकूनमंडळी या दिवाळखोरीत आपले सुख शोधीत होती.

जर्मनीच्या वाट्याला आलेल्या या लाचारीची, नालायकीची खंतच कुणाला वाटत नव्हती. अशा परिस्थितीत हिटलरने ही गोष्ट ओळखली होती, की हा काळ फार दिवस टिकणार नाही. हा चलन-फुगवट्याचा बुडबुडा एक दिवस फुटणार आहे आणि त्यावेळी देशात दिवाळखोरी माजवणाऱ्या नेतृत्वाच्या नाकांना बुडबुडे येणार आहेत. पुढे घडणाऱ्या घटनांचा अचूक अंदाज घेण्याइतके दूरदर्शित्व हिटलरपाशी होते.

एखाद्या सरकारी कचेरीत कागदी तक्ते भरीत बसण्याकरता आपले आयष्य नाही, असा साक्षात्कार त्याला पूर्वी झालेला होता. त्याने शाळेत शिकवल्या जाणाऱ्या शिक्षणाला रामराम ठोकलेला होता. परंतु राष्ट्रउभारणीच्या कामात अखेर उपयोगी पडतो, त्या इतिहासाचा घ्यास त्याने आयुष्यभर सोडलेला नव्हता. ' माईन काम्फ 'मध्ये आपल्या इतिहास-शिक्षकाच्या उपकाराने भारावून गेलेला जो ॲडॉल्फ आपल्याला भेटतो, तोच ॲडॉल्फ फ्यूरर म्हणून बर्लिनच्या तळघरात, अखेरच्या घटका मोजीत असतानाही ' फ्रेडरिक दि ग्रेट ' च्या इतिहासात रंगून गेलेला आपण पाहतो. इतिहासाने माणूस वेडा होतो–शहाणा होतोच असे मात्र नाही.

जो पुरुष राष्ट्राचे उत्तरदायित्व स्वीकारीन म्हणतो, त्याला आपल्या व्यक्तित्वाचा घाट काही विशेष सायासाने घडवावा लागतो, ही गोष्टही हिटलर विसरलेला दिसत नाही. मनाची एकाग्रता, घ्यास, सायासाने प्राप्त करून घेतलेली परिमितता आणि वैराग्य या सर्व गोष्टी हिटलरने आपल्या व्यक्तिगत जीवनात स्वीकारलेल्या आढळतात. पैशाची लालसा त्याचे ठिकाणी नव्हती. मद्य, मांसाशन यांपासून तो अलिप्त होता आणि इव्हा ब्राऊला आवश्यक तेवढेच स्थान त्याने त्याच्या आयुष्यात दिले होते.

हिलटरच्या वैयक्तिक जीवनातील या वैराग्याचा प्रभाव त्याच्या अनुयायांवर विलक्षण होता. नाझी-चळवळीत त्याचा उजवा हात असलेला अर्न्स्ट रोएम याला जेव्हा आत्मघाताची मुभा देण्यात आली, तेव्हा त्याने काढलेले उद्‌गार काय दर्शवतात ? " जर मला मारावयाचेच असेल तर स्वत: ॲडॉल्फने मला गोळी घालावी." त्याचा शत्रू झालेल्या रोएमला, मरण ॲडॉल्फच्या हातानी यावे असे वाटत होते आणि ज्या जगात फ्यूरर नाही त्या जगात जगणे शक्य नाही म्हणून आपली सहा मुले निर्घृणपणे मारून पत्नीसह आत्मघात पत्करणारा गोबेल्सही हेच सांगतो, की हिटलरवरील त्याच्या अनुयायांची निष्ठा विलक्षण होती.

संघटना उभी करण्यात या निष्ठेचा हिटलरला प्रमुखत: उपयोग झाला. परंतु संघटना उभी झाली म्हणून काही राजकारणाचा कबजा त्याला मिळाला नाही. राजकारणातले, निवडणुकीतील सर्व डावपेच त्याला खेळावे लागले.

राजकारणातले यश हे कसे असते ? या यशाइतकी डागळलेली वस्तू या जगात दुसरी नसेल ! सुप्रसिद्ध इंग्लिश समाजवादी नेते ॲन्यूरिन बेव्हन यांच्यासंबंधी लिहिताना ' गार्डियन 'ने म्हटले आहे,

" Supreme success in politics requires a complete concentration on the achievement of power and a readiness to sacrifice friends and principles to that single end. "

[ राजकारणातील अत्युच्च यश मिळविण्यासाठी सत्तेसाठी एकाग्रतेने धडपड करावी लागते व वेळप्रसंगी ही गोष्ट साधण्यासाठी मित्रांचा व तत्वांचा बळी द्यावा लागतो. ]

बेव्हनपाशी या गुणाचा अभाव होता म्हणून तो मागे पडला. याच वैगुण्यामुळे असंख्य राजकीय नररत्नें वनवासात गेलेली आजही आपण पाहतो व याच एकमेव गुणामुळे सामान्य कुवतीची माणसे महालात गेलेली आपणास पाहावी लागतात.

## एकपात्री प्रयोग

ज्या लोकशाहीच्या आणि निवडणुकीच्या राजकारणात सत्ता मिळविण्यासाठी अथवा टिकविण्यासाठी तत्त्वांचा बळी द्यावा लागतो, त्या राजकारणाच्या आखाड्यात हिटलरला उतरावेच लागले.

–आणि या आखाड्यात हिटलरचा बेव्हन झाला नाही ! हिमलरला हाताशी घेऊन त्याने रोएमचा काटा काढला. परंतु तो काढताना स्वतःच्याच पायातला काटा निघताना होणारे दुःख त्याला झाले असले पाहिजे. पण सत्तेच्या या खेळात हिटलरने ब्रुएनिंग, पॅपेन व स्लाचशर यांना इतक्या झपाट्याने टांगा दिलेल्या आपण पाहिल्या, की या डावपेचातही त्याचे प्रभुत्व असामान्य होते असे म्हणावे लागते.

देशातील राजकारणात सर्व वैधअवैध मार्गांनी यशस्वी झालेला नेता, आंतरराष्ट्रीय क्षेत्रात कसा सफाईने उताणा होतो, याचा अनुभव आपल्याला आहेच. हिटलरने व्हर्साइल्सच्या तहाच्या चिंध्या करताना जे परराष्ट्र-राजकारण केले, त्याची हकीकत वाचताना त्याने इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, रशिया यांना कसे झुलवत ठेवले, याचा अचंबा वाटतो. कधी धमकी तर कधी नमते, कधी युद्धाची आरोळी, तर कधी शांततेची तान, कधी राईशस्टॅगमधून सरबत्ती, तर कधी म्युनिच स्पिरिटचे गुणगान, असा हा जगाच्या मंचावरील अक्षरशः एकपात्री प्रयोग होता.

प्रखर देशभक्ती, सूत्रबद्ध संघटना, अमोघ वक्तृत्व, देशाच्या राजकारणातले यशस्वी डावपेच, परराष्ट्र राजकारणावरील पक्की मांड, हे सर्व हिटलरपाशी होते. तरी अखेर त्याचा पराभव का झाला ? सुदैवाने हिटलरने पराभवाच्या छायेत असताना लिहिलेली आपली मनोगते मागे ठेवली आहेत. देशाच्या जीवनात एवढी उलथापालथ करणाऱ्यांना आपल्या कर्तृत्वाचे सिंहावलोकन करण्याची संधी सहसा मिळत नाही. हिटलरला ही संधी मिळाली. त्याने आपल्याला काय वाटले हे सर्व लिहून ठेवले आहे. अर्थात या सिंहावलोकनासाठी जी चोख भूमिका लागते, ती घेणे सहसा शक्य होत नाही. म्हणूनच हिटलर पराभवाचे खापर ज्या गोष्टींच्या माथी फोडतो, त्याचे सत्यासत्य पारखून पाहता त्याने काढलेले निष्कर्ष योग्य दिसत नाहीत. हे जरी खरे असले तरी त्याच्या विचारपद्धतीवरून त्याच्या मनाच्या धारणेवर पुष्कळसा प्रकाश पडतोच.

चुका काय झाल्या ? लढाई सुरू करण्यात चूक झाली का ? रशियावर हल्ला करण्यात चूक झाली का ? जिब्राल्टर न घेण्यात चूक झाली का ? का फ्रान्सला दया दाखवण्यात चूक झाली ? हे सर्व प्रश्न हिटलरने हाताळलेले आहेत.

युरोपात त्याने युद्ध सुरू केले, यात चुकले असे हिटलरला वाटत नाही. जर्मनीच्या

नेतृत्वाखाली युरोप संघटित करून बोल्शेव्हिकाविरुद्ध लढाई सुरू करण्याचा आपला इरादा असताना, इंग्लंड–फ्रान्सने जर्मनीविरुद्ध युद्ध पेटवले, असे हिटलर म्हणतो.

तेव्हा युद्ध सुरू झाले ते इंग्लंड–फ्रान्सने सुरू केले. १९४० साली तरी इंग्लंडने फ्रान्सच्या शरणागतीनंतर युद्ध बंद करावे, यासाठी जर्मनी उत्सुक होता, असे हिटलर सांगतो. पण यावेळी इंग्लंडने युद्ध समाप्त केले असते, अशी आपण कल्पना केली, तरी युद्ध संपले असते का ? तसे दिसत नाही. कारण हिटलरच सांगतो की, " पिछाडी सुरक्षित झाली असती की माझ्या जीवनाच्या उद्दिष्टानुसार जर्मनी, बोल्शेव्हिझमचा नायनाट करण्यासाठी तुटून पडला असता. " इतकेच सांगून हिटलर थांबत नाही, तर तो सांगतो की, " पूर्वेच्या दिशेने व फक्त पूर्वेच्याच दिशेने जर्मन नसा वाढत गेल्या पाहिजेत. " म्हणजे युरोपात रशियाशी युद्ध हा मुळी हिटलरच्या आयुष्याचाच एक अविभाज्य भाग होता. हे युद्ध न करता जर्मनीचे अस्तित्वच त्याला सुरक्षित वाटत नव्हते.

म्हणजे डँझिगच्या प्रश्नावर सप्टेंबर १९३९ मध्ये इंग्लंड, फ्रान्सने युद्ध पुकारले नसते व पोलंडने नमते घेतले असते, तरी वर्षा–दोन वर्षांत पोलंडचा कबजा करून हिटलरची सैन्ये रशियावर कोसळलीच असती. तेव्हा रशियावर हल्ला करण्यातही चूक झाली, असे हिटलरला वाटत नाही व हे त्याच्या दृष्टीने योग्यच दिसते. मग चूक झाली कुठे ? त्याच्या म्हणण्याप्रमाणे चूक इथे झाली की, मुसोलिनीच्या बाल्कनमधील गाढवपणामुळे रशियावर जो हल्ला मे महिन्यात व्हावयाचा, त्याला पाच आठवडे उशीर झाला. या उशिरामुळे जर्मन सैन्याला हिवाळ्यापूर्वी मॉस्को घेता आले नाही, असे हिटलरला वाटते. नेपोलियनने मॉस्कोही घेतले होतेच; तरी फ्रेंच–फौजांना अपयश कुठे टाळता आले ? केवळ हिवाळ्यापूर्वी मॉस्को घेता आले नाही म्हणून पराभव झाला या म्हणण्यात तथ्य नाही.

लष्करी–सामर्थ्यावर हिटलरने युरोपखंड भराभर पादाक्रांत केले. परंतु खाणे आणि पचवणे यात फरक असतो. जगाची घडी अधिक न्यायाधिष्ठित, अधिक सुखाची व्हावी, यासाठी हिटलरजवळ काही होते का ? जर्मनीला वसाहतीचा लोभ नव्हता ना ? मग जर्मनीने इटालीच्या आफ्रिकेतील वसाहतवादाकडे कानाडोळा का केला ? ही आपली चूक झाली असे त्याने म्हटले आहे. परंतु ही चुक होणारच होती. कसल्याही न्यायाधिष्ठित तत्त्वांसाठी हिटलर उभा राहिलेलाच नव्हता. बोल्शेव्हिकांविरुद्ध व भांडवलशाही राष्ट्रांविरुद्ध एकाच वेळी लढून नाझींना ह्या जगात कोणती सुव्यवस्था अभिप्रेत होती ?

नाझींना जिंकलेल्या जगाची जी घडी अभिप्रेत होती, त्याचे भयानक स्वरूपही आपण पाहिले पाहिजे. सर्व युरोपात जर्मनीचे वर्चस्व असावे व इतर सर्व युरोपियन राष्ट्रांनी जर्मनीच्या भाग्यासाठी गुलाम म्हणून नांदावे, याचसाठी नाझींचा सारा अट्टाहास होता. म्हणजे भांडवलशाही साम्राज्यवादाला किंवा बोल्शेव्हिझमला कंटा-

ळलेली जनता आगीतून उठून फुफाटचात पडणार होती.

नाझी भस्मासुराच्या उदयास्ताचा हा इतिहास मराठीत सांगण्याची आवश्यकता अशाकरता होती की, या पर्वातील विलक्षण घटनांची ओळख सर्वांना झाली पाहिजे. लोकशाही मृत्युशय्येवर कशी जाते ? हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ? राजकारणातले यश कसे नेहमी डागळलेलेच असते ? सत्तेच्या राजकारणाचा आणि देशभक्तीचा अन्योन्य संबंध असावा लागतो काय ? विश्वाची चिंता वाहणारे आपले सर्व हिशोब फक्त आपल्याच देशाचा, हिताहिताचा विचार करून मांडतात किंवा काय ? राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ? दोन अशुभशक्तींच्या संघर्षातून काही शुभगोष्टी घडतात की नाही ? युद्धाने प्रश्न सुटत नाहीत, या म्हणण्यात कितपत तथ्य आहे ? या आणि अशा नानाविध प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी या इतिहासाची मदत होईल.

हे सर्व प्रचीतीचे निवेदन आहे. काय घडले आणि कसे घडले, एवढेच फक्त येथे सांगितले आहे. निष्कर्ष काढून वाचकांपुढे ठेवायची जबाबदारी फार मोठी असते. ती पत्करण्याची माझी योग्यता नाही. माझा तो विषयही नाही. मी काही विचार अधूनमधून मांडले आहेत, ही गोष्ट खरी; परंतु या विचारांची निर्मिती शास्त्रशुद्ध अभ्यासातून झालेली नाही. ओघात काही सुचत गेले ते लिहिले एवढेच.

अॅडॉल्फ हिटलर व नाझीवाद यांवर प्रकाश टाकणारी पुस्तके सतत निर्माण होत आहेत. या निवेदनात बऱ्याच उणिवा कालांतराने दृष्टोत्पत्तीस येण्याची शक्यता मी नजरेआड करीत नाही. शिवाय निवेदन करीत असताना घटनेपेक्षा त्या प्रसंगात वावरणाऱ्या पात्रांना रंगविण्यांत मी अधिक रंगून जात असे. ही गोष्ट खरी. एखादे पात्र जेवढे दुर्गुणी, तेवढे ते कथा—कादंबऱ्यांमध्ये रंगवणे अधिक सोपे असते. इतिहासाचे लेखनही याला अपवाद नाही. हिंडेनबुर्ग आणि रोएम, स्लायशर आणि पॅपेन, गोअरिंग आणि गोबेल्स, बेनेट आणि शूशेनिग, रुझवेल्ट आणि स्टॅलिन, चेंबर्लेन आणि चर्चिल, सियानो आणि मुसोलिनी, स्कोर्झेनी आणि रोमेल, क्वारा पेटॅसी आणि इव्हा ब्राऊ अशा विविध रंगीढंगी पात्रांनी या नाझी भस्मासुराच्या कालखंडाला रंग भरला आहे. ही सर्व पात्रे मला इतकी जवळची—ओळखीची वाटू लागली आहेत की, यासंबंधी एखादे नवे पुस्तक दृष्टीस पडले की मी त्यावर तुटून पडतो. सतत ४५ लेखांक होईपर्यंत वाचकांना बांधून ठेवण्याइतकी ताकद या पात्रांमध्ये होती. फक्त हिटलरलाच याचे श्रेय दिले तर ते चूक होईल.

वाचकांचा हात हा आईच्या हातासारखा असतो. तो लेखकाच्या पाठीवरून फिरला, याचे सुख वर्णन करता येणार नाही. मला हे सुख वाचकांनी दिले आहे, म्हणून त्यांचा निरोप घेताना मलाही आता चुकल्यासारखे होणार आहे.

● ● ●

१ मार्च १९६६

# ऑस्ट्रेलियाचे शंभुराजे

# बॉबी सिम्प्सन

दि. श्री. कराडकर

खेळात डावपेच लढविण्याच्या अनेक क्लृप्त्या रिची बेनॉजवळ होत्या. शक्ती-पेक्षा युक्तीने सामने जिकण्यात तो पटाईत होता; म्हणूनच ऑस्ट्रेलियाचा शिवाजी असं त्याला म्हणता येईल. बेनॉच्या उलट बॉबी सिम्प्सनचं आहे. सिम्प्सन स्वत:च्या बळाचा उपयोग अधिक करतो व या बळावर त्याने गेल्या दोन वर्षांत ऑस्ट्रेलिया संघाची इभ्रत निश्चित राखली आहे. निव्वळ ताकदीवर लढत देणारा सिम्प्सन ऑस्ट्रेलियाचा शंभुराजे ठरावा !

नुकत्याच संपलेल्या ऑस्ट्रेलिया-इंग्लड लढतीत हे पुन्हा प्रकर्षाने प्रत्ययास आले. आजारीपणामुळे पहिला कसोटी सामना सिम्प्सन खेळला नाही. दुसऱ्या कसोटी सामन्यात तो खेळला, पण पोटदुखीच्या व्यथेमुळे तो चमकू शकला नाही (पहिल्या डावात ५९ व दुसऱ्या डावात ६७ धावा). हे दोन्ही कसोटी सामने अनिर्णीत राहिले. तिसऱ्या कसोटी सामन्यात पुन्हा बॉबी खेळू शकला नाही आणि ह्या संधीचा इंग्लंडने फायदा घेतला. इंग्लंडने हा सामना १ डाव ९० धावांनी जिंकला. 'अॅशिस' परत मिळविल्या म्हणून इंग्लिश खेळाडू बेहोशीत नाचू लागले. रुग्णशय्येवरचा बॉबी हात चोळीत हे सगळं पाहत होता. गेलेली इभ्रत परत मिळविणे, हाच एक ध्यास त्याने घेतला असावा आणि मिळालेली इभ्रत टिकवूच टिकवू, हा इंग्लिश खेळाडूंचा ध्यास होता. ऐन रंगात चौथा कसोटी सामना सुरू झाला आणि बॉबी ईर्षेने बॅट घेऊन फलंदाजी करायला उतरला. बॉबीने तडफदारपणे २२५ धावा पहिल्या डावात आणि पहिल्या दमात काढून ऑस्ट्रेलियाचा विजय निश्चित केला. ह्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने एका डावाने इंग्लंडचा पराभव करून 'अॅशिस्' पुन्हा हिसकावून घेतल्या. स्वस्थपणे तंबूत बसून 'शंभूराजे' स्वत:च्याच पराक्रमावर खूष होऊन गालातल्या गालात हसत होते. वेस्ट-इंडिजच्या दौऱ्यावर असतानाही चौथ्या कसोटी सामन्यात पहिल्या डावात बॉबीने २०१ धावा काढण्याचा पराक्रम केला होता. चौथा सामना, पहिला डाव-केवढा योगायोग !

न्यू साऊथवेलसच्या रॉबर्ट बॅडले सिम्प्सनचं भरीव क्रिकेट जीवन वाखाणण्या-सारखं आहे. कसं ते पाहा-

क्रिकेटमधील अनुभवाने समृद्ध, दर्दी व जाणता असा हा लौकिकवान उजव्या हाताने फलंदाजी करतो. विशेषत: आघाडी फार छान सांभाळतो. गेल्या काही

वर्षांत आपल्या चमकदार खेळाने बॉबीने भरंवशाचा फलंदाज म्हणून लौकिक संपादन केला आहे, इतका लौकिक सध्या दुसऱ्या कुठल्याही ऑस्ट्रेलियन फलंदाजाचा नाही. फालकर्क (Faikirk) परगण्यात राहत असलेल्या एका स्कॉटिश दांपत्याचा रॉबर्ट तिसरा व धाकटा मुलगा. वडील फुटबॉलपटू. पुढे १९२० साली सिडनेला स्थायिक झाले. लहानपणी बॉबी क्रिकेटमध्ये चमकू लागला. जानेवारी १९५३ साली सिडने येथे न्यू साऊथ वेल्स व व्हिटोरिया यांच्या दरम्यान झालेल्या सामन्यात वयाच्या सतराव्या वर्षी तो खेळला (धावसंख्या नाबाद ४४ व नाबाद ८). दोन वर्षांनंतर म्हणजे जानेवारी १९५५ साली त्याने स्वतःचे पहिले शतक फडकावले ! सिडने येथे व्हिक्टोरियाविरुद्ध झालेल्या या सामन्यात धावसंख्या फारच कमी होती, पण त्यांना बॉबीचे १०४ चमकून दिसत होते ! पुढच्याच महिन्यात म्हणजे त्याचा १९ वा वाढदिवस साजरा झाल्यानंतर काही दिवसांनी सिडने येथे लेन हटनच्या एम्. सी. सी. संघाविरुद्ध खेळताना त्याने तडफदारपणे ९८ धावा काढल्या व जिम बर्कबरोबर दुसऱ्या विकेटसाठी १५९ धावांची भागीदारी केली. १९५६–५७ च्या हंगामापासून पश्चिम-ऑस्ट्रेलिया संघातर्फे तो शेफिल्ड-ढालीसाठी खेळू लागला; तो इथे १९६०–६१ च्या हंगामापर्यंत होता आणि ह्याच हंगामात त्याने संघाचे तीनदा नेतृत्व केले. डिसेंबर, १९५६ साली पर्थ येथे क्वीन्स्लँड संघाविरुद्ध खेळताना त्याने ९६ व नाबाद ११२ धावा केल्या. १९५७ च्या सुरवातीला क्रेगच्या संघाबरोबर त्याने न्यूझीलंडचा दौरा केला. दौऱ्यात 'भरीव' फलंदाजी केली (अव्वल दर्जाच्या सामन्यांत एकूण २७१ धावा केल्या. सरासरी ४५·१६); व 'स्लीप'मधील एक 'वेधक' क्षेत्ररक्षक म्हणून कीर्ती मिळविली. १९५७–५८ साली दक्षिण आफ्रिकेचा मोठा दौरा त्याने केला. स्वतःच्या पहिल्या कसोटी सामन्यात जोहान्सबर्ग येथे खेळताना त्याने ६० धावा केल्या. त्या दौऱ्यातील पाचही कसोटी सामन्यांतून तो खेळला व दौऱ्यात एकूण ६७१ धावा केल्या (सरासरी ४७·९२). ह्यामध्ये 'किंबर्ले' (Kimberley) येथे झालेल्या सामन्यातील नाबाद १५० धावांचा समावेश होतो. ह्याच सामन्यात त्याने दुसऱ्या विकेटसाठी लेस फॅवेलला १६६ मिनिटांत २९३ धावा काढण्यासाठी मदत केली.

ह्या अनुभवसमृद्धीमुळे १९५९–६० च्या हंगामात ऑस्ट्रेलियात त्याने धमाल केली. शेफिल्ड ढालीसाठी पश्चिम-ऑस्ट्रेलिया संघातून खेळताना त्याने ९८, नाबाद २३६, नाबाद २३०, ७९, ९८ व नाबाद १६१ अशा एकूण ९०२ धावा अवघ्या ५ सामन्यांत केल्या आणि ३००·६६ अशी सरासरी पटकावली ! त्या हंगामातील आपल्या सहाही डावांत तो अधिक धावा करणारा फलंदाज म्हणून मान्यता पावला. आपला हा झंझावाती उत्साह त्याने १९६० च्या फेब्रुवारी-मार्चमधील न्यूझीलंडच्या दौऱ्यातही कायम ठेवला. ह्या दौऱ्यातील अव्वल दर्जाच्या सामन्यांतील धावसंख्येत तो पहिला आला–५१८ धावा, ७४·०० सरासरी. १९६०–६१ साली त्याने अव्वल

दर्जाच्या सामन्यांतून १,२६३ धावा केल्या (सरासरी ५७·४०). ह्यांतील निव्वळ ९८९ धावा (सरासरी ७०·६४) त्याने फक्त वेस्ट-इंडिज संघाविरुद्ध खेळताना केल्या.

आपला हंगाम सुरू करताना त्याने पश्चिम-ऑस्ट्रेलिया संघासाठी वेस्टइंडिजविरुद्ध खेळताना ८७ व नाबाद २२१ (७ तास ३५ मिनिटांत) धावा केल्या. ह्या हंगामातील पाचही कसोटी सामन्यांत तो खेळला. नंतर १९६१ साली त्याने ऑस्ट्रेलिया संघाबरोबर प्रथमच इंग्लंडचा दौरा केला. पाचही कसोटी सामन्यांत तो खेळला. दौऱ्यात अव्वल दर्जाच्या सामन्यांतील धावसंख्या–१,९४७ (सरासरी ५१·२३). ह्या दौऱ्यात यॉर्कशायर संघाविरुद्ध खेळताना त्याने स्वतःच्या वैयक्तिक धावांचा विक्रम केला–१६० त्या वेळपर्यंतचा विक्रम.

ऑस्ट्रेलियात परतल्यावर आपल्या ' न्यू साऊथ वेल्स ' संघातून तो खेळू लागला आणि जानेवारी, १९६२ साली व्हिक्टोरिया संघाविरुद्ध खेळताना आयन् क्रेग-बरोबर आघाडी उघडून दोन्ही डावांत शतके फडकावली (१६१ व नाबाद १३९). १९६२–६३ साली त्याने ऑस्ट्रेलियन हंगामातील एक विक्रम केला. डिसेंबर, २२ ला त्याने हंगामातील स्वतःच्या १,००० धावा पूर्ण केल्या. यांत पर्थ येथे पश्चिम ऑस्ट्रेलिया संघाविरुद्ध खेळताना केलेल्या २०५ धावा आल्या. एम्. सी. सी. विरुद्ध ऑस्ट्रेलियात खेळताना तीन शतके झळकावली आणि सगळ्या कसोटी सामन्यांतून तो खेळला.

१९६३–६४ साली न्यू साऊथ वेल्सचा उपकर्णधार म्हणून बेनॉच्या नेतृत्वाखाली त्याची निवड झाली, पण दोन सामन्यांनंतर कप्तानपदाची माळ त्याला मिळाली. कप्तान म्हणून व्हिक्टोरिया संघाविरुद्ध मेलबोर्न येथे खेळताना बॉबीने १३५ धावा केल्या. ह्या हंगामात त्याने आपला स्वतःचा उच्चांक गाठला. ब्रिस्बेन येथे ' क्वीन्स्लंड ' संघाविरुद्ध खेळताना त्याने ६३२ पैकी ३५९ धावा अवघ्या ६२९ मिनिटांत केल्या !

१९६३–६४ च्या हंगामात पहिल्या प्रथम १,००० धावांचे लक्ष्य गाठणारा बॉबी पहिला फलंदाज ठरला, ' मेलबोर्न ' येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात नेतृत्व करून कसोटी सामन्यांतला ऑस्ट्रेलियाचा एक नवा कप्तान म्हणून लौकिक मिळविला. बेनॉची तब्येत बिघडल्यामुळे उरलेल्या तीन कसोटी सामन्यांचे नेतृत्व पण त्यानेच केले.

ऑक्टोबर, १९५९ साली डेनिस कॉम्प्टनच्या नेतृत्वाखाली ' ट्रान्स्व्हाल ' येथे गेलेल्या ' राष्ट्रकुटुंब ' संघात बॉबीचा समावेश करण्यात आला होता. जोहान्सबर्ग येथे ' ट्रान्सव्हाल-संघा 'विरुद्ध खेळताना १७८ धावा व ' जोहान्सबर्ग ' येथेच "Combined XI" विरुद्ध खेळताना १२८ धावा अशी ' भरीव ' कामगिरी.

मार्च–एप्रिल, १९६२ साली ' राष्ट्रकुटुंब ' संघामधून बॉबीने न्यूझीलंड, भारत, पाकिस्तान व हाँगकाँगचा दौरा केला आणि क्रिस्टचर्च, मुंबई व कराची येथे शतके

फडकावली.

बॉबीचा लौकिक वाढला तो इंग्लंडच्या दौऱ्याने. या दौऱ्यात 'ॲशेस' टिकविण्याची महत्त्वाची कामगिरी त्याने केली. 'लीडस्'च्या क्रीडांगणावर खेळल्या गेलेल्या चौथ्या कसोटी सामन्यात बॉबीने बॅटीच्याद्वारे असा अतुलनीय पराक्रम करून दाखविला, की जो तो म्हणू लागला, 'हे पाणी काही वेगळंच आहे.' ह्या सामन्यात त्याने २११ धावा केल्या. त्याच्या आतापर्यंतच्या कसोटी–सामन्यांतील धावसंख्येच्या बाबतीत हा वैयक्तिक उच्चांक आहे. कसोटी सामन्यांत त्याने तोपर्यंत कधी शतकही झळकावले नव्हते आणि संधी मिळताच झळकावले, ते एकच काय, पण तीन शतके ! ह्या दौऱ्यांत सरासरीनेही तो सर्वप्रथम आला. पाच कसोटी सामन्यांतील आठ डावांत तो दोनदा नाबाद राहिला व ४५८ धावा करून त्याने ७६·३३ अशी सरासरी मिळविली.

नंतर बॉबी आला भारतात ! इथेही आपल्या लौकिकाला त्याने धक्का बसू दिला नाही. मुंबईचा कसोटी सामना हरूनही मद्रासचा कसोटी सामना आधीच जिंकल्यामुळे 'रबर' गमावण्याची नामुष्की त्याने टाळली. इथे फलंदाजीत तो विशेष चमकला नाही. मद्रासच्या कसोटी सामन्यात ३० व ७७; मुंबईच्या कसोटी सामन्यात २७ व २० आणि कलकत्त्याच्या सामन्यात ६७ व ७१ अशा वैयक्तिक धावा तीन कसोटी सामन्यांतून फडकावून ४८·६६ अशी सरासरी त्याने मिळवली.

हातातून भक्ष्य निसटून गेल्यावर बिबळ्या जसा चवताळतो, तसा भारतात शतकाचे 'भक्ष्य' निसटल्यामुळे कराचीला गेलेला बॉबी चवताळला व तेथे झालेल्या पाकिस्तानविरुद्धच्या कसोटी सामन्यांत त्याने पहिल्या डावात १५३ धावा व दुसऱ्या डावात ११५ धावा फडकावून कसोटी सामन्यांत दोन्ही डावांत शतके फडकावणाऱ्या वीरांच्या मालिकेत तो जाऊन बसला.

नुकत्याच संपलेल्या इंग्लंडच्या लढतीत 'ॲशिस्' टिकविण्याची कामगिरी बॉबीने व्यवस्थितपणे पार पाडली (८८.७५ सरासरी).

बॉबी उजव्या हाताने लेगब्रेक व गुगली गोलंदाजी करतो आणि 'स्लीप्'मधील 'एक्का' म्हणून त्याचा क्षेत्ररक्षणात लौकिक आहे.

एका सिगारेट–कंपनीचा बॉबी जनता संपर्क अधिकारी असून, ३ फेब्रुवारी, १९३६ साली तो जन्मला.

अजून काही वर्षे बॉबी ऑस्ट्रेलियाचा कर्णधार म्हणून निश्चित राहील, परंतु दर वेळी त्याचा 'धावसंपन्नते'चा लौकिक त्याला उपयोगी पडणार नाही, तर त्याचबरोबर कुशल डावपेच व सराईत युक्त्याप्रयुक्त्या यांचा वारंवार उपयोग त्याला करावा लागेल आणि ह्यासाठी रिची बेनॉने पूर्वी केलेला सगळा पराक्रम त्याला आठवावा लागेल. ह्यासाठी ऑस्ट्रेलियाच्या या 'शंभुराजांना' आम्ही याद करून देतो – रिचीचे आठवावे स्वरूप । रिचीचे आठवावे डावपेच ।। ● ●

# भिंतीच्या तुंबड्या

## सुधाकर राजे

● **दुर्लक्ष करण्याची कला**

हिंदुस्थानात निरनिराळी सरकारी खाती फालतू गोष्टीसाठी पैसा खर्च करीत असतात, अशी आपण नेहमी ओरड ऐकतो. पण सरकारी पैसा उधळण्याची कला फक्त आपल्याकडच्या मंडळींनाच अवगत आहे, असे नाही. परवा अमेरिकेच्या काही लोकसभा–सदस्यांनी अशी तक्रार केली की, तेथल्या काही प्राणिशास्त्रज्ञांनी शहामृगाचे जीवन व त्याचे वागणे या विषयाचा अभ्यास करण्यासाठी सुमारे पंचवीस हजार डॉलर म्हणजे सवा लाख रुपये उडवले. पण ही तक्रार खरोखरीच रास्त आहे, योग्य आहे अन् उचितही आहे, असे म्हणता येईल काय ? उलट माझ्या मते तर ज्याप्रमाणे प्रत्येक आधुनिक देशाला एक राष्ट्रीय पक्षी असतो, त्याप्रमाणे सबंध आधुनिक जगाचा प्रातिनिधिक पक्षी म्हणून शहामृगाला मान द्यावा लागेल. कारण शहामृगाचे दोन–तीन प्रमुख गुण पाहिले म्हणजे हा पक्षी किती इरसाल, आधुनिक आहे, हे लगेच पटते.

पहिला गुण म्हणजे दुटप्पीपणा. शहामृग पक्षी आहे की प्राणी ? या प्रश्नाचे उत्तर एखादा आधुनिक राजकारणी पुरुष नक्की कुठल्या पक्षात आहे, या प्रश्नाच्या उत्तराइतकेच अवघड आहे. आज एका पक्षाचा टिळा लावून चौखूर उधळलेला नेता उद्या दुसऱ्याच पक्षाची धुंदी चढून हवेत तरंगताना आढळतो. अर्थात पंख पसरून पक्ष्यांत अन् पळत जाऊन प्राण्यांत जमा होणाऱ्या शहामृगापासून आजची राजकारणी मंडळी हे पगडी फिरविण्याचे अवघड शास्त्र शिकली असणार, हे उघड आहे.

शहामृगाचे दुसरे वैशिष्टय म्हणजे ते सर्वभक्षक असते म्हणतात. अक्षरशः दगड–धोंडे खाऊन पोट भरणारा जीव म्हणून शहामृगाची ख्याती आहे. हा गुण तर राजकीय नेतेमंडळीत चांगलाच मुरला आहे. कुठलाही जातिवंत पुढारी असाच सर्वभक्षक असतो व त्याच्या रोजच्या आहारात शेळीच्या दुधापासून नासकी अंडी, पचकन् फुटणारे टमाटे अन् प्रसंगी दगड व चपला असल्या विविध खाद्य–पदार्थांचा समावेश झालेला असतो.

आणि शहामृगाचा तिसरा महत्त्वाचा आधुनिक गुण म्हणजे त्याला भीती वाटली की, ते वाळूत डोके खुपसून व आलेल्या संकटाकडे दुर्लक्ष करून ते टाळते. आमची ( किंवा जगातल्या कुठल्याही देशातली ) सत्ताधिकारी मंडळी तरी दुसरे काय करतात ? गंभीर परिस्थितीकडे दुर्लक्ष करून सर्व काही आलबेल आहे, असे ठासून

समजण्याची कला हल्ली इतकी प्रगल्भावस्थेला पोचली आहे की, अक्षरशः तोंड लपविणाऱ्या शहामृगालादेखील तोंड दाखवावयाची लाज वाटली. आता या प्राण्याचे (की पक्ष्याचे ?) आदर्श जीवन आणि त्याची मुत्सद्देगिरीची वागणूक यांचे निरीक्षण करण्यासाठी अमेरिकेसारख्या घनाढ्य व राजकीय नेतृत्व करू पाहणाऱ्या देशाने फक्त लाख–सव्वा लाख रुपड्या खर्चाव्यात, हे अमेरिकन संपत्तीला तसेच अमेरिकन राजकारणालादेखील लांछनास्पद आहे.

**● डोक्यातल्या बटाट्यांचे पीक**

कारखाने चालवण्यापर्यंत कुठलीही गोष्ट शिकण्यासाठी हिंदुस्थानला परदेशी-तज्ज्ञ बोलवावे लागतात. पण आता मात्र कहर झालाय्. परवा वर्तमानपत्रात वाचले की, बटाट्याचे पीक कसे काढावे त्याची पाहणी करण्यासाठी एक ब्रिटिश बटाटे-तज्ज्ञ भारतभेट देऊन गेले. म्हणजे कमाल आहे की नाही ? हिंदुस्थानात कुठल्याही गोष्टीचा तुटवडा पडला तरी बटाट्यांचे पीक अमाप आहे, असे कुठलाही देशाभिमानी भारतीय छातीठोकपणे सांगू शकेल. कारण दरडोई एकच मत असले तरी दरडोई अनेक बटाटे आहेत आणि अशी चाळीस कोटी सुपीक डोकी असल्यावर बटाट्यांची काय कमतरता ? उलट परदेशी चलन कमावण्यासाठी भारत सरकारने हत्ती (काळे व पांढरे), शिष्टमंडळे, माकडे आणि मंत्री असल्या गोष्टींची निर्यात करण्यापेक्षा भारतीय डोक्यातले बटाटे पाठविण्याचा सपाटा लावला तर जगातल्या यच्चयावत डोक्यांतल्या कांद्यांना जागेसाठी वणवण करावी लागेल.

**● कुत्र्याची करमणूक**

पश्चिम जर्मनीत काही उद्योगी मंडळींनी एक पाहणी केली आहे. तीत त्यांना आढळून आले की, कुत्र्याला रोज एका तासापेक्षा जास्त वेळ टेलिव्हिजन पाहू देऊ नये. फार वेळ टेलिव्हिजन पाहिला तर कुत्रा स्वभावाने चिडचिडा होतो. आता श्रीमंताघरचे श्वान म्हटले की, कुत्र्याच्या जिण्यात डॉग्–बिस्किटापासून टेलिव्हिजन-पर्यंत सर्व आधुनिक सुखसोयी आल्याच. मग टेलिव्हिजन पाहण्यावरचे हे बंधन का ? एक वेळ आजूबाजूला मांजरे असली तर त्यांच्या मागे धावण्यात वेळ जातो, किंवा जवळपास एखादी 'सुबक ठेंगणी' दिसली, तर लांगूल–चालन करता येते, पण एरवी विचाऱ्या आधुनिक मोत्याचा वेळ कसा जायचा ? अस्मादिक अमेरिकेत भरपूर टेलिव्हिजन पाहून आले, तेव्हा बहुतेक टेलिव्हिजन–कार्यक्रम रटाळ असतात, हे त्यांना पटलं आहे. पण पश्चिम जर्मनीतले टेलिव्हिजन–कार्यक्रम कुत्र्याच्या अभिरुचीला सोडून आहेत काय ? आणि आता हिंदुस्थानात टेलिव्हिजन सुरू झाल्यावर मंत्र्यांची चर्पटपंजरी अन् भारतनाट्यम्चा थयथयाट यांच्यापैकी कुठल्या कार्यक्रमापासून कुत्र्याने आपल्या सहनशील स्वभावाचे रक्षण केले पाहिजे ? रोज दोन्ही कार्यक्रमांचा रतीब लागला तर विचाऱ्या कुत्र्याला 'टेलिव्हिजन नको, पण माणूस आवर,' असे म्हणायची पाळी यायची.

●

# ज्ञा न वि ज्ञा न

## □ चीनमधील लोकसंख्यानियमन

प्रचंड लोकसंख्या हे चीनचे मोठे सामर्थ्य आहे, असे मानणाऱ्या चिनी कम्युनिस्ट-नेत्यांनीच गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या–नियोजनाची म्हणजेच संततिनियमनाची मोहीम हाती घेतली आहे. " हे एक मूलभूत व कायद्याचे धोरण आहे, " अशा शब्दांत आरोग्यखात्याचे अधिकारी त्याचे वर्णन करीत आहेत.

आधुनिक पद्धतीने चीनची पहिली शिरगणती १९५३ साली झाली. त्यावेळी तेथील लोकसंख्या ५८ कोट ३० लाख होती. दोन वर्षांपूर्वी १९६४ साली शिरगणती झाली, पण तिचे निष्कर्ष जाहीर करण्यात आले नाहीत. त्यावेळची लोकसंख्या ७५ कोट असावी, असा एडगर स्नो यांचा अंदाज आहे. स्नो यांनी माओत्से तुंग यांनाच यासंबंधी गेल्या वर्षी विचारले, तेव्हा मला माहीत नाही, पण ती ६८ ते ६९ कोट असावी असे वाटत नाही, असे उत्तर त्यांनी दिले. १९६०–६१ मध्ये गणनापद्धतीची पूर्ण पुनर्घटना करण्यात आली, तेव्हापासून लोकसंख्येतील वाढ कमी दाखविण्याकडे चिनी नेत्यांचा कल आहे.

### पक्षसभासदांवर सक्ती

फारसा गाजावाजा न करता संततिनियमनाचा कार्यक्रम चीनने दहा वर्षांपूर्वीच हाती घेतला. आई व मुलाच्या आरोग्याच्या दृष्टीने संततिनियमनाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे, असे पंतप्रधान चौ एन लाय यांनी १९५६ साली जाहीर केले. लोकसंख्यावाढीचे प्रमाण सध्या दोन ते अडीच टक्के आहे, ते एक टक्क्या-पर्यंत खाली आणणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. तो अमलात आणताच उघड प्रचारापेक्षा पद्धतशीर सामुदायिक शिक्षणावर भर दिला जातो. कोणतीही योजना अमलात आणण्याचे चिनी नेत्यांच्या हातचे हुकमी साधन म्हणजे त्यांचा पक्ष. कम्युनिस्ट पक्षाचे १ कोट ७० लाख सभासद आणि अडीच कोट तरुण कम्युनिस्ट यांच्यावर हा प्रयोग यशस्वी करण्याची जबाबदारी टाकण्यात आली. एक मुलगा व एक मुलगी एवढेच आटोपशीर कुटुंब असणे आदर्श. दोन मुलीच झाल्या तर आणखी एक संधी घेण्याची सवलत पक्षसभासदांना दिली जाते, पण यापुढे त्यांनी नियमन केले नाही, तर शिस्तभंगाचा इलाज होऊन त्यांचे सभासदत्वही रद्द होते. लग्न उशिरा करण्याची व संततिनियमनाची त्यांना स्वच्छेने शपथ घ्यावी लागते. कायद्यात मुलीचे लग्नाचे वय १८ व मुलाचे २० आहे, पण प्रत्यक्षात मुलीने २३ ते २६ च्या

दरम्यान व मुलाने २६ ते ३० च्या दरम्यान लग्न करावे, यावर भर देण्यात येतो.

पति-पत्नी दोघांचीही संमती असेल तरच पूर्वी गर्भपातास परवानगी दिली जाई. आता केवळ आईच्या मागणीने व डॉक्टरांच्या जबाबदारीवर गर्भपात केला जातो. पहिलेच मूल असेल तर गर्भपातापासून परावृत्त करण्यात येते, पण निर्णय आईवरच सोपविला जातो. कोणत्याही स्त्रीस वर्षात एकापेक्षा अधिकवेळा गर्भपात करता येत नाही. चीनमध्ये गर्भपातयंत्राचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. गर्भ दोन महिन्यांपेक्षा मोठा असेल, तर या यंत्राचा उपयोग करता येत नाही.

संततिप्रतिबंधक साधनांचा प्रसार केवळ शहरांतून नव्हे, तर गेली तीन वर्षे खेड्यांतही होत आहे. जपानमधील पद्धतींचा अभ्यास करण्यासाठी चीनने तेथे तज्ज्ञ पाठविले. रशिया व युरोपातील प्रयोगांचाही अभ्यास करण्यात येत आहे. लोकसंख्यावाढीचे प्रमाण एक टक्क्यापर्यंत खाली आणण्यास वीस वर्षे लागतील, असा चौ एन लाय यांचा अंदाज आहे.

संततिनियमनाचा प्रसार तिबेट, आंतरमंगोलिया व सिंकियांग या भागात मात्र केला जात नाही. तेथे लोकसंख्येत वर्षाला तीन टक्के वाढ होते, पण वस्ती फार दाट नसल्याने ही मोहीम तेथे हाती घेण्याची आवश्यकता चिनी नेत्यांना वाटत नसावी असे दिसते.

## □ गुप्त कागदपत्रे आणि इतिहास

सरकारी कागदपत्रे किती काळ गुप्त ठेवावी, याबद्दल निरनिराळ्या देशांत निरनिराळे नियम दिसतात,– इंग्लंडमध्ये ती पन्नास वर्षेपर्यंत गुप्त ठेवली जातात, तर आयर्लंडमध्ये ही मुदत सत्तर वर्षे आहे. हा कालावधी फार मोठा असून, तो कमी करावा, अशी दोन्ही देशांतील इतिहासकारांची मागणी आहे. आयर्लंडमध्ये तर दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीपर्यंतची कागदपत्रे संशोधकांसाठी खुली करावीत, अशी मागणी करण्यात येत आहे. इंग्लंडमध्ये नुकतीच १९१६ ते १९२२ या लॉईड जॉर्जच्या संयुक्त मंत्रिमंडळाच्या काळातील सरकारी कागदपत्रे खुली करण्यात आली. निरनिराळ्या चाळीस खात्यांच्या कागदपत्रांचे खंड यात आहेत. मंत्रिमंडळाच्या बैठकीची नियमित व व्यवस्थित टिपणे ठेवण्याची प्रथा लॉईड जॉर्जच्या या मंत्रिमंडळापासूनच प्रथम सुरू झाली. त्या काळातील महत्त्वाच्या निर्णयांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे साधन संशोधकांना उपलब्ध झाले आहे.

पॅलेस्टाइन ही ज्यूंची राष्ट्रभूमी ( नॅशनल होम ) व्हावी, अशी घोषणा बेलफोर यानी १९१७ साली केली. आजच्या इस्राइलचा उगम या घोषणेत सापडेल. त्यावेळी मंत्रिमंडळात भारतमंत्री मॉंटेग्यू हे एकटेच ज्यू होते. त्यांनी व लॉर्ड कर्झन यांनी या घोषणेस विरोध केला होता. मंत्रिमंडळाच्या बैठकीत या

प्रश्नावर चर्चा झाली. त्यावेळी बेलफोर यांच्या घोषणेला विरोध करताना मॉंटेग्यू यांनी असा युक्तिवाद केला की, ही घोषणा आपण मान्य केल्यास हिंदी नेत्यांशी वाटाघाटी करणे मला कठीण जाईल. बेलफोर घोषणेप्रमाणे तुमची राष्ट्रभूमी पॅले-स्टाइन आहे. आमच्याशी वाटाघाटी तुम्ही कोणत्या नात्याने करणार, असा प्रश्न हिंदी नेत्यांनी उपस्थित केला तर त्याला मी काय उत्तर देऊ, असे त्यांचे म्हणणे होते.

## कैसरवरील खटल्याचा प्रश्न

लॉइड जॉर्ज मंत्रिमंडळात त्यावेळी चर्चिला गेलेला आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे कैसरवरील खटल्याचा. कैसरवर युद्धगुन्हेगार म्हणून इंग्लंडमध्ये खटला भरण्याच्या प्रश्नावर मंत्रिमंडळाच्या २३ जुलै, १९१९ च्या बैठकीत चर्चा झाली. पण कैसर त्यावेळी हॉलंडमध्ये होता व डचांनी त्याला ब्रिटिशांच्या ताब्यात देण्याचे नाकारले. इंग्लंड त्याबाबत काही करू शकले नाही. डचांनी कैसरला अतिपूर्वेकडील आपल्या एखाद्या वसाहतीत स्थानबद्ध ठेवावे, अशी सूचना मंत्रिमंडळाच्या ५ फेब्रुवारी, १९२० च्या बैठकीत करण्यात आली. पण ती अमान्य करून डचांनी त्यास हॉलंडमध्येच ठेवले. अखेर नेडर्लंडस्च्या या कृतीचे काही दुर्दैवी परिणाम घडले, तर त्याची जबाबदारी त्या सरकारवर राहील याची नोंद दोस्त राष्ट्रांनी घ्यावी, असा केवळ शाब्दिक नापसंतीवजा ठराव मंत्रिमंडळाच्या २३–३–१९२० च्या बैठकीत झाल्याचे टिपणांवरून दिसते.

## राजेंद्रबाबूंची कागदपत्रे खुली करा

या कालखंडातील भारतामधील घटनांवर काही नवा प्रकाश या कागदपत्रांतूनच पडतो काय, या दृष्टीने संशोधन करण्यास हिंदी इतिहासकारांना हे एक महत्त्वाचे साधन आता उपलब्ध झाले आहे. याच अनुषंगाने स्वतंत्र भारताच्या सरकारची कागदपत्रे किती काळ गुप्त ठेवावयाची, याबाबत केवळ ब्रिटिश–प्रथेचे अनुकरण न करता इतिहासकारांच्या सल्ल्याने सरकारने निर्णय घ्यावा, असे येथे सुचवावेसे वाटते. याच दृष्टीने एक सूचना मांडीत आहे. भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांची कागदपत्रे अभ्यासू व संशोधकांसाठी खुली करण्यात यावी. राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांचे संबंध हा आपल्या राज्यघटनेतील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. राष्ट्रपती इंग्लंडच्या राजाप्रमाणे केवळ नामधारी प्रमुख आहे, की आपल्या घटनेत त्याचे स्थान व अधिकार निराळे आहेत, याचा कायदेपंडितांनी अभ्यास करावा, अशी सूचना राजेंद्रबाबूंनी आपल्या कारकीर्दीच्या अखेरीस केली होती. स्वतः राजेंद्रबाबूंनी या बाबतीत काय प्रथा पाडली होती, मंत्रिमंडळाच्या निर्णयावर त्यांच्या स्वतःच्या मतांचा कितपत ठसा उमटला होता, हे समजण्याच्या दृष्टीने राजेंद्रबाबूंची कागदपत्रे व पत्रव्यवहार संशोधकांना उपलब्ध होणे आवश्यक आहे.

## □ सुशिक्षित बेकार

तीन योजना संपून आता चौथी सुरू होईल, तरीही सुशिक्षितांच्या बेकारीचा प्रश्न सोडविण्यात आमच्या योजनाकारांना व राज्यकर्त्यांना अजून यश आलेले नाही. सबंध देशातील सुशिक्षित बेकारांची नमुना-पाहणी करण्यात आली; तिचे निष्कर्ष नुकतेच प्रसिद्ध झालेले आहेत; त्यावरून असे दिसते की, पदवीधरांपैकी ७.९ टक्के पुरुष आणि २५.३ टक्के स्त्रिया बेकार आहेत. बहुसंख्य मुली कॉलेजांत जातात त्या त्यांना शिक्षणाची आवड असते किंवा चांगली नोकरी मिळविण्याची आवश्यकता असते, म्हणून नव्हे तर विवाह जमेपर्यंत वेळ काढण्यासाठी त्या उच्च शिक्षण घेतात असा आपल्याकडे एक समज आहे; पण तो खरा नाही. पदवीधर दहा स्त्रियांमागे नऊ स्त्रिया नोकरी करीत असल्याचे किंवा नोकरीच्या शोधात असल्याचे या पाहणीत दिसून आले. देशातील २९ विद्यापीठांतून पदवीधर झालेल्या विद्यार्थ्यांचा समावेश या अहवालात केलेला आहे. त्यात एकापेक्षा अधिक पदव्या घेतलेले म्हणजे एम्. ए.; एम्. एस्सी.; व पीएच्. डी. ही समाविष्ट आहेत. शास्त्र, कायदा व व्यापार विषयांच्या पदवीधरांपेक्षा आर्टस पदवीधरांत बेकारीचे प्रमाण अधिक दिसून येते. या निष्कर्षात नवे काही नसून हा नेहमीचाच अनुभव आहे.

शिक्षण आणि उद्योगधंद्यांच्या गरजा यांची योग्य सांगड घालण्यात आलेली नाही, हेच सुशिक्षितांच्या बेकारीचे मुख्य कारण आहे! शैक्षणिक पुनर्घटनेच्या प्रश्नासाठी अनेक कमिशने व समित्या आतापर्यंत नेमण्यात आल्या. सध्या एक कमिशन या प्रश्नाचा विचार करीत आहेच, पण आतापर्यंतच्या अहवालांची जी गत झाली, तीच या नव्या अहवालाचीही होणार असेल तर परिस्थितीत काही फरक पडणार नाही. एस्. एस्. सी. परीक्षेत ६५ प्रकारचे विषय घेण्याची तरतूद आहे, पण ते शिकविण्याची तरतूद मात्र फारच थोड्या शाळांतून असते. मुलाला आवड, पात्रता असो–नसो, आपला मुलगा डॉक्टर किंवा इंजिनीअर व्हावा, असे पालकांचे स्वप्न असते. मुलगा परीक्षेत नापास झाल्यावर ते स्वप्नातून जागे होतात. विद्यापीठांची व कॉलेजांची संख्या वाढत आहे, पण चांगल्या दर्जाचे प्राध्यापक मिळत नाहीत, अशा तक्रारी आहेत. व्यासंग व संशोधनात आपला बराचसा वेळ घालविणारे प्राध्यापक फारच थोडे! स्वाभाविकच, शिक्षणाचा दर्जा खालावत आहे. विद्यापीठांतून पदवीधर बाहेर पडतात, पण निरनिराळ्या उद्योगधंद्यांच्या गरजांचे दृष्टीने आवश्यक असे शिक्षण त्यांना मिळालेले नसते. यांतूनच सुशिक्षितांची बेकारी निर्माण होते. विद्यापीठांतील निरनिराळ्या अभ्यासक्रमांची आखणी करणाऱ्या समित्यांवर उद्योगधंद्यांचे प्रतिनिधी घेतले तर सध्याच्या अभ्यासक्रमातील उणिवा दूर होण्यास निश्चित मदत होईल.

**वा. दा. रानडे**

होळी पुनव....


केले हो केले -
काश्मीर मधील सैन्य
आम्ही कमी केले!
पाळा हो पाळा -
ताश्कंद करार निष्ठेने पाळा!
आले हो आले -
सुब्बुच्या नादानं बहु
धान्य आले!
दिल्ला हो दिल्ला -
काश्मीरच्या काळणीचा
मंत्र मी दिल्ला!


झाले हो झाले_
समाजवादी पोथीचे वाचन झाले!
आत्ता हो आत्ता_
पंजाबी सुभ्याची सांगु
कित्ती कथा!
सोडला बाई सोडला_
केरळच्या पायी तांदूळ
मी सोडला!
कित्ती कित्ती ऐकूं!
ऐकू का नको, आत्ता
बोंबच ठोकूं!
राजेंद्र गायकवाड

MANOOS (Fortnightly) : 1 Mar 1966 : 40 Paise : Regd. No. M H–649

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल…

स्वस्तिक

चप्पल्स



Parkerson/srp/13

स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **श्री. ग. माजगावकर**